I.N.D.I.A. विरूद्ध मोदी...
'चक दे... I.N.D.I.A. होणार का?
– सुरेश भटेवरा

शिवशाही, निझामशाही
आणि लोकशाही
– संजय पवार

इस्त्राईल–पॅलेस्टाईन
संघर्षाला नवी धार
– भास्कर नाशिककर


पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
# द पीपल्स पोस्ट
स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ६ अंक ४ था । मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ ऑक्टोबर २०२३


# ओबीसी फॅक्टरचा भडका






पाक्षिक समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ६

अंक ४ था। मूल्य : रु. ४० । दिनांक : १६ ते ३१ ऑक्टोबर २०२३



**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
प्लॉट नंबर २७३ सी, एसबीआय बँकेच्या पाठीमागे,
समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com



(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)

* अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.

* अंकातील कोणताही मजकूर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.



**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट
8888541822

- **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२


अंकाची वार्षिक वर्गणी ८००/– रुपये फक्त

- **द पीपल्स पोस्ट बँक अकाऊंट डिटेल्स्**

द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा


**संपादकीय :** जुन्या घरातच पडवी टाकून महिलांसाठी केली छोटी जागा – ३ / **कव्हर स्टोरी :** ओबीसी फॅक्टरचा भडका – **श्रीराम पवार** – ५ / I.N.D.I.A. विरूद्ध मोदी... ‘चक दे... I.N.D.I.A.पुन्हा होणार का? – **सुरेश भटेवरा** – ९ / **रेषा आणि फटकार :** शिवशाही, निझामशाही आणि लोकशाही – **संजय पवार** – १३ / घटना दुरुस्ती केल्याशिवाय मराठा आरक्षण मिळणे अशक्य...!! – **राजाभाऊ गडलिंग** – १५ / राज्यकर्त्यांना मराठवाड्यातील दहा हजार शेतकरी आत्महत्यांचा विसर... – **प्रा.एच.एम. देसरडा**– १८ / इस्त्राईल–पॅलेस्टाईन संघर्षाला नवी धार – **भास्कर नाशिककर** – २१ / बाळ गंगाधर टिळक आणि गणेशोत्सव – **डॉ. आनंद मेणसे** – २५ / शाहरूख खानचा ‘जवान’ – **प्रा. अविनाश कोल्हे** – २७ / **मागील अंकातून :** अंधश्रद्धा निर्मूलन, धर्मचिकित्सा आणि धर्मनिरपेक्षता : आव्हान आणि अपेक्षा – **अविनाश पाटील** – २९ / **ग्रंथ परिचय :** वैश्विक शोषणाशी नाळ जोडलेली राजकीय भानाची कविता – **अंशुमन पाटील** – ३३ / **कोणता भारत :** गायांच्या प्रदेशात महिलांचं काय होतंय...? । सर्वांनीच बघितला व्हिडिओ, कुणीच बघितला नाही व्हिडिओ... – **तात्या विंचू** – ३५ / **कविता :** दंगा झाला पाहिजे – **निशांत गुरू** / माझ्या मोडलेल्या माणसांनो! – **शशिकांत हिंगोणेकर** । सत्ता शेवटी, सत्ता असते – **श्रीपाद भालचंद्र जोशी** । – आज वेगळा आहे – **किरण शिवहर डोंगरदिवे** – ३७



हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक चेतन भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. * संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

संपादकीय

# जुन्या घरातच पडवी टाकून महिलांसाठी केली छोटी जागा

अखेर पंचाहत्तरी ओलांडू पाहणाऱ्या जुन्या घरातच छोटीशी पडवी टाकून देशातील महिलांसाठी लोकसभा आणि विधानसभेसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याचा कायदा करण्यात आला. तीस-पस्तीस वर्षे हा कायदा राजकारणात घुसमटत होता. कधी बहुमत नाही, कधी राखीव जागांनाच विरोध, तर कधी कमकुवत सरकार याच्यात तो घुसमटत होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हिंदू कोड बिलाला संसदेची दारे बंद झाली आणि त्यावरून डॉ. आंबेडकरांनी राजीनामा दिला. तेव्हापासून महिलामुक्तीच्या प्रयत्नांना खीळ बसली. महिलांसाठी सर्व अर्थाने मुक्तीचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न म्हणजे हे बिल होते. ते मंजूर झाले आणि महिला सक्षम झाल्या तर धर्म बुडेल, कुटुंबांचा नाश होईल, महिला वरचढ होतील असा आरोप करत देशातले आणि संसदेतले सर्व हिंदुत्ववादी एकवटले. त्यात आरएसएस होताच. बुवा-महाराज आणि शंकराचार्य होतेच. रामाच्या नावाने या बिलाला विरोध करण्यासाठी आघाडी तयार करण्यात आली होती. मनुवादी व्यवस्थेने धाकदपटशा दाखवून महिलांनाही बिलाच्या विरोधात उभे केले. बिल सभागृहात जाऊ शकले नाही. एका अस्पृश्य नेत्याने बिल तयार केले होते, असा आक्षेप काही धर्मांध आणि नीच माणसांनी घेतला होता. अजूनही त्यातले काही आहेत. राज्यघटना अस्पृश्याने लिहिली आहे, असे ते म्हणतात आणि मनू नाचवण्याचा प्रयत्न करतात. तर पुढे जाऊन महिलांसाठी ज्या तरतूदी केल्या जाऊ लागल्या त्यांची मुळे कोड बिलातच होती. पण त्याचे आणि आंबेडकरांचे नाव न घेता त्या अंमलात आणल्या जाऊ लागल्या. काही करून हिंदू कोड बिल हाणून पाडणारे जे कोणी होते, त्यांचे वंशज आजही राजकारणात आहेत. सत्तेच्या राजकारणात त्यांना महिलांच्या एकगठ्ठा मतांची गरज झाली. गेल्या काही वर्षांपासून महिलांना समोर ठेऊन त्यांच्यासाठी लोकप्रिय कल्याणकारी योजना आखल्या जात आहेत. फार भन्नाट आहेत. अशा खूप महिला आहेत, की ज्यांच्याकडे शिजवायला अन्न नाही; पण त्यांना गॅस मिळतोय. खायला अन्न नाही; पण संडास मिळतेय. राहायला जागा नाही; पण त्यांना मोफत गायी मिळतात. सुरक्षेपासून दूर लोटल्या जाणाऱ्या महिलांसाठी मोठ्या प्रमाणात धार्मिक कार्यक्रम



होत आहेत आणि आता तर कारभाऱ्याने संसदेत आरक्षण विधेयक मांडून ते मंजूर केले. महिलांना आरक्षण देण्यास कोणीही शहाण्या माणसाने विरोध करता कामा नये. अर्धे जग महिलांचे आहे. त्यांना जेवढे दूर ठेऊ, तेवढा काळ देशाचा, समाजाचा निम्माच विकास होत राहील. विधेयकात वंदन म्हणजे पूजा असा शब्द जाणीवपूर्वक घातला आहे. त्यानुसार संसदेत कारभाऱ्याने काही महिलांच्या पायाला हात लावून वंदनही केले. जणू काही महिला पूजेचे साधन आहेत, पवित्र गाय आहेत. त्यांना राखीव जागा म्हणजे भक्ती आणि परमेश्वराने दिलेली जबाबदारी पूर्ण केली, अशी भाषणाची वाक्ये पेरण्यात आली. काम परमेश्वराचे असेल, तर ज्यांच्यात परमेश्वराचा अंश आहे त्यांचा विकास करायला परमेश्वराने उशीर का लावला? ज्यांच्यामध्ये काली, सरस्वती आणि लक्ष्मी या देवता वास करतात

असे सांगितले गेले, त्यांच्यावरच अत्याचार का होत राहिले आणि काली कुठं गेली होती? त्यांनाच शाळांची दारे अनेक वर्षे का बंद केली गेली आणि सरस्वती कुठं गेली होती? आणि ज्यांच्या नावावर फुटकी कवडीही अनेक वर्षे नव्हती तेव्हा लक्ष्मी कुठं गेली होती. मनुच्या सापळ्यात पद्धतशीरपणे अडकवल्या गेलेल्या महिलांनीच हे समजून घ्यायला हवे.

महिलांसाठी कितीही कायदे झाले तरी ते राबवणारी व्यवस्था बहुतांशी मनुवादी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पन्नास टक्के जागा महिलांसाठी राखीव आहेत; पण अनेक ठिकाणी या राखीव जागांवर म्हणजे सरपंच, वगैरे पदांवर येणाऱ्या महिलांवर मनुवाद्यांनी हल्ले केले. त्यांना ग्रामपंचायतीबाहेर राहायला सांगितले. खुर्चीत बसू दिले नाही. राष्ट्रीय सणाला त्यांचा हात ध्वजाला लागणार नाही याची काळजी घेण्यात आली. बहुतेक स्त्रियांचे नातेवाईक पुरुषच महिलांच्या नावाने सत्ता चालवतात. सत्तेत गेलेल्या आणि जाऊ पाहणाऱ्या महिलांना कसल्याही प्रकारचा आत्मसन्मान नाही. काही जणी त्रागा करून म्हणतात, की राखीव जागा असल्या काय आणि नसल्या काय फरक कोणाला पडला? या सर्व प्रश्नांवर खास अधिवेशनात चर्चा व्हायला हवी होती; पण महिला अथवा पुरुष यापैकी कोणीही ती केली नाही. त्यांच्या पक्षाने त्यांना तशी मुभा दिली नसावी. आता या जागा राखीव होणार आहेत. त्या मूळ राखीवात राखीव आहेत. एस.सी., एस.टी. वर्गासाठी आता जेवढ्या जागा राखीव आहेत, त्यातल्याच ३३ टक्के राखीव ठेवणार आहेत. म्हणजे महिलांसाठी जे काही मिळेल ते त्यांच्या समाजातूनच येणार आहे. एका खिशातून दुसऱ्या खिशात. अर्थात, हे काही कमी महत्त्वाचे नाही; पण त्याची अंमलबजावणी कधी होणार, कुणला नीट सांगता येणार नाही. राज्यघटना दुरुस्तीची एक मोठी प्रक्रिया राबवावी लागणार आहे. कदाचित ती २०२९ किंवा २०३४ लाही पूर्ण होऊ शकते किंवा काही अडथळेही निर्माण होऊ शकतात. तोपर्यंत आम्हीच तुमचा उद्धार करणार आहोत, असे सांगत महिलांच्या मतांवर हात मारता येतो आणि तसे ते सुरूही झाले आहे. एकूण काय, राजकारणाच्या बुद्धीबळात हुशार माणसांनी केलेली एक चाल असेही म्हणता येऊ शकते. महिलांचा उद्धारच करायचा असेल तर त्यासाठी तीव्र सामाजिक आणि राजकीय इच्छा लागते. नेमका तिचाच दुष्काळ आहे. महिलांना गुलाम करणाऱ्या मनुचा पुतळा राजस्थानात थेट न्यायालयासमोर उभा करायचा आणि त्याच वेळी महिलांच्या उद्धाराच्या घोषणाही करायच्या, असा हा प्रकार आहे. मनुला म्हणजे त्या वृत्तीला मारल्याशिवाय ना दलितांचा उद्धार होईल, ना महिलांचा उद्धार होईल, पण त्यावर संसदेत कोणी बोलत नाही किंवा स्वतःला आंबेडकरवादी म्हणवणारे चार ओळींची वात्रटिकाही करत नाहीत. मनू कायम ठेऊन या देशात कसलाच विचार नाही आणि महिलांचे देवतांमध्ये रुपांतर करूनही काही घडणार नाही.

आपल्या देशात रोज अनेक महिलांवर बलात्कार होतात, खून होतात, विनयभंग होतात, काही वेळा त्यांना जाळले जाते, धिंड काढली जाते, मल्ल युवतींना दोन-दोन महिने अत्याचाराविरुद्ध आंदोलन करावे लागते, काल-परवापर्यंत सती जाणारी रुपकुंवर आपल्याकडे होती आणि मणिपूरमध्ये बलात्काराला बळी पडलेल्या अनेक महिला आजही लढत आहेत. त्यांना वंदन करावे, त्यांच्याकडे माफी मागावी, त्यांना न्याय देण्यासाठी धावावे असे कारभाऱ्याला वाटले नाही. नुसते 'भाईयो' आणि 'बहनो' म्हणून चालत नाही, तर त्या आजही पुरुषप्रधान आणि महिलांना पापयोनी म्हणणाऱ्या मनुच्या दुष्टचक्रात कशा भरडल्या जात आहेत. आपण कोरोनाचा व्हायरस संपवू शकलो, पण पुरुषप्रधान नावाच्या विकृतीला जन्माला घालणारा व्हायरस संपवू शकलो नाही. धर्माला, हिंदुत्वाला आणि हो, मनुलाही आपण राजकारणाची गरज निर्माण केली. हे जर खरे असेल, तर समाज विकासाच्या आपल्या गप्पा नेहमी वांझच ठरत जातील.

समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
द पीपल्स पोस्ट


www.peoplespost.in
डिजीटल स्वरुपात !
नवे लेख, नवी सदरे,
नवा अंक याशिवाय
दैनंदिन विषयांवर नामवंत
साहित्यिक, लेखक,
विचारवंत यांचे भाष्य!

# ओबीसी फॅक्टरचा भडका



श्रीराम पवार

**भाजपची इच्छा काहीही असली तरी या निवडणुकीत ओबीसींचा पाठिंबा मिळवताना बिहारमधील जातगणनेनंतरच्या वातावरणानं नवं आव्हान आणलं आहे. काँग्रेसनं जुन्या निवृत्तीवेतन योजनेचं आश्वासन दिलं आहे, जे सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये परिणाम घडूव शकतं. जातगणना आणि जुनी निवृत्तीवेतन योजना या दोन्ही मुद्यांवर भाजपला बॅकफुटवर रहावं लागत आहे. याचा लाभ काँग्रेसला किती, हेही या निवडणुकीत दिसेल.**

मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, तेलंगणा आणि मिझोराम या राज्यांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. निवडणूकांना सामोरं जाताना जो कमालीचा आत्मविश्वास भाजपमध्ये असतो, त्यातील कमतरता स्पष्ट दिसणारी आहे. सगळं केंद्रीय नेतृत्व ठरवेल, राज्यातील नेत्यांनी मग ते कितीही ज्येष्ठ असोत दिलेलं काम करावं या मोदी - शहा यांच्या आत्मनिर्भर बाण्याच्या मर्यादाही दिसू लागल्या आहेत. त्यातच बिहारच्या जातगणनेनं संपूर्ण राजकीय चर्चाविश्वात ओबीसींची संख्या आणि त्याभोवतीचं राजकारण केद्रस्थानी येतं आहे, जे भाजपला टाळायचं होतं. याला वळण देताना पंतप्रधान देशात सर्वात मोठी संख्या गरिबांची आहे असं सांगू लागले आहेत. सोबत आपण गरीबविरोधक उच्चभ्रू, ते गरिबांवर अन्याय करतात असला नाट्यमय आविर्भाव आहेच. या निवडणुका राज्यांच्या असल्या तरी भाजपनं मोदी यांची प्रतिमाच पणाला लावायचं ठरवलं आहे, तर देशात इंडिया आघाडीच्या निमित्तानं भाजपला तगडं आव्हान देण्याचे विरोधकांचे मनसुबे आहेत. या आघाडीत काँग्रेसची कामगिरी कशी यावर देशातील राजकारणाची दिशा ठरेल आणि त्याची परीक्षा भाजपसोबत थेट लढत असलेल्या मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान या राज्यांत होईल. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो यात्रे'नंतर बदलत्या प्रतिमेचा परीणाम किती याचाही अंदाज येईल. शिवाय या निवडणुकीत काँग्रेसकडून कमलनाथ, अशोक गेहलोत, भाजपकडून शिवराज सिंग चौहान आणि वसुंधरा राजे राजकीय कारकीर्दीत




कदाचित शेवटचा मोठा डाव खेळतील.

**राजकारणाचा पारा इतका का चढला**

मागच्या महिन्याभरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वाढलेले निवडणूक होऊ घातलेल्या राज्यातील दौरे, त्यांचा विरोधकांवर हल्ला करणारा अत्यंत आक्रमक अवतार, कर्नाटक विजयानंतर आणि अलीकडं झालेल्या सर्वेक्षणातून अधिक चांगली स्थिती दिसत असल्यानं वाढत्या आत्मविश्वासासह मैदानात उतरलेली काँग्रेस, दोन्हींकडून मतदारांवर अर्थकारणाची ऐशीतेशी करणाऱ्या आश्वासनांचा पाऊस, हे सारं निवडणुकांचं वातावरण तयार करणारं

होतं. फक्त मध्येच, 'वन नेशन वन इलेक्शन'चा ट्रायल बलून सोडून दिला होता. त्यामुळं लोकसभेसोबत घेण्यासाठी या निवडणुका पुढं जातील काय, इतकाच काय तो मुद्दा होता. मात्र तूर्त तरी केंद्रातील सत्ताधीशांना 'वन नेशन वन इलेक्शन'ची अंमलबजावणी करायची इच्छा दिसत नाही. आता जाहीर झालेल्या निवडणुकांत सर्व राज्यांत मतदान नोव्हेंबरात दिवाळीच्या आगेमागे होईल आणि ३ डिसेंबरला निकाल जाहीर होईल. त्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत लोकसभा निवडणुका जाहीर कराव्या लागतील. म्हणजेच या निवडणुकीतून येणारं चित्र लोकसभेसाठी काही सूचन करणारं असू शकतं. ते आपल्या विरोधात जाऊ नये आणि खुद्द मोदी मैदानात उतरून आणि सारे ध्रुवीकरणाचे खेळ करूनही भाजपला धूळ चारता येते, हा कर्नाटकातला धडा या राज्यांत विरोधकांना गिरवता येऊ नये यासाठी भाजप सारं सामर्थ्य पणाला लावेल. मोदी यांची प्रतिमा आणि त्यांना आव्हान देऊ शकणारं नेतृत्व विरोधकांकडं नाही अशी धारणा बनवण्यातलं भाजपच्या प्रचारयंत्रणेचं यश हे या पक्षाचं बलस्थान आहे, ज्यावर अजून तरी विरोधकांना नेमकं उत्तर सापडत नाही. आता निवडणूका जाहीर झालेल्या किमान राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड या तीन राज्यांत तरी भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांकडं राज्य पातळीवर प्रभावी नेत्यांची कमतरता नाही. तरीही या निवडणुकीत मोदी आणि राहुल गांधी यांच्या निवडणुका जिंकण्याच्या आणि पक्षाला मतं मिळवून देण्याच्या क्षमतेची आणखी एकदा कसोटी लागेल. याआधी मोदी यांनी यात निर्विवाद यश मिळवलं आहे. त्यात बदल घडवता येतो का, हा काँग्रेससाठी आणि लोकसभा निवडणुकीत एकत्र लढू पाहणाऱ्या 'इंडिया' आघाडीसाठीही कळीचा मुद्दा असेल. यात सरशी झाली तर काँग्रेसची विरोधकांतील स्वीकारार्हता आणि देशाच्या राजकारणातील ताकद लक्षणीयरित्या वाढेल. यात पुन्हा मोदींनी उत्तरेतील आपला प्रभाव कायम ठेवल्यास लोकसभेसाठी भाजपचा आत्मविश्वास दुणावला असेल. म्हणेजच या राज्यांत काय होणार याला महत्व आहे. त्याहून त्याचं महत्त्व राष्ट्रीय राजकारणात आहे. लोकसभा आणि विधानसभांच्या निवडणुकीत लोक एकसारखा कल दाखवतातच, असं नाही हे खरंच आहे. मागच्या खेपेस याच राज्यात काँग्रेसला चांगलं यश मिळालं होतं. पण लोकसभेत भाजपनं काँग्रेसला नेस्तनाबूत केलं होतं. मात्र त्या निवडणुकीला बालाकोटमधील हवाई कारवाईची पार्श्वभूमी होती. जी सर्वसाधारण निवडणुकीची गणितं उलटीपालटी करणारी होती. यातील तीन राज्ये हिंदी पट्ट्यातील आहेत. याच भागात भाजपच्या बहुमताचा ठोस आधार तयार होतो. तिथं लडखडणं भाजपला देशव्यापी राजकारणात परवडणारं नाही आणि तिथं पाय रोवला तर काँग्रेसचं नशीब पालटण्याची सुरुवात होऊ शकते. निवडणुका जाहीर व्हायच्या आधीच या राज्यांतील राजकारणाचा पारा इतका का चढला, याचं हे एक कारण.

**आक्रमक प्रचारानं भाजपमधील अस्वस्थता समोर येत आहे**

निवडणुका जाहीर झालेल्या मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड





आणि तेलंगणा या राज्यांत एका अर्थानं तिथल्या राज्य सरकारांसोबत केंद्रात सत्तेत असलेल्या भाजपचीही कसोटी लागणार आहे. यात मध्य प्रदेश हे एक लक्षवेधी राज्य. दीर्घकाळ भाजपचं या राज्यातील वर्चस्व संपवण्याची एक संधी म्हणून काँग्रेस या निवडणुकीकडं पाहतो आहे, तर मधला वर्षभराचा खंड वगळता सातत्यानं २० वर्षे मध्य प्रदेशात सत्तेत असलेल्या भाजपला लोकसभेआधी हे राज्य गमावणं परवडणारं नाही. हिंदी पट्ट्यातील भाजपच्या प्रतिमेवर राज्यांचा निकाल प्रभाव टाकणारा असेल. अलीकडंच राहुल गांधी यांनी राजस्थानात काँग्रेस जोरदार मुकाबला करेल, मात्र मध्य प्रदेश, छत्तीसगडमध्ये काँग्रेसचा विजय होईल, असा आत्मविश्वास व्यक्त केला होता. यातील राजस्थानविषयी राहुल असं का बोलले असावेत, यावर भरपूर चर्चा झाली. मात्र मध्य प्रदेशाविषयीचा त्यांचा आणि पर्यायानं काँग्रेसचा आत्मविश्वास स्पष्ट दिसतो आहे, तर भाजपकडून तीन केंद्रीय मंत्र्यांसह सात खासदारांना मध्य प्रदेशच्या विधानसभा रिंगणात उतरवण्यापासून ते पंतप्रधानांच्या अजून निवडणुक जाहीर होण्याआधीच्या अत्यंत आक्रमक प्रचारानं भाजपमधील अस्वस्थता समोर येत आहे. ही अस्वस्थता अनेक पातळ्यांवरची आहे. त्यावर नियंत्रण ठेवता आलं नाही, तर मध्य प्रदेशात भाजपला फटका बसू शकतो.

**शिवराजसिंग यांना अडगळीत टाकलं जाईल!**

मध्य प्रदेशात शिवराजसिंग चौहान यांचे सरकार आहे. २०१८ च्या निवडणुकीत काँग्रेस २३० पैकी ११४ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष बनला होता. भाजपला १०९ जागा मिळाल्या होत्या. सरकार काँग्रेसनं बनवलं, कमलनाथ मुख्यमंत्री बनले. मागच्या काही वर्षांतील राजकीय चालीनुसार लोकांनी कौल काहीही दिला असला तरी सरकार भाजपचंच आलं पाहिजे, या अट्टाहासातून भाजपनं काँग्रेसमध्ये फूट पाडली. काँग्रेसमध्ये अस्वस्थ असलेले ज्योतिरादित्य शिंदे २२ आमदारांसह बाहेर पडले आणि अल्पमतात आलेलं कमलनाथ सरकार कोसळलं. पुन्हा शिवराजसिंग चौहान मुख्यमंत्री झाले होते. तोडफोड करून राज्य तर भाजपनं मिळवलं, मात्र चौहान ही काही भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाची पहिली पसंती नव्हती. राज्याराज्यात स्वबळावर उभं राहू पाहणारं कोणतंही नेतृत्व भाजपचं हायकमांड फार काळ टिकू देत नाही. मोदी यांनी ज्या रितीनं गुजरातमध्ये आपला दबदबा पक्षापलिकडं जाऊन तयार केला होता, तसाच मध्य प्रदेशात शिवराजसिंग आणि राजस्थानात वसुंधरा राजे यांनी केला. मोदी

भाजपच्या निर्णय प्रक्रियेत केंद्रस्थानी आल्यानंतर प्रसंगी केंद्रीय नेतृत्वाला न जुमानणारे कोणीही खुपायला लागले होते. मात्र मध्य प्रदेशात किंवा कर्नाटकात 'ऑपरेशन कमळ' नावाचा खेळ खेळल्यानंतर अशा बाहेरुन आलेल्यांच्या बळावरचं सरकार चालवायचं तर येडियुरप्पा, शिवराजसिंग यांच्यासारख्या जुन्याजाणत्यांना पर्याय नसल्याचं वास्तव स्वीकारावं लागलं होतं. कर्नाटकात पुढं येडियुरप्पांना हटवून बसवराज बोम्मईकडं सूत्रं दिली गेली. मध्य प्रदेशात मात्र मुख्यमंत्रीपदासाठी अन्य दावेदार असले तरी शिवराजसिंग यांनाच पसंती द्यावी लागली. सुमारे २० वर्षे मुख्यमंत्री असलेले शिवराजसिंग यावेळी मात्र निवडणुकीत अधिकृतपणे भाजपचे मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार नाहीत. दुसरीकडं, मुख्यमंत्रीपदाचे दावेदार बनू शकतात अशा अनेकांना केंद्रातून राज्यात पाठवलं आहे. शिवराजसिंग यांना अडगळीत टाकलं जाईल, असं वातावरण इतक्या टोकाला गेलं आहे, की खुद्द शिवराज यांनी एका सभेत लोकांना मुख्यमंत्री व्हावं असं वाटतं की नाही असा जाहीर प्रश्न केला. दोन दशकं राज्य केल्यानंतरही मध्य प्रदेशातील प्रश्न सुटले किंवा विकासाच्या आघाडीवर या राज्यानं काही फार मोठी मजल मारली असं सांगण्यासारखी स्थिती नाही. म्हणजेच प्रस्थापितविरोधी कल साचलेला असू शकतो. त्यावर मात करायचा मार्ग म्हणून शिवराज यांची अवस्था डळमळीत ठेवणं आणि अनेक ठिकाणी नव्या चेहऱ्यांना संधी देणं किंवा प्रादेशिक नेतृत्व असूनही निवडणुकीत मोदी यांचाच चेहरा पुढं ठेवला जातो आहे. भाजपमधील अस्वस्थतेचं हे एक कारण आहे.








### ५० टक्के कमिशन सरकार?

मध्य प्रदेश हे भाजपकडं ठोस जनाधार असलेलं महत्त्वाचं राज्य आहे. हा आधार जनसंघांच्या काळापासून चालत आला आहे. तसंच या राज्यात कोणी प्रादेशिक पक्ष मूळ धरू शकलेला नाही. साहजिकच सत्तेचा संघर्ष काँग्रेस आणि भाजप यांच्यातच चालत आला. या राज्यात शिवराजसिंग आपल्या प्रतिष्ठेची लढाई लढतील, तर कमलनाथ सत्तेचा घास हिसकावून घेतल्याचा वचपा काढायची संधी म्हणून ताकद पणाला लावतील. मागच्या निवडणुकीत कौल काँग्रेसला मिळाला. मात्र भाजपनं काँग्रेसमधील ज्योतिरादित्य शिंदे यांचा २२ आमदारांचा गट फोडून सत्ता मिळवली. आता या निवडणुकीत ग्वाल्हेर आणि आसपासच्या भागात ज्योतिरादित्य शिंदे यांच्या प्रभावाची कसोटी लागेल. काँग्रेसनं या राज्यात कर्नाटकचं टेम्प्लेट वापरलं आहे. राज्यातील भाजपच्या सरकारवर गैरव्यवहाराचे आरोप करीत ५० टक्के कमिशन सरकार असा शिक्का मारायचा काँग्रेसचा प्रयत्न आहे. दुसरीकडं, कल्याणकारी योजानांचा पाऊस पाडला जातो आहे. याचा परिणाम होतो, हा धडा शिकलेल्या भाजपनंही तशाच योजनांची सरबत्ती केली. मात्र या योजनांसाठी भाजपला ऐन निवडणुकीच्या तोंडावरच सवड मिळाली काय, या प्रश्नाचं उत्तर देता येत नाही.



### राजस्थानातील लढत अन्य राज्यांच्या तुलनेत अटीतटीची

राजस्थानातही सात खासदारांना भाजपनं रिंगणात उतरवलं आहे, तर छत्तीसगडमध्ये तीन खासदार विधानसभेच्या रिंगणात उतरवले आहेत. ज्या काँग्रेसवर राज्यातील नेतृत्वाला बेदखल करण्याची टीका होत असे, तो पक्ष आता राज्यातील लोकप्रिय नेत्यांवर मदार टाकतो आहे, तर प्रादेशिक नेत्यांना ताकद देऊन उभं करणारा भाजप त्या पक्षातील राज्य पातळीवरच्या लोकप्रिय नेत्यांचं महत्त्व कमी करण्याचे प्रयत्न करतो आहे. पक्षनेतृत्वाची पकड किती, यानुसार पक्षश्रेष्ठींचे रंग कसे बदलतात याचं हे निदर्शक. राजस्थानात भाजपमध्ये वसुंधरा राजे सर्वाधिक लोकप्रिय नेतृत्व आहे. मात्र भाजप त्यांचं नाव मुख्यमंत्रीपदासाठी जाहीर करत नाही. त्यांना निर्णयप्रक्रियेतही अन्य नेत्यांपैकी एक असंच स्थान दिलं जातं. राजस्थानात पाच वर्षांनी सत्ताबदल होण्याची परंपरा आहे. त्या आधारावर आता भाजपला संधी आहे. भाजपचं संघटन बळकट आहे. प्रस्थापितविरोधी जनमताचा लाभ हा पक्ष घ्यायचा प्रयत्न करेल. काँग्रेसमध्ये मागच्या निवडणुकीपासून सातत्यानं मुख्यमंत्री अशोक गेहलोत आणि या पदाचे दावेदार सचिन पायलट यांच्यात संघर्ष सुरू आहे. गेहलोत यांनी यात प्रसंगी हायकमांडलाही नमती भूमिका घ्यायला भाग पाडलं होतं. आता निवडणुकीत हे दोन गट किती एकत्र लढणार, हा मुद्दा असेल. गेहलोत यांचा भर कल्याणकारी योजनांवर आहे. राजकारण ओबीसीकेंद्री बनवता आलं, तर त्याचाही लाभ घेण्याचा राजस्थानात काँग्रेसचा प्रयत्न करेल. राजस्थानातील लढत अन्य राज्यांच्या तुलनेत अटीतटीची असेल.

छत्तीसगडमध्ये काँग्रेस सर्वाधिक आत्मविश्वासनं निवडणुकीला सामोरं जाईल. याचं कारण तिथं भूपेश बाघेल यांच्या सरकारनं बजावलेली कामगिरी. या राज्यातही भाजपनं मुख्यमंत्रीपदासाठी कोणाचंही नावं पुढं केलेलं नाही. मोदी यांच्या प्रतिमेवरच पक्षाची भिस्त असेल. हिंदुत्व आणि राष्ट्रवादाचा सहारा घ्यायचा इथं भाजपचा प्रयत्न असेल, तर बघेल शेतकऱ्यांसाठीच्या विविध योजना आणि प्रादेशिक अस्मितेचा मुद्दा बनवतील. नेतृत्वासाठीची स्पर्धा दोन्ही पक्षांत आहे. सर्व गटांना





एकत्र काम करायला लावणं, हे पक्षनेतृत्वासाठी मोठंच काम असेल.

**एमआयएमच्या प्रभवाचीही कसोटी**

निवडणुका जाहीर झालेल्यांमधील तेलंगणा हे एकच राज्य दक्षिणेकडं आहे. हे राज्य आंध्रातून वेगळं केलं. काँग्रेसनं मात्र त्याचा लाभ झाला तत्कालिन तेलंगणा राष्ट्र समितीला आणि तेलंगणासाठी आंदोलन करणाऱ्या के. चंद्रशेखर राव यांना. मूळ आंध्रप्रदेशातून तेलंगणा आकाराला आल्यानंतर आंध्रात लक्षणीय प्रभाव असलेल्या काँग्रेसचा जानाधार दोन्हीकडं तळाला गेला होता. आर्थिक आघाडीवर उत्तरेतील राज्यांहून तेलंगणा पुढारलेलं राज्य आहे. शेतकऱ्यांसाठी टीआरएस सरकारनं अनेक योजना राबवल्या आहेत, ज्यांची दखल अन्य सर्वांना घ्यावी लागली होती. निवडणुका जाहीर होत असताना या राज्यात काँग्रेसनं जोरदार मुसंडी मारल्याचं समोर येतं आहे. राहुल गांधी यांच्या सभांना होणारी प्रचंड गर्दी याचं निदर्शक आहे. कर्नाटकप्रमाणंच या राज्यात सरकारविरोधात आरोपांचं सत्र चालवत लोकांना सवलती देण्याच्या योजनांवर काँग्रेसचा भर आहे. तेलंगणात पाय रोवण्यासाठी भाजपनं मधल्या काळात अनेक प्रयत्न केले. अगदी हैदराबादची महापालिका निवडणुकही भाजपनं अत्यंत गांभीर्यानं लढवली होती. मात्र यावेळी लढत काँग्रेस आणि केसीआर यांच्या बीआरएस (पूर्वीचा टिआरएस) यांच्यातच असेल, हे स्पष्ट आहे. या निवडणुकीत एमआयएमच्या असदुद्दीन ओवेसींच्या प्रभवाचीही कसोटी लागेल.

**काँग्रेसच्या लाल सावता यांना संधी**

या निवडणूकांत सर्वात छोटं राज्य मिझोराम आहे. तिथल्या निकालांची राष्ट्रीय पातळीवर फारशी दखलही घेतली जात नाही. या राज्यात पहिल्यांदाच काँग्रेस आणि मिझो नॅशनल फ्रंट (एमएनएफ) या दोन प्रमुख दावेदारांशिवाय झोराम पीपल्स मूव्हमेंट (झेडपीएम) या नावानं तिसरा लक्षणीय पर्याय पुढं येतो आहे. एमएनएफ सरकारनं म्यानमारमधून आलेल्या निर्वासितांचा मुद्दा अस्मितेचा बनवून हाताळला. मुख्यमंत्री झोराम थंगा यांनी प्रसंगी केंद्राच्या विरोधात भूमिका घेतली. मणिपूरमधील हिंसाचारानंतर तिथून आलेल्या स्थलांतरितांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र झोराम थंगा यांच्या आर्थिक उधळणीतून राज्य आर्थिकदृष्ट्या डबघाईला येते आहे. या पार्श्वभूमीवर आर्थिक आघाडीवर शिस्त लावण्याचा लौकिक असलेल्या काँग्रेसच्या लाल सावता यांना संधी दिसते आहे.

राज्यात झेडपीएमच्या रुपानं आकाराला आलेला तिसरा पक्ष शहरी भागात प्रभाव टाकू शकतो, तसंच काँग्रेससाठी आव्हान निर्माण करू शकतो.



पाच राज्यांच्या या निवडणुकांत स्थानिक प्रश्न, सरकारांची कामगिरी, स्थानिक नेत्यांची कर्तबगारी, कमतरता यांचा पीरणाम होईलच. मात्र यावेळी भाजप आणि काँग्रेस या दोन राष्ट्रीय पक्षांसाठी यातील तीन राज्यांत तरी प्रतिष्ठेचा सामना होईल. तिथं मोदी विरुद्ध राहुल गांधी असा सामना रंगेल. काँग्रेसला भ्रष्ट, घराणेशाहीवादी, देशाच्या शत्रूची भाषा बोलणारे अगदी अर्बन नक्षलवाद्यांच्या हाती गेलेला पक्ष अशी सारी दूषणं भाजपकडून दिली जात आहेत. हिंदुत्वाचा आक्रमक प्रचार होईल हेही उघड आहे. शिवाय केंद्र सरकारकडून राबवल्या जणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ मोदी यांच्यामुळेच मिळतो, हेही ठसवलं जाईल. राहुल गांधींकडून 'द्वेषाविरोधात मोहब्बत की दुकान'चं प्रचारसूत्रं असेल, शिवाय विविध योजनांच्या आश्वसनांचा वर्षावही असेल. या अपेक्षित प्रचारापलिकडं काही घटकांचा या निवडणुकीत कस लागेल आणि त्याचा परिणाम लोकसभेसाठी महत्त्वाचा असेल. एक तर भाजपचा भर ओबीसींच्या जातनिहाय मतगठठ्यापेक्षा या समूहांना एकाच हिंदुत्वाच्या ओळखीत बसवण्यावर असतो. हिंदीभाषक पट्ट्यात भाजपनं मिळवलेल्या प्रचंड यशात हा घटक निर्णायक महत्त्वाचा होता. त्याला यावेळी काँग्रेसन थेटपणे जातगणनेच्या केलेल्या मागणीनं आव्हान उभं केलं आहे. मंडल शिफारशींच्या अंमलबजावणीनंतर काँग्रेसचा ओबीसींमधील जनाधार आटत गेला होता. जातगणना सरकारी नोकऱ्यांतील ओबीसीच्या प्रमाणाचा मुद्दा बनवत, ही प्रक्रिया उलट फिरवण्याची काँग्रेसची रणनिती दिसते. त्याचीही परीक्षा या निमित्तानं होईल. निवडणुकीतील मतविभागणीत धर्म अधिक प्रभावी ठरणार की जात, हा यातील कुतुहलाचा मुद्दा असेल. एका अर्थानं मंडलच्या दुसऱ्या अध्यायाच्या राजकीय परिणामांची मोदी याचं ओबीसी असणं आणि जातीपेक्षा गरीब आणि श्रीमंत असा तडका द्यायचा भाजपचा प्रयत्न आहे. तर भाजपच्या दहा मुख्यमंत्र्यांत केवळ एक ओबीसी आहे आणि काँग्रेसच्या चार मुख्यमंत्र्यांपैकी तीन ओबीसी आहेत, असं सागंत राहुल ओबीसींना सत्तेत स्थान देण्यात काँग्रेस भाजपहून पुढं असल्याचं दाखवू पाहताहेत. भाजपची इच्छा काहीही असली तरी या निवडणुकीत ओबीसींचा पाठिंबा मिळवताना बिहारमधील जातगणनेनंतरच्या वातावरणानं नवं आव्हान आणलं आहे. काँग्रेसनं जुन्या निवृत्तीवेतन योजनेचं आश्वासन दिलं आहे, जे सरकारी कर्मचाऱ्यांमध्ये परिणाम घडूव शकतं. जातगणना आणि जुनी निवृत्तीवेतन योजना या दोन्ही मुद्द्यांवर भाजपला बॅकफुटवर रहावं लागत आहे. याचा लाभ काँग्रेसला किती, हेही या निवडणुकीत दिसेल.

●●●


**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

# I.N.D.I.A. विरुध्द मोदी...
# 'चक दे... I.N.D.I.A. पुन्हा होणार का?



सुरेश भटेवरा

**आघाडी सरकारांचा कालखंड १९९० च्या दशकातच सुरू झाला. तेव्हापासून भारतात कोणत्याही पंतप्रधानांची एक्सपायरी डेट दहा वर्षांपेक्षा जास्त नाही. सत्ताधारी पक्षाचे नेतृत्व करणारा पंतप्रधान जर घमेंडी, आत्ममग्न आणि अहंकाराने पछाडलेला असेल, तर १० वर्षांपेक्षा अधिक काळ देशाचे नेतृत्व करण्याची संधी त्यालाही मिळण्याची शक्यता कदापि नाही. याचा प्रत्यय २०२४ सालच्या एप्रिल महिन्यात होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीत साऱ्या देशाला बहुधा येईल. भारतात जुलै महिन्यात लागोपाठ घडलेल्या घटनाक्रमांमुळे याची पुसटशी जाणीव, विविध राज्यांतल्या बहुसंख्य मतदारांना होऊ लागली आहे.**



तमाम विरोधी पक्षांना आव्हान देत, 'एक अकेला सब पर भारी' अशी अहंकारी वल्गना, संसदेच्या सभागृहात पंतप्रधान मोदींनी काही महिन्यांपूर्वी केली होती. हिमाचल प्रदेश आणि कर्नाटक विधानसभेचे निकाल तोपर्यंत लागले नव्हते. ईशान्य भारतातले मणिपूर तोपर्यंत जातीय नरसंहारात होरपळले नव्हते. दरम्यान, बदनामीच्या फुटकळ खटल्यात गुजरातच्या न्यायालयाने राहुल गांधींना २ वर्षांची सर्वाधिक शिक्षा सुनावली. याच शिक्षेचा आधार घेत, दुसऱ्याच दिवशी घाईगर्दीत त्यांचे संसद सदस्यत्व रद्द करण्यात आले. पाठोपाठ दिल्लीतले त्यांचे सरकारी निवासस्थानही खाली करून घेण्यात आले. इन्कम टॅक्स, सीबीआय आणि सक्तवसुली संचालनालय आदी यंत्रणांचा मनसोक्त वापर देशात सुरूच आहे. त्यांचा राजरोस धाक दाखवीत विविध राज्यांतले प्रादेशिक पक्ष फोडले जात आहेत. आपल्याला आव्हान देऊ शकणारा विरोधी पक्ष अथवा एकही नेता आता मैदानात शिल्लक नाही, अशा घमेंडीतच मोदींनी ही गर्जना संसदेत केली होती.

**...तर भाजपत दाखल व्हा, अन्यथा तुमच्याकडे पाहतो**

जून महिन्यात पंतप्रधान मोदी, ऑस्ट्रेलिया, जपान, पापुआ न्यू गिनी, अमेरिका, सौदी अरेबिया, इजिप्त आदी देशांच्या दौऱ्यात मग्न होते. परदेशात भारताला मिळणारा सन्मान, जणू आपलाच व्यक्तिगत सन्मान आहे अशा थाटात ते स्वीकारीत होते. केंद्रात आणि राज्यात भाजपचेच डबल इंजिन सरकार असलेले मणिपूर त्यावेळीही हिंसाचारात जळतच होते. पंतप्रधानांनी त्यावर नेहमीप्रमाणे संशयास्पद मौन पत्करले. मोदींचे तमाम भक्त आणि त्यांचे समर्थक मात्र आपला नेता आता विश्वगुरू बनला आहे, या कल्पनाविलासात रममाण होते. परदेश दौरा आटोपताच, भाजपच्या 'मेरा बूथ, सबसे मजबूत' संमेलनाला संबोधित करण्यासाठी मोदी भोपाळला गेले. देशात विरोधी पक्ष एकत्र येण्याची छोटीशी प्रक्रिया त्यावेळी काही प्रमाणात सुरू झाली होती. त्यांना उद्देशून हे सारे पक्ष किती भ्रष्टाचारी आहेत, फक्त आपल्या परिवाराचे हितसंबंध कसे सांभाळतात, याचा तारस्वरात उल्लेख करीत 'मी कोणालाही सोडणार नाही, प्रत्येकाला त्यांची जागा दाखवीन', अशी धमकीवजा गर्जना मोदींनी केली. खरं तर, ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत, अशा विरोधी पक्षातल्या नेत्यांसाठी ही धमकी जाणीवपूर्वकच मोदींनी दिली होती. त्याचा अध्याहृत अर्थ इतकाच होता, की 'तुमचे पाप तुम्हाला झाकायचे असेल तर भाजपत दाखल व्हा, अन्यथा तुमच्याकडे पाहतो.'

**तमाम विरोधी पक्षांना पराकोटीचा संताप यावा, अशीच ही घटना**

चारच दिवसांत घडलेही तसेच. २ जुलै रोजी शरद पवारांचा

राष्ट्रवादी काँग्रेस हा महाराष्ट्रातला महत्त्वाचा विरोधी पक्ष फुटला. शरद पवारांनी मात्र विरोधी पक्षाची आपली भूमिका अजिबात सोडली नाही. त्याच दिवशी काकांना आव्हान देत अजित पवारांनी काही सहकाऱ्यांसह थेट बंडखोरी केली. लगेच उपमुख्यमंत्री म्हणून त्यांचा, तर कॅबिनेट मंत्री म्हणून छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील आदी ९ जणांचा शिंदे-फडणवीस मंत्रिमंडळात शपथविधीही झाला. ज्या अजित पवार, प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, सुनील तटकरे आदींवर सक्तवसुली संचालनालया (ED) ची तलवार लटकत होती, ते सारे एका झटक्यात भाजपसाठी चारित्र्यवान ठरले. या सर्वांना सन्मानाने सत्तेत विराजमानही करण्यात आले. सामान्य मतदारांसह देशभरातल्या तमाम विरोधी पक्षांना पराकोटीचा संताप यावा, अशीच ही घटना होती.



**काँग्रेस पक्षात 'भारत जोडो यात्रे'नंतर हुरूप संचारला**

काँग्रेससह देशभरातले विरोधी पक्ष या काळात अर्थातच गप्प बसले नव्हते. मरगळलेल्या काँग्रेस पक्षात राहुल गांधींच्या देशव्यापी 'भारत जोडो यात्रे' नंतर हुरूप संचारला होता. हिमाचल आणि कर्नाटक विधानसभेत भाजपला धूळ चारून काँग्रेसने दिग्विजय संपादन केला होता. प्रादेशिक पक्षांच्या विविध राज्यांतल्या नेत्यांनीही काँग्रेस व राहुल गांधींच्या नेतृत्वाला यानंतर गांभीर्याने घ्यायला सुरुवात केली. मग बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी पुढाकार घेतला. सर्वांच्या भेटीगाठी सुरू झाल्या. पाठोपाठ भारतातल्या प्रमुख विरोधी पक्षांची पहिली बैठक बिहारची राजधानी पाटण्यात संपन्न झाली. १५ पक्षांचे प्रमुख नेते या बैठकीला उपस्थित होते. दिल्ली सरकारबाबत एक वटहुकूम केंद्र सरकारने जारी केला आहे. संसदेत विरोधकांनी तो एकजुटीने हाणून पाडावा, अशी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची मागणी होती. सुरुवातीला काँग्रेसने त्यांना काहीसा थंड प्रतिसाद दिला. पण काळाच्या ओघात त्यावर हमखास उपाय सापडेल, याची सर्वांना खात्री होती. साहजिकच इतरांनी या विषयाला फारसे महत्त्व दिले नाही. विरोधकांची दुसरी बैठक सिमल्याला घ्यावी, असा प्रस्ताव सुरुवातीला आला. पण काँग्रेसशासित कर्नाटकच्या राजधानीत बंगळुरुलाच ती आयोजित करावी, असे अंतत: ठरले.

दुसऱ्या बैठकीचे यजमानपद काँग्रेसकडे होते. मुख्यमंत्री सिद्धरामैय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी जय्यत तयारी सुरू केली. देशातल्या २६ राजकीय पक्षांना निमंत्रणे पाठवण्यात आली. काँग्रेसने केंद्र सरकारच्या दिल्लीविषयक वटहुकुमाला संसदेत विरोध करण्याची भूमिका दरम्यान स्पष्ट केली. 'आप'चा काँग्रेसबाबत विरोध लगेच मावळला. केजरीवाल बंगळुरूच्या बैठकीत सामील झाले. अपेक्षेनुसार साऱ्या २६ पक्षांचे प्रमुख नेते १७/१८ जुलै रोजी बंगळुरुत दाखल झाले. काँग्रेसला पंतप्रधानपदाची लालसा नाही, असे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले. आघाडीच्या नेतृत्वाबाबतचा विरोधी पक्षांचा संभ्रम त्यामुळे आपोआपच मिटला. ताज हॉटेलच्या सभागृहात अनेक तास चर्चा केल्यानंतर, भाजपच्या राजकीय विचारधारेच्या विरोधात आगामी राजकारणाच्या रणनितीची दिशा सर्वांनी ठरवली. प्रत्येक बैठकीनंतर जनतेसमोर आपले संकल्पपत्र सादर करावे असा निर्णय झाला. राहुल गांधींनी विरोधकांच्या नव्या आघाडीचे नाव Indian National Developmental Inclusive Alliance असे सुचवले. त्याच्या आद्याक्षरांचे लघुरूप (I.N.D.I.A.) इंडिया असे होते. सर्वांनी या नावाला एकमुखाने लगेच संमती दिली.

**कोणी एक व्यक्ती म्हणजे सारा देश होऊ शकत नाही**

बैठकीनंतर संयुक्त पत्रपरिषदेला सारे सदस्य उत्साहाने सामोरे गेले. इंडियाचे पहिले संकल्पपत्र त्यात सादर करण्यात आले. ममता दीदींनी 'जुडेगा भारत, जितेगा इंडिया' असे आघाडीचे घोषवाक्य जाहीर करून टाकले. परिवारवादाच्या मोदींच्या आरोपाला उत्तर देताना उद्धव ठाकरे म्हणाले, होय आम्ही जरूर परिवारवादी आहोत. कारण सारा भारतच आम्हा सर्वांचा परिवार आहे. कोणी एक व्यक्ती म्हणजे सारा देश होऊ शकत नाही. साऱ्या देशाला आम्ही हे पटवून देऊ. केजरीवाल म्हणाले, ९ वर्षांच्या दीर्घ कारकीर्दीत मोदींना देशासाठी बरेच काही करता आले असते. प्रत्यक्षात सारा वेळ त्यांनी वाया घालवला. देशातले प्रत्येक क्षेत्र त्यांनी बर्बाद केले. मोदी, शाह, भाजप आणि आरएसएसच्या विभाजनकारी राजकारणाला एकजुटीने आणि कडाडून विरोध करण्याची भूमिका सर्वांनीच व्यक्त केली. सामुदायिक नेतृत्वाच्या निर्णयानुसार इंडियाची ११ जणांची समन्वय समिती नियुक्त झाली. आघाडीचे मुख्यालय दिल्लीत असेल. तिसरी बैठक मुंबईत झाली. समन्वय समितीची ११ नावे तिथे ठरवली गेली. इंडिया आघाडीत काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि महाराष्ट्रापासून ईशान्य भारतापर्यंत, भारतीय राजकारणात सक्रिय असलेले २८ पक्ष निर्धाराने एकत्र आले आहेत.

**भाजप आणि आरएसएसला पहिली मात**

आणीबाणीनंतर १९७७ सालीही तत्कालिन विरोधक एकत्र आले होते. त्याचे स्वरूप मात्र इतके व्यापक नव्हते. दक्षिण

भारतातली बहुतांश राज्ये त्यात सहभागी नव्हती. संघाचे दुहेरी सदस्यत्व जनसंघाने कायम ठेवले होते. जनता पक्ष त्यामुळे काही महिन्यांतच फुटला. इंडिया नावाची नवी आघाडी त्या तुलनेत अधिक आश्वासक आहे. केवळ निवडणुकीतल्या जागा वाटपापुरती अथवा मत विभाजन टाळण्यापुरती ही आघाडी मर्यादित नाही. जनतेत नवी आशा, नवा विश्वास, नवा संवाद प्रस्थापित करण्याचा, सडकेपासून संसदेपर्यंत भारतातल्या सामान्य जनतेच्या आकांक्षांना आवाज प्राप्त करून देण्याचा या सर्वांचा ठाम इरादा दिसतो आहे. पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांच्या धमक्यांना यापुढे कोणी घाबरणार नाही. त्यांच्या इशाऱ्यावर होणाऱ्या यंत्रणांच्या कारवायांना ठामपणे सारे सामोरे जातील. देशातल्या घटनात्मक संस्था बर्बाद होऊ देणार नाही. एक-दोन लाडक्या उद्योगपतींना देशाची सार्वजनिक मालमत्ता विकण्यास कडाडून विरोध करू, असा सामुदायिक निर्धार सर्वांनी केलेला दिसतो. हुकूमशाही आणि अघोषित आणीबाणीसदृश सध्याच्या वातावरणात, देशाच्या राजकारणाला व्यापक आणि नवे वळण देणारी भूमिका त्यात स्पष्टपणे जाणवते आहे. वर्षभरात सार्वत्रिक निवडणुका होऊ घातल्या आहेत. या पार्श्वभूमीवर इंडिया नाव धारण करून, राजकारणाच्या सारीपाटावर दुसऱ्याच बैठकीत विरोधकांनी पंतप्रधान मोदी, सत्ताधारी भाजप आणि आरएसएसला पहिली मात दिली आहे.

**भाजप आणि त्यांचे सारे सवंगडी पुरते भांबावले**

I.N.D.I.A. (इंडिया) नावामुळे आणि विरोधकांच्या आक्रमक पावित्र्यामुळे पंतप्रधान मोदी, भाजप आणि त्यांचे सारे सवंगडी पुरते भांबावले. नेमके काय करावे तेच त्यांना सुचेना. बंगळुरुत विरोधकांची बैठक सुरू असताना पोर्टब्लेअरच्या सरकारी कार्यक्रमात विरोधकांचा कुत्सितपणे उल्लेख करीत पंतप्रधान म्हणाले, २०२४ च्या निवडणुकीपूर्वी २६ पक्षांचे नेते स्वत:ला वाचवण्यासाठी एकत्र आले आहेत. हा परिवारवादी भ्रष्टाचाऱ्यांचा कळप आहे. या सर्वांनी आजवर देशाला लुबाडले आहे. अशा आघाडीची सरकारे भारताची वेगाने प्रगती कदापि घडवू शकत नाहीत. मोदींना कोण समजावून सांगणार, की १९९० नंतर आर्थिक उदारीकरणापासून भारताचे सारे प्रगतिशील निर्णय, वेळोवेळच्या आघाडी सरकारांनीच घेतले आहेत. वाजपेयींच्या नेतृत्वाखालील NDA आणि मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील UPA यांचादेखील त्यात समावेश आहे. विरोधकांच्या बंगळुरू बैठकीवर अमित शाह, पक्षाध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्यासह भाजपचे तमाम लहान-मोठे नेते बारकाईने लक्ष ठेऊन होते. विविध राज्यांतल्या फुटकळ ३८ पक्षांना त्याच दिवशी सायंकाळी निमंत्रण देऊन त्यांनी गोळा केले. NDA ची बैठक तडकाफडकी आयोजित करण्याचा निर्णय घेतला. पंतप्रधान मोदींना लगेच त्याची कल्पना दिली. इंडियाचे २४ तर NDA चे ३८ अशा परसेप्शनची सरशी प्रस्थापित करण्याचा त्यामागे हेतू होता. मोदी सरकार सत्तेवर आल्यानंतर, शिवसेना आणि अकाली दल या NDA तल्या प्रामाणिक सहकारी पक्षांनी भाजपची साथ कालांतराने मतभेदांमुळे सोडली. २०१९ साली भाजपला ३०३ जागांचे स्पष्ट बहुमत प्राप्त झाले. NDA ची एकही बैठक त्यानंतर कधी झाली नाही. मोदींना त्याची गरजही भासली नाही. आता विरोधकांची भरभक्कम इंडिया आघाडी समोर दिसू लागताच भाजप आणि मोदींना अचानक NDA ची गरज वाटू लागली. या नव्या NDA मध्ये तसेच इंडियामध्ये नेमके कोणते पक्ष आहेत? कोणत्याही आघाडीशी अद्याप संलग्न नाहीत असे पक्ष कोणते? त्यावर सर्वप्रथम एक दृष्टीक्षेप टाकायला हवा.

**...बहुधा ते परिस्थितीचा अंदाज घेत असावेत**

आजच्या घडीला भाजपप्रणित NDA मध्ये एकट्या भाजपचे संख्याबळ आहे ३०१! उर्वरित ३७ पक्षांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर शिवसेना शिंदे गटाचे १३ सदस्य आहेत. तिसऱ्या क्रमांकावर दिवंगत रामविलास पासवानांच्या लोकजनशक्ती पक्षातील पशुपती पारस व चिराग पासवान असे दोन्ही गट मिळून ६ सदस्य तर अनुप्रिया पटेल यांच्या अपना दल सोनेलाल गटाचे २ सदस्य आहेत. उर्वरित पक्षांपैकी ७ पक्षांचा प्रत्येकी एक सदस्य लोकसभेत आहे. अजित पवार गटाचे एकमेव सुनील तटकरे त्यात आहेत. याखेरीज २५ पक्ष असे आहेत, की ज्यांचा एकही खासदार लोकसभेत नाही. NDA च्या बैठकीपूर्वी अकाली दलाचे सुखबीरसिंग बादल, तेलुगू देसम पक्षाचे चंद्राबाबू नायडू आणि राष्ट्रीय लोकदलाचे जयंत चौधरी या तीन नेत्यांना बऱ्याच आकर्षक ऑफर देत भाजपने आपल्या बाजूने ओढण्याचा भरपूर प्रयत्न केला. तथापि, यापैकी कोणीही NDA च्या बैठकीकडे फिरकले नाहीत. बहुधा ते परिस्थितीचा अंदाज घेत असावेत. बसप स्वबळावर लढणार असल्याची घोषणा दरम्यान मायावतींनी केली. तरी अंतिम टप्प्यात इंडिया आघाडीच्या बाजूने त्या वळू शकतील. २०१९ च्या निवडणुकीत भाजपने एकूण मतदानाच्या ३७ टक्के म्हणजे जवळपास २२ कोटी मते मिळवली. उर्वरित ३७ पक्षांना मिळालेल्या एकूण मतांची संख्या होती फक्त २ कोटी १० लाख!

**सोनिया गांधी महत्त्वाची भूमिका बजावू शकतील**

विरोधकांच्या इंडिया आघाडीत काँग्रेस ४९, द्रमुक २४, तृणमूल २३, जद (यू) १६, शिवसेना (उबा ठाकरे) गट ६ असे लोकसभेतले सध्याचे संख्याबळ आहे. उर्वरित पक्षांमध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट, राष्ट्रवादी शरद पवार गट, समाजवादी, नॅशनल कॉन्फरन्स जम्मू व काश्मीर, इंडियन मुस्लिम लीग यांचे प्रत्येकी ३ सदस्य, भाकप व व्हीकेसी तामिळनाडू यांचे प्रत्येकी २, याखेरीज आप, झारखंड मुक्ती मोर्चा, केरळ काँग्रेस (मणी) गट, MDMK व KMDK हे तामिळनाडूतले पक्ष व केरळातील क्रांतिकारी समाजवादी पक्ष यांचा प्रत्येकी १ सदस्य लोकसभेत आहे. राष्ट्रीय जनता दल, राष्ट्रीय लोकदल, अपना दल (कमेरावादी), पीपल्स डेमॉक्रॅटिक पार्टी जम्मू व काश्मीर, भाकप (एमएल), फॉरवर्ड ब्लॉक, केरळ काँग्रेस (जोसेफ) गट, MMK तामिळनाडू यांचा एकही सदस्य लोकसभेत नाही. २०१९ साली काँग्रेसला जवळपास १२ कोटी २२ लाख मते मिळाली होती. उर्वरित पक्षांना एकूण १३ कोटी १० लाख मते मिळाली होती. या सर्वांची एकूण बेरीज २५ कोटी १० लाख इतकी येते. भाजपप्रणित NDA पेक्षा ती अधिक आहे. इंडिया आघाडी अधिक मजबूत करण्यात सोनिया गांधी महत्त्वाची भूमिका बजावू शकतील.

NDA अथवा I.N.D.I.A. यांपैकी कोणत्याही आघाडीशी जे पक्ष

आजमितीला संलग्न नाहीत, त्यात आंध्र प्रदेशचा वायएसआर काँग्रेस २२, बिजू जनता दल १२, भारत राष्ट्र समिती, तेलंगणा ९, बहुजन समाज पार्टी ९, तेलुगू देसम आंध्र ३, MIM² तेलंगणा २, जद (एस) कर्नाटक १, असे या पक्षांचे लोकसभेत संख्याबळ आहे.





**जातींचा आधार विस्तारण्याची भाजपला सर्वाधिक गरज**

NDA आघाडी भाजपकेंद्रित आहे. NDA चे पंतप्रधानपदाचे एकमेव दावेदार नरेंद्र मोदीच आहेत. विरोधकांच्या इंडिया आघाडीने आपल्या दावेदाराचे नाव घोषित केलेले नाही. साहजिकच यंदाची लढाई इंडिया विरुद्ध मोदी आहे, असे म्हणता येईल. लोकसभेत सध्या भाजपच्या तुलनेत काँग्रेसचे संख्याबळ बरेच कमजोर आहे, मित्रपक्षांच्या आघाडीची त्यामुळेच त्याला अधिक गरज आहे. दक्षिण भारतातील ५ राज्यांत एकूण १२९ जागा आहेत. काँग्रेसप्रणित इंडिया तिथे खूपच मजबूत आहे. कर्नाटकातल्या काही जागा वगळता, भाजपला दक्षिणेत स्वबळावर एकही जागा मिळण्याची शक्यता नाही. पश्चिम व उत्तर भारतात गेल्या वेळी भाजपला उत्तर प्रदेश ६२, मध्य प्रदेश २८, गुजरात २६, महाराष्ट्र २३, प. बंगाल १८, बिहार १७, झारखंड ११, हरयाणा १०, छत्तीसगढ ९, आसाम ९, दिल्ली ७, उत्तराखंड ५, हिमाचल ५, त्रिपुरा व अरुणाचल प्रत्येकी २ असे सर्वोत्तम यश मिळाले होते. यंदा त्याची पुनरावृत्ती होणे सर्वथा अशक्य आहे, भाजपलाही याची पुरेपूर कल्पना आहे. २०२४ च्या निवडणुकीत बिहार आणि महाराष्ट्र या दोन मोठ्या राज्यांत कितपत यश मिळेल, याची भाजपला चिंता आहे. उत्तर प्रदेश व गुजरात या दोन राज्यांशिवाय अन्य राज्यांत पूर्वी मिळालेल्या जागा राखणेही भाजपला खूपच अवघड जाणार आहे. सध्या जे पक्ष NDA आघाडीत दाखल झाले आहेत, ते मुख्यत्वे विशिष्ट जातींशी संबंधित समुदाय आहेत. भाजपला आपली मतसंख्या वाढवण्यासाठी त्यांच्याशी डील करावे लागेल. कारण विविध जातींचा आधार विस्तारण्याची भाजपला सर्वाधिक गरज आहे.

**देशाची महत्त्वपूर्ण संपत्ती आपल्या मित्रांना राजरोस विकली!**

सलग ९ वर्षांच्या कार्यकाळात मोदींनी आणि त्यांच्या सत्ताधारी सवंगड्यांनी सर्वच क्षेत्रांत हवी तशी मनमानी केली. कवडीमोल भावाने देशाची महत्त्वपूर्ण संपत्ती आपल्या मित्रांना राजरोस विकली. परदेशातही विविध कंत्राटांचे लाभ त्यांना मिळवून दिले. बदल्यात भारताचा कोणताही दृश्यविकास त्यांच्या हातून घडला नाही. नोटबंदी, विचित्र पद्धतीने केलेल्या वस्तू व सेवाकराची आकारणी, यामुळे देशातले अनेक लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योग बर्बाद झाले. लाखो लोकांचे रोजगार गेले. बेरोजगारीने ४० वर्षातला उच्चांक देशाने गाठला. आवश्यक वस्तूंची महागाई भरमसाठ वाढली. कच्च्या तेलाचे भाव जगभर कमी असताना भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींनी शंभरी ओलांडली. डॉलरच्या तुलनेत भारतीय रुपया आणखी कमजोर झाला. निर्यात घटली. बड्या उद्योग घराण्यांच्या थकबाकीमुळे सार्वजनिक बँकांची अवस्था दारूण झाली. कोरोना महासाथीच्या काळात भारताची कमकुवत आरोग्यव्यवस्थाही जगासमोर आली. हिंदुत्वाचा व भाजपच्या सत्तेचा, देशभर विस्तार करण्याच्या अघोरी प्रयोगात, साऱ्या भारताला ठिकठिकाणी हिंसाचार व दंगलींना सामोरे जावे लागले. विरोधी पक्षांना नेस्तनाबूत करण्यासाठी ED, Income Tax, CBI सारख्या प्रमुख यंत्रणांचा सत्ताधाऱ्यांनी बिनदिक्कत गैरवापर केला. याच काळात देशातल्या प्रमुख घटनात्मक संस्था आपले सत्व गमावून बसल्या. आजवर कोणत्याही पंतप्रधानाने केला नव्हता इतका अफाट आणि अवास्तव खर्च, पंतप्रधान मोदींनी देशात आणि परदेशात व्यक्तिगत प्रचार-प्रसारासाठी केला. भारतीय संसदेच्या आदर्श कारभाराचा मोठ्या प्रमाणात संकोच या कालखंडात झाला. लोकशाहीचा चौथा स्तंभ मानल्या गेलेल्या प्रसारमाध्यमांचे रुपांतर सरकारच्या गोदी मीडियात झाले. सरकारी अनास्थेमुळे मणिपूरसारखे छोटे राज्य, नरसंहार आणि हिंसाचाराने होरपळून निघाले. लैंगिक अत्याचाराचे आरोप असलेल्या सत्ताधारी खासदाराला वाचवण्यासाठी, जागतिक क्रीडा स्पर्धेत भारताचे नाव रोशन करणाऱ्या महिला पहिलवान खेळाडूंवर दिल्ली पोलिसांनी राजरोस लाठीमार आणि अत्याचार केले. पंतप्रधान मोदी त्याच सुमारास काही फूट अंतरावर नव्या संसदेच्या वास्तूचे उद्घाटन करीत होते. या प्रकरणाची दखल त्यांनाही घ्यावीशी वाटली नाही. सत्ताधाऱ्यांच्या एक ना अनेक अशा किती पापांचा पाढा वाचायचा? तरीही पुढल्या वर्षी होणाऱ्या निवडणुकीच्या समरांगणात, आपल्याला कोणीही प्रबळ प्रतिस्पर्धी नाही, अशा सोयीस्कर भ्रमात पंतप्रधान मोदी आणि शाह यांची जोडी, भाजपसह समस्त संघपरिवार, असे सारेच दीर्घकाळ मस्तीत मग्न होते.

सत्ताधाऱ्यांचे अत्याचार आणि मनमानी कारभाराला लोक कंटाळलेत. विविध कारणांनी देशभर अस्वस्थता आहे. अशा वातावरणात 'नफरत के बाजार में मोहब्बत की दुकान' या आशादायक घोषणेचा प्रसन्न शिडकावा राहुल गांधींनी ३,५०० कि.मी. अंतराच्या 'भारत जोडो यात्रेत' देशभर केला. देशभरातले वातावरण तेव्हाच बदलायला प्रारंभ झाला होता. त्यानंतर अमेरिका असो की इंग्लंड, राहुल गांधींच्या परफॉर्मन्ससमोर परदेशातही पंतप्रधान सर्वार्थाने फिके पडू लागले. त्यांचे परदेश दौरे हास्यास्पद ठरू लागले. सत्ताधाऱ्यांच्या गोटात दाणादाण उडू लागली. त्यातच नुकत्याच स्थापन झालेल्या विरोधकांच्या इंडिया आघाडीने आता मोदी आणि भाजपची झोप उडवली आहे. इंडिया विरुद्ध मोदी अशा लढाईत अखेर कोण जिंकणार? 'चक दे इंडिया'ची हुरूप वाढवणारी हरहुन्नरी घोषणा पूर्वी आपण ऐकली असेलच. ती पुन्हा सार्थ ठरणार का? साऱ्या देशाला त्याची प्रतीक्षा आहे.

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार व लेखक आहेत.)**


# शिवशाही, निझामशाही आणि लोकशाही



संजय पवार

**शिवशाहीत लढताना क्षत्रिय मराठे, शेती करताना कुणबी मराठे, निझामशाहीत मराठे कुणबी मग आता लोकशाहीत मराठे नेमके कोण? हे शोधणार कोण? कसं? नि कधी? की ते सापडेपर्यंत फक्त मोर्चे, तंबू, कोर्ट, आयोग, समित्या नि सरकारी आश्वासनं?**

सध्या गल्लीपासून दिल्लीपर्यंत आरक्षणाचा मोसम आहे. दिल्लीत महिला आरक्षणाची प्रलंबित मागणी मोदी सरकारने कार्यान्वित केलीय. विरोधी पक्ष म्हणाले, हे वीस वर्षांपूर्वीचेच विधेयक प्रलंबित असलेले. तर सत्ताधारी म्हणाले, ते डिबार झालं! थोडक्यात, सरकारने आम्ही केलं या सदरात तूर्तास ते ठेवलंय. २०२४ ला ते पुन्हा सत्ताधारी झाले नाहीत, तर लोकार्पणाचे श्रेय नव्या सरकारला मिळेल. कारण हे विधेयक अंमलात यायला किमान २०२९ उगवेल. असो.



तोवर महाराष्ट्रात आरक्षणाची साथ पसरली. अनेकजण तंबू ठोकून बसतात, तसे मनोज जरांगे पाटीलही आरक्षणासाठी उपोषणाला बसले होते. त्यांची मागणीच आजवरच्या इतर मागण्यांपेक्षा वेगळी होती. त्यांचे म्हणणे मराठवाडा निझामशाहीत असताना मराठ्यांना कुणबी वा मराठा कुणबी प्रवर्गात ठेवले होते, जे तेलंगणात आजही लागू आहे. पण मराठवाडा महाराष्ट्रात आला आणि मराठा हा फक्त मराठा गणला गेला, कुणबी वगळलं. आता कुणबी असाल तर आरक्षण आहे. विदर्भात, कोकणात वगैरे मराठा कुणबी असे आरक्षण आहे म्हणतात ओबीसी म्हणून. तर जरांगे पाटलांची मागणी, मराठवाड्यातील मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र द्या निझामकालीन पूर्वलक्ष्यी पद्धतीने.

आता ते बसले होते तंबू ठोकून. पंचक्रोशीबाहेर फारशी चर्चा नव्हती. ते सकल मराठाचा बोर्ड लावून बसले होते. पण महाराष्ट्रातला सकल व अखिल मराठा शांतच होता. आपण अखिल मराठ्यांना आरक्षण द्या म्हणत असताना हा पाटील मराठवाड्यातल्या मराठ्यांना कुणबी मान्यता द्या म्हणतोय, हे कसं काय? तर जरांगे पाटलांचा तंबू वगळता बाकी मराठे शांत असताना पोलिसांना कुठून अवदसा आठवली आणि आंदोलकांना हलविण्याच्या नादात त्यांनी जो काय लाठीचार्ज केला, की त्यातून लहान, थोर, बाया, बाप्ये कुणीबी सुटलं नाय. मग काय झाला बोभाटा. पावसाच्या बातम्या दाखवून कंटाळलेले नि दुष्काळाच्या बातम्या दडपून थकलेले चोवीसतासी चॅनलवाल्यांनी रात्रीत जरांगे पाटलांचा अण्णा हजारे केला नि रोज बातमीत जालना आणि राजकीय नेते एकमेकांवर कुरघोडी करत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना तुम्ही जाल ना, म्हणून भंडावायला लागले. त्यातून मग जरांगे पाटलांचं गाव तीर्थक्षेत्रच झालं नि जरांगे पाटील ग्रामदैवत. तीन पक्षांच्या सरकारचे तीन तेरा वाजले. त्यात नेहमीप्रमाणे पोलिसांचे बळी देऊन पाहिले. ते ही जरांगे पाटलांच्या मनाप्रमाणे. सरकारने पोलिसांच्या बदल्या केल्या, तर पाटील म्हणले बदली नको निलंबित करा. सरकार सटपटले, पण लाठीमारच इतका प्रदर्शनीय व व्हायरल होता, की सरकारला बदलीचा आदेश, निलंबित असा बदल करून पारित करावा लागला.

सरकार हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभाच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगरात कॅबिनेट व त्यानिमित्ताने 'शासन आपल्या दारी'चा प्रयोग करण्याच्या तयारीत असतानाच जरांगे पाटील केंद्रस्थानी आले!

निझामाच्या खुणा पुसण्याच्या अमृतमहोत्सवी वर्षातच जरांगे पाटील निझामाचे दप्तर घेऊन आले नि आम्हाला मराठा कुणबी म्हणा आणि निझाम देत होता ते तुम्ही द्या!

आता हिंदुत्ववादी सरकार, औरंगाबादचं छत्रपती संभाजीनगर करणारं सरकार आपला कायदा लावणार का निझामाचा?

पण परिस्थिती स्फोटक व जरांगे पाटलांकडे दोन ठाकरे, दोन महाराज, याशिवाय सर्वपक्षीय रीघ लागलेली! त्यात मग कॅमेरे बघून रीघ वाढतच गेली. वडेट्टीवार म्हणू नका, इम्तियाज जलील म्हणू नका, की बच्चू कडू.

नेहमीप्रमाणे संकटमोचक जळगावनिवासी गिरीश महाजन अग्निशमक बंबासारखे पोहोचले. मग त्यांनी पासच काढला जालना-मुंबई व्हाया जळगाव.

पेचात पडलेल्या सरकारने जरांगे पाटलांच्या गळयात तो पेच टाकत त्यांना म्हणाले, निझामकालीन नोंदी आणा, दाखवा व प्रमाणपत्र घेऊन जा!

आता निझाम संपवून ७५ वर्षे झालेली. नोंदी कुठं नि कशा सापडणार? लगेच जरांगे पाटलांनी पवित्रा बदलला व म्हणाले, नोंदी कुठं शोधता? मराठवाड्यातल्या सर्व मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र द्या!

आता सावज सरकारच्या टप्प्यात आलं. म्हणाले, नोंदी असेल तर लगेच, सरसकट हवे असेल तर समिती नेमावी लागेल, किमान महिनाभर थांबावे लागेल. समिती आणि तिची कालमर्यादा म्हणजे काय हे कुठल्याही सरकारला चांगलेच कळत असल्याने कुठलेही सरकार समिती नेमण्यात हयगय करत नाही. निवृत्त न्यायाधीश/सनदी अधिकाऱ्यांसाठीची रोजगार हमी योजनाच असते ती!

तर समिती नेमली गेली. महिन्याचा वेळ ठरला. हो, ना करता करता मुख्यमंत्र्यांनी संत्र्याचा ज्यूस जरांगे पाटलांच्या गळी उतरवला नि माध्यमांचे तंबू जालन्यातून उठवून संभाजीनगरात कॅबिनेट मिटिंगसाठी घेऊन गेले. जरांगे पाटील महिनाभर तंबूतच राहणार, पण सरकार व माध्यमे महिनाभर तिकडे फिरकणार नाहीत.

जरांगे पाटलांना ज्यूस पाजून होत नाही तोवर ओबीसी आले रस्त्यावर. त्यांच्या मागे माध्यमं मेंढरासारखी धावताच, धनगर समाजाने उसळी मारून खरी मेंढरंच रस्त्यावर उतरवली! या भानगडीत पडळकर चेकाळले तर अनेक महिन्यांनी महादेव जानकर प्रकटले.

मधल्या काळात मराठ्यांना सरसकट कुणबी ठरवायला नारायण राणेंसह अनेकांनी विरोध केला, तर अनेक मराठे आम्हाला मराठा म्हणूनच आरक्षण हवे, असं मंद आवाजात म्हणत राहिले.

आता मागे जेव्हा एक मराठा लाख मराठा असं गर्जत लाखो मराठ्यांचे शांततापूर्ण मोर्चे निघाले, तेव्हा त्यांची मागणी होती मराठा समाजाला मागास प्रवर्गात घाला. पृथ्वीराज चव्हाण सरकारने दिलेले आरक्षण कोर्टात टिकले नाही. पण नंतरच्या फडणवीस सरकारने दिलेले आरक्षण वैध ठरले. पण केंद्रातून शिक्कामोर्तब व्हायच्या आत सरकार बदलले. ठाकरे सरकारच्या काळात पुन्हा कोर्टाने आरक्षण फेटाळले. सरकार महाराष्ट्राचेच, प्रस्ताव सरकारीच पण मुख्यमंत्री बदलले तसे कोर्टाचे निर्णय बदलले! या योगायोगाचा शोध घ्यायला एक समिती नेमायला हरकत नाही.

तर गंमत बघा. मंडल आयोगाची अंमलबजावणी होईपर्यंत आरक्षण म्हणजे बी.सी. बॅकवर्ड क्लास लोकांसाठी. महारा-मांगासाठी. सरकारी जावई. कमी मार्क तरी शिक्षणात प्रवेश, नोकरीत प्रवेश, पुढे बढतीत प्राधान्य. माजलेच की! अशी सर्वसाधारण समाजाची धारणा होती. त्यात सवर्ण आघाडीवर आणि आता ज्यांना ओबीसी म्हणजे अदर बॅकबर्ड म्हणजेच अन्य मागास म्हणतात, त्या समाजाचीही आरक्षणाकडे बघण्याची दृष्टी व वृत्ती सवर्णासारखीच होती आणि मराठे तर ९२/९६ कुळातच बोलायचे. पाटील, सरदार, असाच रूबाब. गावगाडा टाचेखाली ठेवायचा. देवाधर्मासाठी एक बामन आणि खतावण्या सांभाळायला एक वैश्य ठेवायचा. बाकी वाड्यापासून वहाणेपर्यंत सर्व खानदानी. मराठ्यांनी सरदार केलेले पेशवे अंगवस्त्रं ठेवायचे तसे मराठेही वाड्यावर एक व शेतावर एक संसार करू लागले.

मंडल आयोग लागू झाला नि गावगाडा आपल्या जात-पोटजातीचा आकडा ऐकून आणि सरकारी सोयी सवलती नि आरक्षणानं हरखून गेला. ओबीसी तर नव्याने जन्मल्यासारखा वावरू लागला. राजकारणात तोवर जन्माधिकार असल्यासारखे वावरणारे मराठे हळूहळू या आरक्षणांनी आक्रसू लागले. कारण ओबीसी संख्येने जास्त. त्यात काही ठिकाणी बीसी, ओबीसी, आदिवासी, भटके अशा संघटना वाढू लागल्या. कधी काळी लोहियांनी म्हटलेले 'पिछडा पावे सौ में साठ' हे सर्वत्र दिसू लागलं. देशाच्या/राज्याच्या राजकारणातून मराठ्यांसह, ठाकूर, बनिया नि ब्राह्मण अल्पसंख्य होऊ लागले. सत्ताचक्र बदलले. बीसी, ओबीसी, आदिवासी थेट मुख्यमंत्रीच झाले आणि कधीकाळी शिवीसारखं वापरलं जाणारं आरक्षण हे तत्त्व हरेक समाजालाच गरजेचं वाटू लागलं. मराठा तर आम्हाला मागास ठरवा म्हणून मागासवर्ग आयोगाकडे ठाण मांडून बसलेत, तर ब्राह्मणांसह राजपूत ठाकूर वगैरेंनी आर्थिक मागास म्हणवत आरक्षणात स्वत:लाही आणून बसवलंय.

कधीकाळी शिवीसारखे संबोधले जाणारे संबोधन आता उत्कर्षाची शिडी वाटतेय. त्यामुळे राज्यासह देशभर आरक्षण द्या म्हणत जागोजागी तंबू दिसतात. त्यात पंचायती राजने स्त्रियांना आरक्षण दिलं नि पुरूष नावाची जात अडचणीत आली. पण त्यांनी पूर्वी प्रचाराच्या घोषणेपुरती असलेली ताई, माई, आक्का प्रत्यक्ष राजकारणात आणली; मात्र आपल्याच घरची, पोटची, नात्यागोत्यातली! त्यातही जातवार आरक्षण असल्याने पुन्हा सगळा गावगाडा जातीकडून जातीकडे व जातीसाठी खावी माती म्हणत जातीतले महापुरूष, स्त्रिया शोधून शोधून काढायला लागला. आता तर लोकसभा नि विधानसभेत स्त्री आरक्षण! म्हणजे परत बाया हुडका नी इभ्रत वाचवा किंवा वाढवा!

अशा पार्श्वभूमीवर मारूती कांबळेसारखं जरांगे पाटलांचं काय होणार? आमची शिवशाही म्हणणारं सरकार निझामाच्या नोंदीवर शिक्कामोर्तब करणार, का विभागवार मराठा का कुणबी की मराठा कुणबी यावर खल करत बसणार?

'सकल'ची आंदोलने सुरू होती तेव्हा प्रसिद्ध विचारवंत, संशोधक, तुकारामाचे थेट वंशज मा.प्रा. सदानंद मोरे असं म्हणाले होते, की मराठा नि कुणबी एकच. (उर्वरित पान २० वर...)

# घटना दुरुस्ती केल्याशिवाय मराठा आरक्षण मिळणे अशक्य...!!



राजाभाऊ गडलिंग

**केंद्र सरकारने केलेल्या १०२ व्या घटनादुरुस्तीमुळे मराठा आरक्षणात अडचण निर्माण झाली असून, मराठा आरक्षणात अडचण ठरणाऱ्या संविधानातील परिच्छेद ३४२ (A) उपखंड ३६६,२६. (क) या तरतुदी वगळण्यासाठी किंवा घटनेत दुरुस्ती करून केंद्र सरकारने तसा विशेष अध्यादेश काढला तर मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटेल.**

आर्थिक निकषांवर आरक्षण द्यावे, अशी मागणी काही मराठा संघटनांनी आणि काही महत्त्वपूर्ण मराठा समाजातील काही राजकारणी मंडळीनी नुकतीच केली आहे. त्याचप्रमाणे इतर मागासवर्गीयांमध्येसुद्धा मराठा समाजाचा समावेश करावा याबद्दलही अनेकांनी आपले मत मांडले आहे. मात्र भारतीय राज्यघटनेत आर्थिक निकषांवर आरक्षण देण्याची मुळीच तरतुद नाही. नरसिंहराव सरकारने आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांचा जो उपवर्ग निर्माण केला होता तो सर्वोच्च न्यायालयाच्या इंदिरा सहानी विरुद्ध भारत सरकार या केसच्या निकालात ९ न्यायाधीशांच्या घटनापीठाने दि. १६ नोव्हेंबर १९९२ रोजी अशा प्रकारचे आरक्षण रद्द केले आहे. तत्कालिन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंहराव यांनी सन १९९१ मध्ये सवामधील घटकांना १०% आरक्षण दिले होते. मात्र निर्णय सर्वोच्च न्यायालयाने घटनाबाह्य ठरविला आहे.




भारतीय राज्यघटनेच्या मूलभूत अधिकारातील कलम १६ (४) नुसार मूलत: आरक्षण देण्यात आले असून, राज्यघटनेच्या कलम ३४० नुसार स्थापन झालेल्या मंडल आयोगाने इतर मागासवर्गीयांना (ओबीसी) आरक्षण दिले आहे. कलम १६ (४) व मंडल आयोगाने केलेल्या शिफारशींमध्ये मराठा समाजाचे आरक्षण या तरतुदीमध्ये बसत नसल्याचा निर्वाळा व न्याय प्रक्रियेमध्ये निर्णय दिला आहे. त्यामुळे घटनादुरुस्ती करून मराठा आरक्षण देण्यासाठी केंद्र सरकारने पुढाकार घ्यावा. त्याशिवाय मराठा आरक्षण मिळणे दुरापास्त आहे. सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट मत असे आहे, की भारतामध्ये ५०% च्यावर आरक्षण देता येणार नाही. त्यामुळे मराठा समाजाची जी मागणी आरक्षणाची आहे ती सर्वोच्च न्यायालयमध्ये टिकणे अतिशय कठीण आहे. वास्तविकरित्या मराठा समाजाला चुकीच्या मार्गाने अडचणीत न आणता भारतीय संसदेत मराठा आरक्षण मंजूर करून घेण्यासाठी कायदेशीर मार्गांचा अवलंब करावा, असे माझे मत आहे. आर्थिक निकषांवर समकालीन आरक्षण सर्वांसाठी असावे, असे मत काही राजकारणी मंडळींनी आणि मराठा समाजाच्या नेत्यांनी व्यक्त केले असले तरी, आर्थिक निकषांवर दिलेले आरक्षण हे व्यक्तिकेंद्रित होणार असून घटनादुरुस्ती करूनही तसे आर्थिक निकषांवर आरक्षण देता येणार नाही. वास्तविकरित्या संविधानकर्त्यांनी राज्यघटनेत आर्थिक निकषांवर आरक्षणाची तरतूद स्पष्टपणे केलेली नाही. त्यामुळे राजकारणी लोकांनी आर्थिक आरक्षणाची मागणी न करता मराठा आरक्षणाचा प्रश्न भारतीय संविधान, सर्वोच्च न्यायालयाच्या

अधिकारात राहूनच सोडविला पाहिजे. मंडल आयोगाने देशातल्या ५२% इतर मागासवर्गीयांना शैक्षणिक व सेवा क्षेत्रात २७% आरक्षण दिले. इंदिरा सहानी व इतरांनी त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. १६ नोव्हेंबर १९९२ रोजी सर्वोच्च न्यायालयाने या आरक्षणावर शिक्कामोर्तब करताना केंद्र व राज्य सरकारांनी या संदर्भात कायमस्वरूपी घटनात्मक आयोगाची स्थापना करावी, असा आदेश दिला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशावरून १५ मार्च १९९३ रोजी महाराष्ट्र शासनाने स्थायी समितीची नियुक्ती केली होती. नंतर या समितीचे नामकरण दिनांक १५ मे १९९५ पासून राज्य मागासवर्ग आयोग असे करण्यात आले. सदर आयोग हा अनु.जाती व जमाती वगळून इतर मागासवर्ग आणि प्रवर्ग यांच्यासाठी काम करतो. सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४ अन्वये या आयोगाचे कामकाज चालविले जाते. या आयोगामध्ये मराठा समाजासाठी कोणत्याही आरक्षणाची तरतूद व शिफारस नसतानाही राज्य सरकार आयोगाच्या पाठीमागे लागून विनाकारण वेळ खर्ची घालत आहे. माझ्या मते, मराठा आरक्षण विनाकारण लांबवित आहे. मराठा समाजाचा ओ.बी.सी.मध्ये समावेश करावयाच्या मागणीचा न्या. बापट आयोगाने सलग चार वर्षे सखोल अभ्यास केला. बहुमताने त्यांनी शासनाला दिलेल्या अहवालात मराठा समाज हा ओ.बी.सी. (OBC) साठी असलेल्या निकषांमध्ये बसत नसल्याने त्यांचा ओ.बी.सी.मध्ये समावेश करण्यासाठी दिनांक २३.०८. २००४ रोजी आयोग पुनर्रचना करण्यात आली. त्यादरम्यान या आयोगाचे अध्यक्ष न्या. बापट यांनी स्पष्टपणे मराठा आरक्षणाला नकार दिला आहे. त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आयोगाने शिफारस केल्याशिवाय राज्य सरकारला कोणत्याही जातीला ओ.बी.सी.मध्ये समाविष्ट करण्याचे अधिकार नाहीत, असा स्पष्ट निर्वाळा दिला आहे. २५ जुलै २००८ रोजी न्या. बापट आयोगाने आपला ऐतिहासिक अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर करून स्पष्ट बहुमताने मराठ्यांना ओ.बी.सी.मध्ये समाविष्ट करायला नकार दिला आहे. प्रत्यक्षात अहवाल शास्त्रीय आणि संवैधानिक कसोट्यांवर आधारित असून मंडल आयोगाने आणि त्याआधीच्या काकासाहेब कालेलकर आयोगानेसुद्धा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक असे शास्त्रीय निकष लावून इतर मागासवर्गीयांची यादी तयार केली आहे. त्यात कुणबी असून मराठ्यांना मात्र ओ.बी.सी.मध्ये स्थान नाही; परंतु राजकीय समीकरणासाठी राजकीय नेते मात्र मराठा व कुणबी एक आहेत असे सांगतात, हे अत्यंत चुकीचे आहे. कुणबी आणि मराठा एक नाहीत असा स्पष्ट निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला असून, त्यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. जगन्नाथ होले विरुद्ध महाराष्ट्र सरकार (रिट पिटिशन क्र :- ४४७६/२००२) या केसच्या दि. १७ ऑक्टोबर २००३ च्या निकालपत्रात हायकोर्टाच्या औरंगाबाद घटनापीठाने मराठा व कुणबी हे एकच आहे, असे मानायला स्पष्टपणे नकार दिला आहे. त्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५ एप्रिल २००५ रोजी शिक्कामोर्तब केले आहे. घटनात्मक तरतुदी व सर्वोच्च न्यायालयाचे याबाबतचे विविध संवैधानिक न्यायालयीन निकाल आणि राज्य व केंद्रीय मागासवर्ग आयोगांचे निर्णय या (सर्वोच्च न्यायालय घटकांनी) मराठा समाजाचे ओबीसीकरण अमान्य केले आहे. महाराष्ट्र राज्यात ओ.बी.सी.चे आरक्षण १९६७ पासून सुरू आहे. मात्र आताच मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी पुढे येण्याचे कारणही राजकीय असू शकते. भारतीय संविधानातील कलम - ७३, ७४ च्या दुरुस्तीने ग्रामपंचायत समित्या, जिल्हा परिषदा, मनपा, नगरपालिका आणि नगर पंचायतींमध्ये ओबीसींना २७% आरक्षण देण्यात आले आहे. मात्र मराठा समाज वर्णव्यवस्थेत क्षत्रिय मानला जातो. राष्ट्रकूट, कदंब, शिलाहार अशा राजघराण्यांतून आलेल्या मराठा समाजाने महाराष्ट्रासह अनेक मराठा नेतृत्व दिलेले असताना त्यांनी केवळ सत्तेची मोठमोठी पदे पदरी बाळगून गावगाड्यातील गरीब मराठा जनतेकडे पूर्णत: दुर्लक्ष केलेले आहे. भारतीय संविधानाची निर्मिती सुरू असताना घटना परिषदेत अनेक मराठा नेते असूनही घटना तयार करताना मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी कोणत्याही राजकीय पुढाऱ्यांनी केलेली नव्हती. सन १९६७ पासून आलेल्या ओ.बी.सी. प्रवर्गाच्या शैक्षणिक व सेवाविषयक आरक्षणातही आजपर्यंत वाटा मागितला गेला नाही. त्यामुळे सध्या मराठा आरक्षणाची मागणी ही केवळ राजकीय हेतूने राजकीय पुढारी करीत असल्याचा ओ.बी.सी.चा आरोप आहे. उच्च वर्गामध्ये निश्चितच अनेक जाती अशा आहेत, की ज्यात गरिबांचे प्रमाण मोठे आहे. अशा मराठ्यांमधील उच्चवर्णीय नागरिकांच्या शैक्षणिक, आर्थिक उत्थानासाठी संविधाननिर्मात्यांनी भारतीय राज्यघटनेतील कलम ३८, ३९, ४१ ब ४६ नुसार शैक्षणिक व आर्थिक विकासाच्या अनेक योजना अंमलात आणण्याची जबाबदारी प्रामुख्याने राज्य व केंद्र सरकारवर टाकलेली आहे. मात्र आजपर्यंत प्रामुख्याने महाराष्ट्रात सर्वाधिक मराठा मुख्यमंत्री अधिकारावर असताना त्यांनीसुद्धा 'मराठा' समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी कोणताही ठोस कार्यक्रम हाती घेतलेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग अधिनियम, २००५ अन्वये चालते. या कायद्यानुसार आयोगाला 'दिवाणी न्यायालयाचे अधिकार' देण्यात आले आहेत. या आयोगाने दिलेला सल्ला किंवा केलेली शिफारस राज्य शासनावर बंधनकारक असते; परंतु राज्य शासन या आयोगाच्या शिफारशींकडे जाणूनबुजून डोळेझाक करतात आणि या आयोगाचे जे काही अहवाल निर्मित असतात ते अनेक वर्षे प्रलंबित तसेच मंत्रालय स्तरावर धूळखात पडलेले असतात. त्यामुळे आयोगाचे निर्णय महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून तसेच प्रलंबित पडलेले आहेत. कालेलकर आयोग आणि मंडल आयोगाने मराठा समाजाला ओबीसीचे आरक्षण स्पष्टपणे नाकारले. एवढेच नाही, तर त्यानंतर आलेल्या मुटाटकर समिती, न्या. खत्री आयोग, केंद्रीय मागासवर्ग आयोग आणि न्या. बापट आयोग या सर्वांनीच मराठा समाजाला ओ.बी.सी. सूचित टाकायला स्पष्ट नकार दिला आहे.

**तामिळनाडू : ६९% आरक्षण पॅटर्न :-**

वास्तविक, भारतात फक्त तामिळनाडू हे एकच राज्य आहे, की जिथे ६९% आरक्षण देण्यात आले आहे. त्यासाठी केंद्र सरकारने घटनादुरुस्ती करून ९ वी अनुसूची तयार करून हे आरक्षण देण्यात आले आहे. आरक्षणात वाढ करण्यासाठी राज्यघटनेतील अनुच्छेद-१६ (४) च्या आधारावर आरक्षण कायदा करण्यात

येऊ शकतो. त्यासाठी मराठा नेत्यांना केंद्र सरकारवर दबाव टाकून तो करून घ्यावा लागेल. हा अधिकार संसदेला असून ९ व्या परिशिष्टात हा विषय टाकण्यासाठी घटनादुरुस्ती आवश्यक आहे आणि त्याला विशेष बहुमताची गरजसुद्धा लागते. वास्तविक, तामिळनाडूच्या सर्व संसद सदस्यांनी एकमुखी आग्रह धरून राज्य सरकारच्या कायद्याला घटनादुरुस्ती करून (९ व्या परिशिष्टात तरतूद करून घेतली आहे) सन-१९९३ श्रीमती जयललिता यांनी या तामिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी असताना ६९% आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर राज्यघटनेत दुरुस्ती करण्यासाठी त्यांनी केंद्र सरकारवर दबाव टाकून घटनेच्या नवव्या परिशिष्टामध्ये त्याची तरतूद करायला केंद्र सरकारला भाग पाडले. त्यामुळे तामिळनाडूच्या ६९% आरक्षणाला भारतीय राज्यघटनेचेसुद्धा संरक्षण कवच मिळाले आहे; परंतु भारतीय संविधानाच्या ९ नव्या परिशिष्टामध्ये आरक्षणाची तरतूद केल्याने दहा वर्षात याचा फेरआढावासुद्धा घेतला जाऊ शकत नाही, ही वस्तुस्थिती आहे; परंतु तामिळनाडूतील आरक्षणाच्या तरतुदीची वैद्यता सन २००४ मध्ये संपली आहे. हे आरक्षणाचे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून, सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात निर्णय राखून ठेवलेला आहे.



सन १९९५ ते २००८ या कालावधीत मराठा आरक्षणाच्या मुद्यावर आलेल्या सर्वच आयोगांनी मराठा आरक्षणाला विरोध केला आहे. मराठाविषयक सात नकारार्थी अहवाल महाराष्ट्र शासनाकडे आले, तरीही महाराष्ट्र सरकार पुन्हा या विषयाला घेऊन राज्य मागासवर्ग आयोगाकडे जाणार म्हणजे पुन्हा मराठा आरक्षण कायमचे झुलवत व प्रलंबित ठेवणार असल्याचा निष्कर्ष यातून निघत आहे. घटनेच्या कलम ३४० अन्वये ओ.बी.सी. पाहणी करण्यासाठी प्रथम १९५३ मध्ये काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या आयोगाने आपल्या अहवालात राज्यवार इतर मागासजातींची यादी दिली आहे. मुंबई राज्याच्या यादीत ३६० इतर मागास जाती आहेत. त्यात क्र. २०६ वर कुणबी आहेत. मात्र या यादीत मराठा जातीचा कुठेही उल्लेख दिसत नाही. वास्तविक, भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४०-१६(४), १५(४), १५(४), १५(५) अन्वये मिळणारे आरक्षण फक्त ज्या मागासवर्गीय समाजघटकांना कोणत्याही क्षेत्रात पुरेसे प्रतिनिधित्व नसते, अशाच समाजघटकांना देण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे या कलमांद्वारे मराठा समाजाला आरक्षण मागितले जात आहे; परंतु मराठा आरक्षण देण्याची घटनेत कोणतीही तरतूद नसल्याने या कलमांद्वारे मराठा आरक्षण द्यायचे असले तर केवळ राज्य मागासवर्ग आयोगांवरच अवलंबून न राहता भारतीय संविधानात यासाठी घटनादुरुस्ती करणे गरजेचे आहे. त्यासाठी भारतीय संसदेमध्ये मराठा आरक्षण चर्चेस येणे महत्त्वाचे आहे.

केंद्र सरकारने केलेल्या १०२ व्या घटनादुरुस्तीमुळे मराठा आरक्षणात अडचण निर्माण झाली असून, मराठा आरक्षणात अडचण ठरणाऱ्या संविधानातील परिच्छेद ३४२(A) उपखंड ३६६,२६ (क) या तरतुदी वगळण्यासाठी किंवा घटनेत दुरुस्ती करून केंद्र सरकारने तसा विशेष अध्यादेश काढला तर मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटेल.

केंद्र सरकारने सन २०१७ मध्ये केलेल्या १०२ व्या घटनादुरुस्तीतील परिच्छेद ३४२ (A) व उपखंड ३६६ (२६)-क या तरतुदीमुळे राज्य सरकारच्या अधिकारात अडचण येत असल्यामुळे संबंधित राज्य सरकार सुप्रिम कोर्ट व भारतीय संविधानाच्या विरोधात जाऊ शकत नाही. ही वास्तविकता आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्यामध्ये मराठा समाजाला आरक्षण द्यायचं असेल, तर भारतीय संसद व सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारात राहून हा प्रश्न सोडवता येईल. आरक्षणाचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयाअंतर्गत असल्यामुळे राज्य सरकारला कोणताही अधिकार नाही.

महाराष्ट्र राज्यामध्ये मराठा आरक्षण लागू करण्यासाठी मोर्चे काढून किंवा आंदोलन करून याचा कदापि फायदा मोर्चेकऱ्यांना होणार नाही. यासाठी मराठा समाजाच्या नेत्यांनी एकत्रित येऊन देशाच्या पार्लमेंटमध्ये या विषयावर विशेष अध्यादेश काढण्यासाठी पुढाकार घ्यावा व सर्वोच्च न्यायालय आणि संसद देशाच्या या दोन स्तंभामध्ये राहूनच मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवता येईल, असे माझे स्पष्ट मत आहे.

सन २००४ मध्ये काँग्रेसचे सरकार केंद्रात असताना केंद्र सरकारच्या वतीने मराठा आरक्षणाबरोबरच सर्वच आरक्षणाचा अभ्यास करण्यासाठी खासदारांच्या समितीची निर्मिती करण्यात आली होती. या समितीने सन २००५ मध्ये आपला अहवाल केंद्र सरकारकडे सादर केला. या अहवालात प्रामुख्याने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा हटविण्याची महत्त्वपूर्ण शिफारस संसदेला केली होती. हा अहवाल केंद्र सरकारने स्वीकारला तर मराठा समाजाला १६% आरक्षण मिळू शकते; परंतु यासाठी महाराष्ट्रातील मराठा नेत्यांनी एकत्र येऊन हा लढा संसद व सर्वोच्च न्यायालयात लढायला पाहिजे. ●●●

**(लेखक मुक्त पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते आहेत)**

# राज्यकर्त्यांना मराठवाड्यातील दहा हजार शेतकरी आत्महत्यांचा विसर...



प्रा.एच.एम. देसरडा

**शेतीची कुंठित अवस्था व शेतकरी-शेतमजुरांची दैन्यावस्था ही विभागातील अव्वल समस्या असून गत १२ वर्षांत दहा हजारांहून अधिक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची नौबत आली. खरे तर याकडे शासनाचे लक्ष वेधणारा अहवाल विभागीय आयुक्तालयाने सादर केला आहे. दहा लाख शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणावर आधारित या अहवालात एक बाब प्रकर्षाने समोर आली, की यापैकी लाखाहून अधिक शेतकरी हतबल, हताश, निराश होऊन आत्महत्येला कवटाळण्याच्या मानसिकतेत आहेत. असे असताना सरकारने या अहवालाची दखल का घेतली नाही, हा एक गंभीर प्रश्न आहे.**

सांप्रत भारतातील १४० कोटी व महाराष्ट्रातील १४ कोटी लोकांसाठी करण्यात येत असलेल्या विकास योजनांचा जयघोष जोरात आहे. जी-२० समूहाच्या दिल्ली येथील परिषदेत पंतप्रधान मोदी यांच्या निवेदनाचा सूरनूर बघता, भारत 'महासत्ता' बनला असून दारिद्र्य, कुपोषण, अभावग्रस्तता, विषमता, हिंसा, बेरोजगारी या समस्यांवर मात करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, येत्या ३ वर्षांत भारत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होणार असून त्यात महाराष्ट्राचा हिस्सा एक ट्रिलियन म्हणजे एक लाख कोटी डॉलर असेल, असे शिंदे-फडणवीस वारंवार सांगत आहेत!



उपर्निर्दिष्ट पार्श्वभूमीवर मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या अमृतमहोत्सवप्रसंगी १६ सप्टेंबरला झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाडा विभागासाठी ५९ हजार कोटी रुपयांचे एक पॅकेज जाहीर करण्यात आले. यात प्रामुख्याने सिंचन प्रकल्प, वॉटरग्रीड, पश्चिमेतील नद्यांचे पाणी वळविणे व अन्य काही बांधकाम प्रकल्पांचा समावेश आहे. यातून कष्टकरी जनतेच्या नेमके किती व काय पदरी पडेल?

**मराठवाड्याची आजची मुख्य समस्या :**

या विभागाचे क्षेत्रफळ ६५ लाख हेक्टर आहे. २०२२ साली लोकसंख्या सव्वादोन कोटी होती. राज्याच्या अनुक्रमे २१% व १६% आहे. यंदा संपूर्ण ऑगस्ट महिना कोरडा गेल्यामुळे व सप्टेंबर महिन्यातदेखील सर्वत्र सरासरी भरून काढील एवढा पाऊस न झाल्यामुळे, खरीप पिकाला फटका बसला आहे. परिस्थिती सुधारली नाही, तर रब्बीदेखील धोक्यात असेल! शेतीची कुंठित अवस्था व शेतकरी-शेतमजुरांची दैन्यावस्था ही विभागातील अव्वल समस्या असून गत १२ वर्षात दहा हजारांहून अधिक शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची नौबत आली. खरे तर, याकडे शासनाचे लक्ष वेधणारा अहवाल विभागीय आयुक्तालयाने सादर केला आहे. दहा लाख शेतकऱ्यांच्या सर्वेक्षणावर आधारित या अहवालात एक बाब प्रकर्षाने समोर आली, की यापैकी लाखाहून अधिक शेतकरी हतबल, हताश, निराश होऊन आत्महत्येला कवटाळण्याच्या मानसिकतेत आहेत. असे असताना सरकारने या अहवालाची दखल का घेतली नाही, हा एक गंभीर प्रश्न आहे.

एवढ्या गंभीर समस्येबाबत मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री अथवा मंत्रिमंडळाने कोणतेही वक्तव्य व कार्यवाही न करणे हे कशाचे द्योतक आहे? थोडीथोडकी नव्हे, दहा हजार (१०,००० म्हणजे एकावर चार शून्य) शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची मजबुरी ओढवणे हेच मुळी शिवाजी महाराज-शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्राला

अत्यंत नामुष्कीचे आहे. महाराष्ट्रातील ३५० आमदार व पन्नाशेक खासदार असलेल्या ४०० लोकप्रतिनिधींपैकी बहुसंख्य ग्रामीण भाग व शेतकरी जाती-वर्गातून येतात. त्यांना हा प्रश्न अव्वल महत्त्वाचा, सर्वोच्च प्राधान्याचा का वाटत नाही?

**पुढारी-अधिकारी मालामाल, जनतेचे हाल :**

ताज्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील ८० टक्के शेतकऱ्यांचे, शेतमजुरांचे दहमहा कौटुंबिक उत्पन्न दहा हजार रुपयांपेक्षा कमी आहे. मुख्यत: शेतीत कष्टाचे काम करणाऱ्या व अन्य श्रमजीवी कुटुंबियांना ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक, पोलीस व अन्य कारकुनी करणाऱ्यांचेदेखील उत्पन्न मिळत नाही म्हणून तर आरक्षणासाठी आटापिटा करत आहेत. मात्र, आमचे बहुसंख्य लोकप्रतिनिधी कोट्यधीश (बरेच महाभाग अब्जाधीश) आहेत. ते लाखो रुपये किमतीच्या मोटारगाड्या व तारांकित सरंजामात वावरताना लोक बघत असतात! मंत्रिमंळाच्या बैठकीनिमित्त शंभर-दोनशे मोटारगाड्या होत्याच की दिमतीला!! सांख्यिकी मोजदादीने ४०० आमदार-खासदारांएवढेच भारतीय प्रशासन सेवेतील (आयएएस) अधिकारी तसेच दोनेकशे पोलीस व अन्य सेवेतील अधिकारी आहेत. संविधानिक व अन्य कायदेशीर तरतुदीनुसार ते 'सार्वजनिक सेवक' आहेत; परंतु ते सत्ताधाऱ्यांच्या घरगड्यासारखे वागतात. त्यांनी आपल्या जनतेप्रती असलेल्या दायित्वाचे थोडे जरी स्मरण केले, तरी विकास नावाचा जो डोंबारी खेळ चालला आहे त्याचे व्यैर्थ्य लक्षात येईल. कधी तरी याचा त्यांनी अंतर्मुख होऊन इमानदारीने विचार करावा आणि व्यापक जनहितार्थ आवश्यक तो सल्ला मंत्र्याना द्यावा, हे त्यांचे आद्यकर्तव्य आहे.

या संदर्भात एक बाब आवर्जून लक्षात घेतले पाहिजे, की विकास व प्रशासनाचा ढाचा मूलत: निसर्ग व श्रमजनविरोधी आहे. लोकांना कच्चा माल बनवून आपल्या गाड्या, बंगले, चंगळवादी जीवनशैलीला कवटाळून राहिले, तर मग शेतकरी आत्महत्येचे काय वाटणार? अर्थात, तोबऱ्याबरोबर लगाम येतो म्हणतात, त्यानुसार हे सर्व राजरोस चालले आहे. तात्पर्य, लोकप्रतिनिधी, अधिकारी, अन्य व्यावसायिक, सर्व तऱ्हेचे कंत्राटादार यांची सध्या अभद्रयुती झाली आहे. त्यामुळेच ही धनदांडगेशाही बेबंद झाली आहे. कितीही अप्रिय वाटले तरी हे कटू सत्य आहे. येथे आणखी एका बाबीचा निर्देश करणे अत्यावश्यक आहे, तो म्हणजे विकासाचे प्रचलित प्रारुप हे मुळातच विनाशकारी आहे. वाढवृद्धी म्हणजे विकास नव्हे! किंबहुना निसर्गव्यवस्थेत अनाठायी व अविवेकी हस्तक्षेप करणारी वाढवृद्धी यामुळेच हवामानबदलाचे संकट ओढवले आहे. पर्जन्य-चक्रात झालेले बदल या वातावरणीय बदलाचा अविभाज्य भाग आहे, एलनिनो, लानिनाचे संचयी व चक्राकार परिणाम होत अवर्षण, दुष्काळ, चक्रीवादळे, महापूर व अन्य घटनांची वारंवारिता व व्यापकता वाढत आहे. शेती, मत्स्यकाम, वने, पशूपालन करणाऱ्यांवर याचा अत्यंत प्रतिकूल परिणाम होतो. पीकबुडी, कर्जबाजारीपणा व आत्महत्या हा त्यांचा जीवनकलह दिवसेंदिवस अत्यंत उग्र होत आहे.

**विकासप्रणालीत आमूलाग्र बदल आवश्यक :**

मराठवाडा विकासाचे नावे घोषित करण्यात येणारे तेच ते सिंचनप्रकल्प हे खचितच सध्याच्या शेती अरिष्टावर मात करण्यासाठी उपयोगी नाहीत. आजी-माजी सरकारांनी आजवर जे सिंचन, रस्ते व अन्य बांधकाम प्रकल्प जारी केले, ते कंत्राटदार व त्यांच्या राजकीय पाठीराख्यांच्या तुंबड्या भरणारे आहेत. अनेक स्वतंत्र अभ्यासक व समित्यांनी या बाबी अधोरेखित केल्या आहेत. मात्र, आपले राज्यकर्ते हे मुळातच साधननिरक्षर (रिसोर्स इल्लिटरेट) व भ्रष्ट असल्यामुळे परतपरत तेच ते प्रकल्प व पॅकेज जाहीर करत राहतात! वास्तविक पाहता, पर्यावरणाचा विनाश करणाऱ्या सिंचन, वीज व रस्ते प्रकल्पांची सद्दी केव्हांच संपली आहे. त्याऐवजी पर्यावरणाचे रक्षण-संवर्धन करणारे मूळस्थानी (इनसिटू) मृद व जलसंधारण, वनीकरण, नूतनीकृत होण्याची क्षमता असणाऱ्या जैव, सौर व पवन ऊर्जा यांवर भर दिला पाहिजे. स्थानिक संसाधने व श्रमशक्तीवर आधारलेले हे प्रकल्प कमीत कमी खर्च व वेळात जनतेच्या मूलभूत पाणी, सिंचन व ऊर्जा या गरजा पूर्ण करू शकतात. आज गरज आहे सेंद्रिय शेती व त्यासाठी संरक्षित सिंचन याची.

सध्या अवर्षण व दुष्काळाचे प्रश्न गंभीर असून राज्यातील व मराठवाडा विभागातील अवर्षण-दुष्काळ-पाणीटंचाईची सद्य:स्थिती लक्षात घेऊन या समस्यांच्या निवारण व निर्मूलनासाठी पुढील उपाययोजना सुचवत आहोत.

**निवारण-निर्मूलन कृती कार्यक्रम :**

शासनाने सर्व जलसाठे (भूपृष्ट व भूजल) मानव व पशूंना पिण्यासाठी, आरोग्य व अन्य जीवनावश्यक सेवासुविधांसाठी आरक्षित करावेत. सार्वजनिक तसेच खासगी विहिरी, शेततळीही जलसाठे व जलस्त्रोत सरकारने 'नियंत्रित' व अधिग्रहित करावीत.

ऊस पिकाला पाणी देणे थांबवून सध्या असलेले ऊस पीक चाऱ्यासाठी वापरण्यात यावे. सरकारने ते हमीदराने खरेदी करावे. साखर कारखान्यांना गुरांसाठी छावण्या काढण्यास सांगावे. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील गावांमध्ये ठायीठायी व अन्यत्र गरजेनुसार छावण्या सत्त्वर काढाव्यात.

'मनरेगा' आणि राज्याच्या रोजगार हमी योजनेद्वारे कामे सुरू करावीत. यात प्रामुख्याने 'माथा ते पायथा', अशा शास्त्रशुद्ध पद्धतीने एकात्मिक लघू पाणलोटक्षेत्र विकासाची कामे हाती घ्यावीत. याअंतर्गत मृद व जलसंधारण, वनीकरण-कुरणविकास केल्यास कायमस्वरूपी दुष्काळ निर्मूलन शक्य होईल. फलोत्पादन तसेच अन्य शेती उत्पादनांसाठी, पशूपालनासाठी शास्त्रशुद्ध पाणलोट विकासाचा पाया अत्यावश्यक आहे. आजवर तो न केल्यामुळे मोसंबी व अन्य फळबागांना सिंचनाचा आधार मिळाला नाही. परिणामी, पाच-सात वर्षांत उग्र अवर्षण झाले, की बागा सुकतात, फळे गळतात, जसे सध्या होत आहे. नियोजनअभाव व चुकीचे धोरण यामुळे हे घडते.

रोजगार व उत्पन्नांसाठी शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकरी, शेतमजूर, कारागिरांच्या मुलामुलींचे शिक्षण खंडित होऊ नये म्हणून त्याना 'फी माफी' तसेच विनामूल्य राहण्याखाण्याची व्यवस्था उपलब्ध करून दिली जावी.

स्पर्धा परीक्षा व अन्य प्रवेश परीक्षांसाठी आकारले जाणारे शुल्क तहकूब करण्यात यावे. खरे तर, युवक व शिक्षितांच्या बेरोजगारीचे स्वरूप लक्षात घेता सार्वजनिक क्षेत्रातील कोणत्याही नोकरीसाठी

अर्जशुल्क आकारले जाऊ नये. याचा बोजा राज्य सरकारने, संबंधित सार्वजनिक उपक्रमाने सोसावा. हताश-निराश तरुणांसाठी किमान एवढे तरी करायला हवे.

शिधावाटप योजना चोख करण्यात यावी. क्रयशक्तीनुसार हवे तेवढे, हवे तेव्हा शिधा देण्यात यावा. शिधा व्यवस्थेत तृणधान्यांखेरीज डाळी व तेल पुरविण्यात यावे. ज्वारी, बाजरी, रागी ही भरडधान्ये मागणीनुसार दिले जावे.

अन्न, वस्त्र, निवारा तसेच शिक्षण, आरोग्य, ऊर्जा (घरवापराची वीज/स्वयंपाकाचा गॅस) आणि सामाजिक सुरक्षा ही प्रत्येक व्यक्तीस सर्वत्र, सर्वदूर मोफत/नाममात्र/सवलतीच्या दराने पुरवले जावे. सेवा हमी आयोगाने याच्या पुरवठ्यांच्या व्यवस्थेची सातत्याने निगराणी करावी. सध्या ५०० हून अधिक सेवासुविधांचा त्यात अंतर्भाव आहे. मात्र, आज ही हमी केवळ कागदावरच असल्याचे जाणवते. याविषयी सदरील आयोगाने शहरोशहरी, गावोगाव, मोहल्ला, वस्त्यात मेळावे घेऊन जनजागरण, प्रबोधन व प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी.

विभागीय महसूल आयुक्तालयाने केलेल्या सर्वेक्षणानुसार, मराठवाड्यात लाखभर शेतकरी अत्यंत हलाखीत असून आत्महत्येच्या मानसिकतेत आहेत. त्यांना सत्त्वर मानसिक व आर्थिक आधार देणे अत्यावश्यक आहे. या गंभीर आपत्ती टाळण्यासाठी लोकप्रतिनिधी-अधिकारी यांनी संयुक्तपणे बैठका घेऊन त्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले पाहिजे. किंबहुना, हे त्यांचे सेवादायित्वच नव्हे तर कायदेशीर जबाबदारी लेखून आत्महत्या झाल्यास त्यांना जबाबदार ठरवले जावे.

अन्नपाणी पुरवठ्यापासून शाळा, दवाखाने, निवारा, ऊर्जा, सेवासुविधा पुरविणाऱ्या संस्था व यंत्रणेने या वस्तू व सेवा सर्वांना सर्वदूर आवश्यक त्याप्रमाणे आणि चांगल्या गुणवत्तेच्या मिळाव्यात, यासाठी स्वत: होऊन लाभधारकांपर्यंत पोहचले पाहिजे. त्यात हयगय झाल्यास, उणिवा राहिल्यास त्याची जबाबदारी त्या यंत्रणेच्या प्रमुख व संबंधित कर्मचाऱ्यांची (शिक्षक, डॉक्टर आदी) आहेच व ती नव्याने मुक्रर करून कुणीही पात्र लाभदायक त्यापासून वंचित राहणार नाही, अशी सक्षम प्रशासकीय व्यवस्था सर्वत्र कार्यरत करण्याची आज नितांत गरज आहे.

प्रत्येक कुटुंबला किमान दहा हजार रुपये उत्पन्न स्वंयरोजगार आणि/अथवा सार्वजनिक रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मनरेगाअंतर्गत एका वर्षात किमान २०० दिवस काम व त्यासाठी दररोज ५०० रुपये श्रममोबदला मिळेल, याची सुनियोजित व्यवस्था असावी. शहरी भागातही अशी रोजगार हमी लागू करून सामाजिक सेवासुविधा व स्थायी मत्ता निर्माण करण्यास सर्वोच्च प्राधान्य असावे.

कोळसा, तेल व वायू ही खनिज इंधने न वापरता (किंवा अत्यल्प वापरून) स्थानिक जैवसंसाधने व श्रमशक्ती वापरणारे विकेंद्रित विकास प्रारुप यावर भर असावा.

आरोग्यास हानिकारक तंबाखू, मद्यार्क व अन्य अमली पदार्थांचे उत्पादन, वितरण व सेवनास कायद्याने बंदी घालण्यात यावी. सध्या देशातील जनतेचे यावर २० लाख कोटी व राज्यातील जनतेचे यावर २ लाख कोटी रुपये वाया जातात!

सारांश, भव्यदिव्य सिंचन व अन्य प्रकल्पांच्या ५९ हजार कोटी रुपयांच्या अगडबंब आकड्यांपेक्षा तातडीने वर सुचवलेल्या उपाययोजना केल्या, तर दारिद्र्य-दुष्काळ-आत्महत्याग्रस्त जनतेला काही दिलासा मिळेल. अन्यथा, पॅकेज व लिकेजचा डोबांरी खेळ जारी राहील. ●●●

**(लेखक विख्यात अर्थतज्ज्ञ असून महाराष्ट्र राज्य नियोजन मंडळाचे माजी सदस्य आहेत.)**

# शिवशाही, निझामशाही आणि लोकशाही

**(पान १४ वरुन)**

मराठा हे क्षत्रिय या अर्थाने वापरले जायचे, तर युद्ध सुरू झाले की क्षत्रिय म्हणजेच मराठा तलवार घेऊन लढाईवर जायचा आणि लढाई संपवून परत आला, की शेतात नांगर धरत कुणबी व्हायचा! साधारण हीच मांडणी साहित्यात नेमाडे, पठारे वगैरे मंडळी करतात.

याचा अर्थ शिवशाहीत व निझामशाहीत मराठा-कुणबी हेच वास्तव होते.

छत्रपती शिवाजी महाराज व मोगलांच्या दरबारात मराठे सरदार जे होते, तेच पुढे ९२/९६ कुळी झाले असावेत. पेशव्यांनी काही ब्राह्मण सरदार केले!

आता मुद्दा असा येतो, की जरांगे पाटलांना मराठा सरसकट कुणबी हवा. राणेंना मराठा सरसकट कुणबी नको. संभाजीराजे, उदयनराजे मराठा आरक्षणाच्या लढाईत उतरतात खरे. पण तेही सांगत नाहीत की मराठा कोण? कुणबी कोण? आणि आता आरक्षण हवे म्हणून मागासवर्गीय आयोगाकडे साक्षी पुरावे देणारा मराठा कोण?

हिंदू परंपरेने बापाची जात ही मुलाची जात समजली जाते. पत्नीची जात ही पतीची जी जात तीच समजली जाते. (लग्न आंतरजातीय/पोटजातीय असेल व पत्नीची हरकत नसेल तर) मग मराठे शिवरायांचे वंशज मानले तर जोतिबा फुलेंच्या म्हणण्यानुसार कुळवाडी भूषण म्हणजे कुणबीच! राज्याभिषेकास नकार देणाऱ्या ब्राह्मणांच्या मते महाराज क्षत्रिय नाहीत. गागाभट्टाने दुप्पट दक्षिणा घेऊन ब्राह्मण जसे अनेक धर्माज्ञा बायपास करतात स्वतंत्र शास्त्रार्थ लावून, तसा राज्याभिषेक करून दिला. मग आज कोल्हापूर व सातारा गादीचे महाराज त्यांची कुठली जात लिहितात, सांगतात, मानतात?

का मराठे सरसकट क्षत्रिय नाहीत की सरसकट कुणबी नाहीत तर मग सरसकट ते कुठल्या जातीचे आहेत?

शिवशाहीत लढताना क्षत्रिय मराठे, शेती करताना कुणबी मराठे, निझामशाहीत मराठे कुणबी मग आता लोकशाहीत मराठे नेमके कोण? हे शोधणार कोण? कसं? नि कधी? की ते सापडेपर्यंत फक्त मोर्चे, तंबू, कोर्ट, आयोग, समित्या नि सरकारी आश्वासनं? ●●●

**(लेखक ज्येष्ठ नाटककार व विचारवंत आहेत.)**

# इस्त्राईल - पॅलेस्टाईन संघर्षाला नवी धार

**हमासच्या या हल्ल्याने पुन्हा एकदा मध्य पूर्वेत अशांततेचे निर्माण झालेले वारे कोणत्या दिशेने जाते, त्यामुळे युद्धाची तीव्रता वाढते की ते सामंजस्याच्या भूमिकेने लवकर शमेल, हे पाहावे लागेल. तथापि, नेतान्याहू यांचा इरादा युद्धाचाच दिसतो आहे. त्यांचे बेंडकुळ्या काढणे किती काळ चालते, त्याला प्रत्युत्तरासाठी अरब देश, विशेषतः इराण, सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिराती, लेबानन काय भूमिका घेतात, यावर पुढील वाटचाल अवलंबून असेल.**

**भास्कर नाशिककर**

जगातील सर्वात अशांत क्षेत्र म्हणून इस्त्राईल-पॅलेस्टाईन भागाचा उल्लेख केला जातो. भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळेपासून म्हणजे साधारण १९४७ पासून त्या भागात आतापर्यंत अशांतताच नांदत आहे. भारताचा उल्लेख करायचा कारण म्हणजे, ज्या ब्रिटिशांनी भारताला फाळणीच्या खाईत लोटून त्याचा नकाशा बदलला, त्याच ब्रिटिशांनी या मध्य पूर्वेतील भागात अशांततेचे बिजारोपण केले. विचार न करता शब्द द्यायचा आणि आपला कार्यभाग साधायचा आणि अंगाशी आले, की वाऱ्यावर सोडून द्यायचे, अशी फोडा आणि झोडा नितीने राज्य करणाऱ्या ब्रिटिशांच्या कारभाराची दिशा राहिली आहे. हे करत असताना केवळ स्वार्थ साधणे हा त्यांचा हेतू राहिला आहे. आता इस्त्राईल-पॅलेस्टाईन यांच्यात संघर्ष सुरू आहे. त्या भूमीला ऐतिहासिक वारसा आहे. यहुदी, अरब आणि ख्रिश्चन अशा तीनही धर्मांच्या दृष्टीने ही भूमी पवित्र आहे. पूर्व जेरूसलेममधील अल अक्सा मशिद मुस्लिमांच्या दृष्टीने मक्का, मदिना यांच्याखालोखाल पवित्र ठिकाण आहे. यहुदींच्या दृष्टीनेही त्याच स्थळाला विशेष धार्मिक महत्त्व आहे. येथे पूर्वीपासून अरबांची वस्ती होती, यहुदी होते पण नाममात्र. दोन्हीही घटक गुण्यागोविंदाने राहात होते. एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस जगभरातील यहुदींना भूमीसाठी चळवळ सुरू झाली. या भूमीवर ब्रिटिशांचे नियंत्रण होते. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या तोंडावर तत्कालीन ब्रिटिश परराष्ट्रमंत्री आर्थर बालफोर्ड यांनी ६७ शब्दांचे आश्वासनपत्र ब्रिटिश ज्यू असलेल्या लिओनेल रॉथचाईल्ड यांना दिले. त्यात पॅलेस्टाईनच्या भूमीवर ज्यूंसाठी स्वतंत्र राष्ट्रनिर्मितीला त्यांनी बळ दिले. ब्रिटिशांच्या या आश्वासनाची कार्यवाही १९२३ ते १९४८ दरम्यान होत गेली आणि जगभरातील यहुदी, अगदी जर्मन हुकूमशहा अडॉल्फ हिटलरच्या छळछावण्यातून बाहेर पडलेल्या यहुदींनी या भूमीची वाट धरली. तिथे जाऊन ती आपली मायभूमी म्हणून राहू लागले. त्याबरोबर त्या भागात पॅलेस्टिनी नागरिकांनी, विशेषतः शेतकरी, शेतमजूर यांनी तत्कालीन ब्रिटिश सत्तेविरोधात उठाव केले, आंदोलने केली. आपल्या सवयीप्रमाणे ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी बळाच्या जोरावर ती दडपण्याचा प्रयत्न केला. हजारो



## गझावरील आतापर्यंतचे हल्ले

**पॅलेस्टाईन** - एकूण लोकसंख्या - एक कोटी ४३ लाख गझा पट्टी, जॉर्डन, **इस्त्राईल** - प्रत्येकी वीस लाख, **वेस्ट बँक** - तीस लाख. (स्त्रोत - पॅलेस्टाईन सेंट्रल ब्युरो ऑफ स्टॅटिस्टिक्स) **इस्त्राईल** - एकूण लोकसंख्या - ९८ लाख. यामध्ये ७३.६ टक्के ज्यू, २१.१ टक्के अरब, ५.३ टक्के इतर. (स्त्रोत -इस्त्राईल सेंट्रल ब्युरो ऑफ स्टॅटिस्टिक्स) **गझा पट्टी** - सोळा वर्षांपासून येथील लोक खुल्या कैद्यासारखे जीवन जगत आहेत. त्यांची सगळ्या बाजूने कोंडी केली आहे. पाणी, वीज, अन्नधान्य, औषधे अशा सगळ्या वस्तूंचा इस्त्राईलच्या देखरेखीखाली पुरवठा केला जातो. **लोकसंख्या** - २३ लाख, **क्षेत्रफळ** - ३६५ चौरस किलोमीटर जगातील सर्वाधिक बेरोजगारीचे **प्रमाण - ४५ टक्के**

**गझावरील आतापर्यंतचे हल्ले :** • २००८-०९ - तेवीस दिवस सुरू होते • २०१२ - आठ दिवस सुरू होते • २०१४- आठ दिवस सुरू होते • २०२१- आकरा दिवस सुरू होते • २०२३ - ७ ऑक्टोबरपासून सुरू इस्त्राईली वसाहती गेल्या काही वर्षांत वेगाने वेस्ट बँक, गझा आणि पूर्व जेरूसलेम भागात वाढत आहेत. त्यात सुमारे साडेसात लाख इस्त्राईली राहात आहेत. अशा किमान अडीचशेवर वसाहती आहेत.

**व्याप्त वेस्ट बँकची १९९५ च्या ओस्लो करारानुसार झालेली विभागणी** • क्षेत्र अ - १८ टक्के , पॅलेस्टिनी नियंत्रणाखाली • क्षेत्र ब - २२ टक्के, इस्त्राईल- पॅलेस्टाईन यांच्या संयुक्त नियंत्रणाखाली • क्षेत्र क - ६० टक्के, इस्त्राईलच्या नियंत्रणाखाली.

पॅलेस्टिनींना प्राण गमवावे लागले. शेकडो खेडी जमीनदोस्त केली गेली. त्याचवेळी या भूमीवर यहुदींचा टक्का वाढत होता. त्यामुळे मूलतः ही भूमी कोणाची याचे उत्तर या घटनांतून मिळते. अर्थात, इतिहासाचे जितके अधिक खोलवर इसवी सन पूर्वपर्यंत उत्खनन

करत गेले, तर अनेक विरोधाभास सापडतात. भूमीवरील हक्काबाबत दावे, प्रतिदावेही आढळतात. पण ते स्वीकारण्यासाठी सम्यक दृष्टी गरजेची आहे. त्याला धार्मिकेतेच्या चष्मातून पाहिल्यास ज्याच्या त्याच्या सोयीनुसार चित्र दिसू शकते.

**इस्त्राईल-पॅलेस्टाईन संघर्ष**

दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीने ब्रिटिश साम्राज्य घायाळ झाले होते, घायकुतीला आले होते. त्याच काळात १९४८ च्या दरम्यान इस्त्राईलींनी पाचशेवर पॅलेस्टिनी गावे, शहरे, खेड्यांना बेचिराख केले. वीस हजारांवर पॅलेस्टिनी मारले गेले, आठ लाखांवर बेघर झाले. त्याचा इतिहासात नकबा असा उल्लेख केला जातो. त्या गदारोळात १५ मे १९४८ रोजी इस्त्राईलच्या स्थापनेची घोषणा केली गेली. नव्याने अस्तित्वात आलेल्या संयुक्त राष्ट्राने १९४ क्रमांकाचा ठराव करून पॅलेस्टिनींना त्यांच्या भूमीत परतण्याचा हक्क मान्य केला. १९६४ मध्ये या पॅलेस्टिनींच्या हक्कासाठी लढणारी संघटना पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन (पीएलओ) अस्तित्वात आली. पाठोपाठ फतेह ही त्याची राजकीय संघटना जन्माला आली. हे सर्व घडत असतानाच इस्त्राईलची बांधणी आणि कोणत्याही आव्हानाला, संकटाला तोंड देण्यासाठी सज्ज करणे सुरू होते. परिणामस्वरुप याच इस्त्राईलने जून १९६७ मध्ये गझा, वेस्ट बँक, पूर्व जेरूसलेम, गोलन टेकड्या, इजिप्तमधील सिनाई प्रांतावर हल्ला चढवला. पॅलेस्टिनींना शक्य तितके आपल्या हद्दीतून, त्यांच्या मायभूमीतून परागंदा व्हायला भाग पाडले. या युद्धाला अरब-इस्त्राईल युद्ध संबोधतात. त्याचा नक्सा असाही उल्लेख अरब करतात.

**पीएलओ, हमासची निर्मिती**

पॅलेस्टिनी आणि इस्त्राईली यांच्यातील संघर्षाची धार यानिमित्ताने उत्तरोत्तर वाढतच गेली. १९८७ ते १९९३ या काळात इस्त्राईलने पॅलेस्टिनींचे कंबरडे मोडणे चालवले होते. अन्याय, अत्याचार, बलात्कार अशा घटना दोन्हीही बाजूने सुरू होत्या. तत्कालीन इस्त्राईली संरक्षणमंत्री यित्झाक राबीन यांनी त्यासाठी मोहिम राबवली. या जुलमाला प्रतिकारासाठी आजच्या हमासची म्हणजे (हरकत अल मुक्कमवामा अल-इस्लामिया)ची स्थापना शेख अहमद यासीन याने केली. त्याला त्यासाठी मुस्लिम ब्रदरहूडने मदतीचा हात दिला होता. इस्त्राईलच्या या मोहिमेचा पहिला इत्तीफदा असा उल्लेख केला जातो. या नरसंहाराची धार आणि तीव्रता कायम असतानाच अरब लिगने १९८८ मध्ये पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशनला (पीएलओ) एकमेव प्रतिनिधी म्हणून मान्यता दिली. १९९३ मध्ये ओस्लो करार झाला. त्याने पहिल्यांदा पॅलेस्टिनी अथॉरिटीला स्वयंप्रशासनाचा मर्यादित अधिकार गझा आणि वेस्ट बँकसाठी प्रदान केला गेला. पीएलओने इस्त्राईलला मान्यता दिली. थोडक्यात, या संघर्षमय भूमीवर द्विराष्ट्र व्हावे आणि त्यांनी गुण्यागोविंदाने राहावे, याला अधिमान्यता दिली गेली. पण पीएलओ विरोधकांनी त्याला आरोपीच्या पिंजऱ्या उभे करत इस्त्राईलचा एजंट ठरवले गेले. त्याच्या नेमस्तपणावर जहाल पॅलेस्टिनींनी नंतरच्या काळात सातत्याने हल्ले चढवले.

ओस्लो कराराचे शिल्पकार ठरलेल्या यासर अराफत आणि इस्त्राईलचे तत्कालीन पंतप्रधान यित्झाक राबीन यांना शांततेच्या नोबेल पारितोषिकाने गौरवले गेले. नंतरच्या काळात राबीन यांचा निर्णय मान्य नसणाऱ्यांनी त्यांची हत्या केली. शांततेच्या अपेक्षांना सुरूंग लागला गेला. सप्टेंबर २००० मध्ये लिकुड पक्षाचे नेते अरियल शेरॉनने अल अक्सा मशिदीला भेट देऊन पाहणी केली आणि दुसऱ्या इत्तीफदाला सुरुवात झाली. या काळात पॅलेस्टिनींचे आर्थिक कंबरडे मोडणे, ओस्लो कराराने त्यांना दिलेल्या भूभागावर इस्त्राईलींनी बळजबरीने कब्जा मिळवून तेथे घरे, इमारती उभारणे सुरू केले. त्याला इस्त्राईली सैन्याने सशस्त्र पाठबळ दिले. परिणामी, ओस्लो करारावेळी लाखाच्या आसपास असलेली ज्यूंची वस्तीस्थळे तोपर्यंत सात लाखांपलीकडे पोहोचली. पॅलेस्टिनींच्या वाट्याच्या जमिनी त्यांनी इंचाइंचाने बळकावल्या.

**पॅलेस्टिनींमध्ये बेबनाव**

या सर्व काळात इस्त्राईलमध्ये सरकारे बदलत गेली तरी पॅलेस्टिनींबरोबरील त्यांचा व्यवहार आणि धोरणात फारसा फरक पडला नाही. उलट पॅलेस्टाईनविरोधाची धार वाढत गेली. तर पॅलेस्टिनींमध्ये मवाळ आणि जहाल यांच्यातील संघर्ष आणि कुरघोडीचे राजकारण कायम राहिले, वाढत गेले. मवाळ नेते यासर अराफत यांचे २००४ मध्ये निधन झाले. नंतरच्या वर्षात पॅलेस्टाईनमध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली. हमासला बहुमत मिळाले. त्यातून हमास विरुद्ध फतेह यांच्यात संघर्ष पेटला. अखेरीस वेस्ट बँक फतेहकडे तर गझा हमासकडे अशी वाटणी झाली. हमासच्या कारवाया वाढत गेल्या. त्याचा आणि इस्त्राईलचा संघर्ष वाढत गेला. त्यांच्यात २००८, २०१२, २०१४ आणि २०२१ मध्ये हल्ले-प्रतिहल्ले झाले. हमासला दहशतवादी संघटना ठरवले गेले. शेकडो लोक दोन्ही बाजूने ठार झाले. इस्त्राईलने हमास शासीत गझा पट्टीची कोंडी केली. त्यांचे अन्न, पाणी, औषधे, वीज, शिक्षण अशा सगळ्या बाबतीत अवलंबित्व लक्षात घेऊन होता होईल तेवढी कोंडी केली. आज हमासने इस्त्राईलवर उभयतांमधील आतापर्यंतच्या संघर्षातील पहिलाच जोरदार हल्ला चढवल्यानंतर याच कोंडीचा खुबीने वापर करत इस्त्राईलने गझा पट्टीतून पॅलेस्टिनींनी निघून जावे नाही तर बेचिराख करू, असा इशारा देणे चालवले आहे.

**हमासची कारवाई का**

हा सर्व इतिहास समजून घेतल्याशिवाय पॅलेस्टाईन-इस्त्राईल संघर्ष आणि त्यामागील कारणांची मिमांसा करणे अवघड आहे. ७ ऑक्टोबर रोजी हमासने इस्त्राईलवर हल्ला केला. दोन्हीही बाजूंचे मिळून हजारच्यावर नागरिक मारले गेले. यामध्ये महिला, मुलांचा समावेश सर्वाधिक आहे. हमासने केलेल्या हल्ल्याला ऐतिहासिक घटनेची झालर आहे. एक अपवाद वगळला तर हमासने सातत्याने इस्त्राईलच्या अस्तित्वाला नाकारले आहे. १९७९ चा कॅम्प डेव्हिड करार असो, नाही तर ओस्लो करार किंवा २०२० मध्ये अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पुढाकाराने झालेला अब्राहम करार या सर्वांना हमासने विरोध केला आहे. या कराराने इस्त्राईलशी सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, बहारीन, मोरोक्को, इजिप्त यांच्यासह अनेक अरब देशांचे संबंध प्रस्थापित होणे, त्याला गती मिळणे सुरू होणार होते. त्या दिशेने काही पावलेही पडू लागली होती. या अरब-इस्त्राईल यांच्या एक येण्यातून पॅलेस्टिनींच्या मायभूमीचा प्रश्न झाकोळला जाणार होता. अनेक दशकांच्या संघर्षाने

अरब देश आणि इस्त्राईल दोन्हीही थकलेले आहेत. त्यांना आपापल्या भागात शांतता नांदावी, असे वाटत आहे. तर पॅलेस्टिनींमध्ये, विशेषतः हमाससारख्या जहाल संघटनेला आपल्या मूळ प्रश्नाला बगल दिली जात आहे, असे वाटू लागले आहे. त्यातूनही हमासने हा हल्ला चढवला असावा, असे बोलले जाते. या हल्ल्यामुळे सत्तर वर्षांपूर्वी वाटणारा अरब-इस्त्राईल संघर्ष इस्त्राईल-पॅलेस्टाईन संघर्ष असे वळण घेऊ लागला होता. त्याला या हल्ल्याने पुन्हा अरब-इस्त्राईल संघर्ष या मूळ पदावर आणले गेले आहे. त्यासाठी हमासने ७ ऑक्टोबरला इस्त्राईलवर हल्ला चढवून, पन्नास वर्षांपूर्वीच्या ६ ऑक्टोबर १९७३ च्या योम किप्पूर युद्धाच्या स्मृती ताज्या केल्या आहेत.



**गझा एक खुले तुरुंग**

हल्ल्यामागील आणखी एक कारण म्हणजे इस्त्राईली सरकार आणि लष्कराने चालवलेले अनन्वीत अत्याचार. गझा पट्टीतील नागरिक गेली सतरा-आठरा वर्षे खुल्या तुरुंगात असल्यासारखे जीवन कंठत आहेत. हातातोंडाची गाठ पडण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागत आहे. जगातील सर्वाधिक लोकसंख्येची घनता असलेला प्रदेश असा त्याचा उल्लेख करता येईल. त्याच्याभोवतीने इस्त्राईलींचा जागता पाहरा आहे. एका बाजूला समुद्र आहे. बंदिस्त असे त्यांचे जीवन आहे. पाण्यासह सगळ्या जीवनावश्यक वस्तूंसाठी इस्त्राईलच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे आधीच मरणप्राय जीवन जगणाऱ्या या नागरिकांच्या मनात उद्रेक साठून राहिलेला आहे. तो हमासच्या हल्ल्याने बाहेर पडला आहे. अर्थात, हमासच्या अशा दहशतवादी हल्ल्याचे कोणत्याही प्रकारे समर्थन करता येणार नाही. तो अत्यंत निंदनीय हल्ला आहे. त्याने निष्पाप, उत्सव साजरा करणाऱ्या निरपराध इस्त्राईली नागरिकांचा बळी घेणे अत्यंत गैर असेच आहे. साऱ्या जगभरातून हमासवर टिका होते आहे, ती रास्तच आहे. मूळात हमास ही दहशतवादी संघटना आहे, तिची वाटचाल त्याचे प्रतीक आहे. मुस्लिम ब्रदरहूडच्या वाटेने जाणारी हमास इसीससारख्या दहशतवाद्यांच्या वाटेने जात असेल, तर त्याची गय करता कामा नये. हमासच्या या कृतीने पॅलेस्टाईन-इस्त्राईल यांच्यातील शांततापूर्ण सहजीवनाच्या प्रक्रियेला द्विराष्ट्रवादाच्या संकल्पने पुन्हा सुरूंग लावण्याचे काम केले आहे.

**इस्त्राईल, मोसाद अपयशी**

हमासने हे टोकाचे पाऊल उचलले त्यामागे गेल्या काही वर्षांत आणि विशेषतः इस्त्राईलमध्ये घडलेल्या घटना आणि घडामोडीही तितक्याच कारणीभूत मानल्या गेल्या पाहिजेत. गेली चार वर्षे इस्त्राईलमध्ये अशांतता नांदत आहे. दोन वर्षांत तिथे चार सरकारे आली आणि गेली. कोणत्याही राजकीय पक्षाला जनमताचा स्पष्ट कौल नाही. विद्यमान पंतप्रधान बेंजामीन नेतान्याहू यांचेही कडबोळ्यांचे सरकार आहे. स्वतः नेतान्याहू यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. त्यांच्यावर खटले सुरू आहेत. तथापि, काहीही झाले तर सत्तेला चिटकून राहायचे असा त्यांचा निर्धार आहे. गेल्या डिसेंबरमध्ये इस्त्राईलचे अंतर्गत सुरक्षा मंत्री इतमार बेन वीव यांनी अल अक्सा मशिदीला भेट देवून पाहणी केली होती. त्या मशिदीत जाणाऱ्या पॅलेस्टिनींना सातत्याने सतावले जात आहे. एवढेच नव्हे तर गझा पट्टी, तसेच वेस्ट बँक भागात इस्त्राईलींची दंडेली आणि दादागिरीने कळस केला आहे. त्याचा पॅलेस्टिनींना अतोनात फटका बसत आहे. दुसरीकडे, स्वतःची खुर्ची शाबूत राखण्यासाठी नेतान्याहू हरतऱ्हेने प्रयत्न करत आहेत. त्यांनी इस्त्राईलमधील लोकशाहीचे अवमूल्यन करणे, सर्वसत्ताधीश होण्याच्या वाटेतील अडथळे दूर करणे चालवले आहे. घटनाविहीन इस्त्राईलचा कारभार काही मूलभूत कायद्यांच्या चौकटीत चालतो. त्यावर लोकशाहीचे अंकुश कमी आहेत. त्यात प्रभावी असलेला न्यायव्यवस्थेचा अंकुश बोथट करणे, त्याच्यावर सरकारचा शब्द प्रभावी करणे अशा हालचाली नेतान्याहू यांनी केल्या. त्या सुधारणांना विरोधासाठी इस्त्राईलींचे जनमत एकवटले. त्यांनी आंदोलने केली, निदर्शने केली. अनेक माजी मंत्री, लष्करातील निवृत्त वरिष्ठ यांच्यासह विरोधक एकवटल्याने नेतान्याहूंनी सुधारणांचे घोंगडे काही काळ भिजत ठेवले. तथापि, त्यानंतर स्वतःला हव्या त्या सुधारणा घडवून आणण्यात ते यशस्वी ठरले आहेत. त्यांच्या या एकाधिकारशाहीविरोधात इस्त्राईलमध्ये असंतोष, संताप आणि नाराजी आहे. हे घडवताना आपल्या मताआड येणाऱ्या मंत्र्यांनाही त्यांनी घरी पाठवले. संरक्षणमंत्री याव गॅलेन्ट, लष्करप्रमुख हेझेल हावी या दोघांनाही या सामाजिक, राजकीय अशांततेने इस्त्राईलच्या संरक्षण यंत्रणेवर, तिच्या कार्यक्षमतेवर विपरित परिणाम होत आहे. त्याने लष्कराचे मनोबल खच्ची होत आहे, असे इशारे दिले. या परिस्थितीचा शत्रू गैरफायदा घेईल, असा इशारा दिला. तर त्यांची नेतान्याहू यांनी कानउघाडणी केली. पण त्यांचा सल्ला मानला नाही, की त्याची दखल घेऊन दुरुस्तीसाठी पावले उचलली नाहीत. परिणामस्वरूप इस्त्राईलच्या गाफील सैन्याला तसेच गुप्तचर यंत्रणा मोसाद आमि शाबाक यांना हमासच्या हल्ल्याचा सुगावा लागला नाही. आता जगभरात आपल्या कार्यकर्तृत्वाने लौकीकाला आणि अभिनंदनाला पात्र ठरलेली मोसाद का अपयशी ठरली याची चर्चा सुरू आहे. भविष्यात त्याची चिकित्सा होईल, इस्त्राईल कठोर पावलेही उचलेल. पण मोसाद आणि इस्त्राईली सरकार अपयशी ठरले, हेच वास्तव आहे.

**शह-काटशहाला ऊत**

आता इस्त्राईलने गझा पट्टीतून पॅलेस्टिनींनी निघून जावे,

नागरिकांनी आपला जीव वाचवावा, त्यांनी तसे न केल्यास नरसंहाराला सामोरे जावे, असा इशारा इस्त्राईलने दिला आहे. संयुक्त राष्ट्राने इस्त्राईलच्या या कृतीला विरोध केला असून अशा स्वरुपाच्या आवाहनाची कमी कालावधीत कार्यवाही केवळ अशक्य आहे, असे स्पष्ट केले आहे. आजच्या घडीला गझा पट्टीत पॅलेस्टिनी नागरिक नरकयातना भोगत आहेत. इस्त्राईलच्या हल्ल्याने त्यात आणखी भरच पडली आहे. हमासच्या हल्ल्यानंतर वेस्ट बँकवर सत्ताधीश असलेल्या पॅलेस्टिनी अथॉरिटीची आणि त्याचे कर्तेधर्ते मोहम्मद अब्बास यांची कोंडी झालेली आहे. अशा स्थितीत हिजबुल्ला या पॅलेस्टिनींच्या दुसऱ्या दहशतवादी संघटनेने गझावर हल्ला केला तर आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा इशारा इस्त्राईलला दिला आहे. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री आणि संरक्षणमंत्री इस्त्राईलला सर्वतोपरी पाठिंबा देत आहेत. अमेरिकेने आपले आरमार आखतात आणले आहे. एकूणच हमास आणि पॅलेस्टिनींवर दबाव वाढत आहे. सहाजिकच इराण, लेबानन, जॉर्डन, कतार, मोरोक्को, सौदी अरेबिया, सुंयक्त अरब अमिराती यांच्यावरही त्यांच्या देशांतर्गत पॅलेस्टिनींना मदतीसाठी दबाव वाढू लागला आहे. रशियानेदेखील सावध प्रतिक्रिया देत पाश्चात्य देशांना आगीत तेल ओतू नका, असे सुनावले आहे.

**नागरिकांची होरपळ**

राजकारणाच्या या पोळीवर गझा पट्टीतील नागरिकांची होरपळ होत आहे. त्याचबरोबर इस्त्राईलमधील निष्पाप नागरिकांना, विशेषतः दोन्हीही बाजूकडील महिला, मुलांना त्याच्या झळा सोसाव्या लागत आहेत. गझा पट्टीतही हमासला प्रचंड पाठिंबा आहे. त्याचे व्यापक समर्थन करणारे आहेत, असे चित्र निश्चित नाही. हमासच्या कृत्याला विरोध करणारेही आहेत. त्याचवेळी नेतान्याहू यांच्या राष्ट्रवादाच्या बुरख्याखाली स्वार्थ साधण्याचा, स्वतःला वाचवत स्वतःची खुर्ची शाबूत राखण्याच्या कृतीचा निषेध केला जात आहे. उभय बाजूने सौहार्द, शांततेची मागणी केली जात आहे, ही समाधानाची बाब म्हणता येईल.

**भारताची समतोल भूमिका**

या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका ही महत्त्वाची ठरत आहे. हमासने हल्ला केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तातडीने एक्सवर (ट्विटरवर) हमासच्या हल्ल्याचा निषेध केला आणि इस्त्राईलला सर्वतोपरी पाठिंबा जाहीर केला. नेतान्याहू यांच्याशी त्यांचा दूरसंवाद झाला. काँग्रेसने पॅलेस्टिनींना पाठिंब्याचे धोरण कायम असल्याचे सांगितले. यामुळे भारताच्या आतापर्यंतच्या, पॅलेस्टिनींमागे उभे राहण्याच्या ऐतिहासिक धोरणात बदल झाला की काय, अशी चर्चा रंगली. समाजमाध्यमांवर दुर्दैवाने इस्त्राईल-पॅलेस्टाईन संघर्षाला धार्मिक रंग दिला गेला, इतिहासाचे दाखले उकरून काढत सोशल मीडिया पंडितांनी तावातावाने भूमिका मांडणे चालवले, असा खेदजनक प्रकार घडला. मात्र आपल्या परराष्ट्रखात्याने इस्त्राईल-पॅलेस्टाईन संघर्षात भारताची भूमिका तसूभरही बदललेली नाही. द्विराष्ट्रवादाच्या भूमिकेवर ठाम आहे, हे स्पष्ट केले. त्याचवेळी दहशतवाद कधीही खपवून घेणार नाही, या भूमिकेचा पुनरुच्चार केला. ज्यूंचे पॅलेस्टाईनच्या भूमीत जाण्यापासून ते इस्त्राईलची निर्मिती, पीएलओची स्थापना व कार्य अशा सगळ्या घटनांत आपल्या भूमिकेत सातत्य राहिले आहे. महात्मा गांधी, पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, नंतर इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी, पी.व्ही. नरसिंहराव, डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारांपासून ते नरेंद्र मोदी यांच्या सरकारपर्यंत हे धोरण सातत्य टिकून आहे. मोदी यांच्या काळात इस्त्राईलबरोबरील सहकार्य, करारमदार वाढले तरीही मोदी यांनी इस्त्राईलसह पॅलेस्टाईनला भेट दिलेली आहे. तथापि, मोदी यांच्या कार्यकाळात जागतिक दहशतवादाला सातत्याने विरोध केला गेला आहे. ही आपली भूमिका आपण ठामपणे मांडली आहे. ती अत्यंत रास्त अशीच आहे. कारण दहशतवादाच्या उपद्रवाची मोठी किंमत भारताने मोजलेली आहे. म्हणूनच हमासच्या हल्ल्याचे कदापि समर्थन होऊ शकत नाही. तितकेच गझा पट्टीत अडकलेल्या पॅलेस्टिनींची जीवनावश्यक वस्तू, औषधांचा पुरवठा रोखून कोंडी करणे हेदेखील मानवतेच्या भूमिकेला काळीमा फासणारे आहे. मानवी हक्काची पायमल्ली करणारी कृती आहे. मायभूमीसाठी आसुसलेल्या इस्त्राईलींना मायभूमी मिळाली. त्यांना जगभर अवहेलना आणि उपेक्षा सोसावी लागली. हिटलरच्या अमानुष अत्याचाराला तोंड द्यावे लागले. नरकयातना भोगाव्या लागल्या. तेच इस्त्राईली नागरिक, म्हणजे यहुदी लोक पॅलेस्टिनींना त्यांच्या मायभूमीतून हुसकवून लावून देत आहेत. त्यासाठी अत्यंत टोकाची, विद्वेषाची भूमिका घेत आहेत, हे चित्र विरोधाभासाचे वाटते आहे. त्यामुळेच नेतान्याहू यांनी वंशसंहाराची भाषा सोडून देणे अधिक रास्त ठरेल.

**लवकर शांतता अशक्य**

हमासच्या या हल्ल्याने पुन्हा एकदा मध्य पूर्वेत अशांततेचे निर्माण झालेले वारे कोणत्या दिशेने जाते, त्यामुळे युद्धाची तीव्रता वाढते, की ते सामंजस्याच्या भूमिकेने लवकर शमेल, हे पाहावे लागेल. तथापि, नेतान्याहू यांचा इरादा युद्धाचाच दिसतो आहे. त्यांचे बेंडकुळ्या काढणे किती काळ चालते, त्याला प्रत्युत्तरासाठी अरब देश, विशेषतः इराण, सौदी अरेबिया, कतार, संयुक्त अरब अमिराती, लेबानन काय भूमिका घेतात, यावर पुढील वाटचाल अवलंबून असेल. आजतरी हमासला हे देश एकाकी पडू देतील, असे वाटत नाही. हिजबुल्लादेखील मदतीला येऊ शकते. पण एकमात्र खरे, की इस्त्राईल-पॅलेस्टाईन संघर्षात तेल ओतले गेल्याने त्याचा भडका आणि झळा साऱ्या जगताला ते अधिक लांबल्यास बसू शकतो. आज तरी खनिज तेलाच्या किंमती तेजीकडे झुकू लागल्या आहेत. रशिया-युक्रेन युद्धाइतके ते जगाच्या एकूण चलनवलन आणि पुरवठा साखळीवर मोठा परिणाम करेल, असे वाटत नाही. हमासच्या हल्ल्याने एकूण पॅलेस्टाईन चळवळीला आगामी काळात ब्रेक लागू शकतो. इस्त्राईल आणि पॅलेस्टिनी यांच्यात अविश्वासाचे आणि एकमेकाबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. ज्या अमेरिकेने पुढाकार घेऊन कॅम्प डेव्हिड आणि अब्राहम करार घडवले, तिने केवळ आगामी वर्षातील अध्यक्षीय निवडणुकीवर डोळा ठेवून राजकारण करू नये. त्याऐवजी केवळ इस्त्राईलला चुचकारणे, त्याच्या पाठीशी राहण्याऐवजी अरब देशांना आणि शक्य झाल्यास पॅलेस्टिनींनाही विश्वास देऊन चर्चेच्या टेबलावर आणणे अधिक शहाणपणाचे ठरू शकते. ●●●

**(लेखक समकालीन विषयाचे अभ्यासक आहेत.)**

# बाळ गंगाधर टिळक आणि गणेशोत्सव



डॉ. आनंद मेणसे

**खरे तर, गणपती ही बहुजनांची देवता नव्हती. खंडोबा, ज्योतिबा महार शेतकऱ्यांच्या देवता. गणपती ही प्रामुख्याने कोकणस्थ ब्राह्मणांची देवता. त्यांनी ती कोकणातून घाटावर आणली, असे मत प्रबोधनकार ठाकरे यांनी मांडले आहे. गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्थी या कालावधीत या देवतेची पूजा होत असे. याला सार्वजनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला तो बाळ गंगाधर टिळकांनी.**



गणेशोत्सवाचे प्रस्थ दरवर्षी वाढतच चालले आहे. पूर्वी हा उत्सव महाराष्ट्रापुरता मर्यादित होता. आता त्याचे स्वरूप बदलून तो देशाच्या विविध भागांत साजरा होताना दिसतो. दक्षिणेकडील कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र, तेलंगणा या राज्यांतून गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होऊ लागला आहे. या चार राज्यांच्या तुलनेत केरळमध्ये त्याचे प्रमाण कमी दिसते. हिंदी भाषिक पट्ट्यातही गणेशात्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होताना दिसतो. गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड या राज्यांतून गणेशोत्सव साजरा होऊ लागला आहे. धार्मिक उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे व्हावेत यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने प्रयत्न होत आहेत. केवळ गणेशोत्सवापुरते हे मर्यादित नाही, तर पूर्वी जे उत्सव मांगल्यपूर्ण वातावरणात साजरे व्हायचे, ते आता सार्वजनिकरित्या व भव्य प्रमाणावर साजरे करण्याची जणू स्पर्धाच लागली आहे. या उत्सवातून होणारी आर्थिक उलाढाल, या आर्थिक उलाढालीतून एका विशिष्ट वर्गाला होणारा प्रचंड नफा व त्याचवेळी हे उत्सव साजरे करण्यासाठी महिनाभर राबणाऱ्या युवकांचे होणारे नुकसान याचा विचार करण्याची आज वेळ आली आहे.

खरे तर, गणपती ही बहुजनांची देवता नव्हती. खंडोबा, ज्योतिबा महार शेतकऱ्यांच्या देवता. गणपती ही प्रामुख्याने कोकणस्थ ब्राह्मणांची देवता. त्यांनी ती कोकणातून घाटावर आणली, असे मत प्रबोधनकार ठाकरे यांनी मांडले आहे. गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्थी या कालावधीत या देवतेची पूजा होत असे. याला सार्वजनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला तो बाळ गंगाधर टिळकांनी. काही अभ्यासकांच्या मते, सार्वजनिक गणेशोत्सव श्रीमंत भाऊ रंगारी यांनी सुरू केला. एक गोष्ट मात्र खरी आहे, की गणेशोत्सवाला व्यापक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले ते टिळकांच्या प्रयत्नांमुळे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी त्यांनी हा उत्सव सुरू केला.

**गिरणगाव ओस पडले**

असे काय घडले, की टिळकांना गणेशोत्सव सार्वजनिक स्वरुपात साजरा करावा असे वाटले. दि. ११ ऑगस्ट १८९३ रोजी मुंबईत हिंदू-मुस्लिम दंगल झाली. मुंबईतील हा पहिला असा दंगा. कामगार वस्तीत हा दंगा झाला. कारण घडले ते असे, की झोपडपट्टीत प्रभासपट्टण येथे दंगा झाला. त्याचे पडसाद मुंबईत उमटले. शुक्रवारची नमाज अदा करून परतणाऱ्यांपैकी काहींनी दंग्यास सुरुवात केली. त्याला हिंदूंनी दुसऱ्या दिवशी उत्तर दिले. एकमेकांनी एकमेकांची डोकी फोडली. कामगारांना हा प्रकार नवाच होता. या दंगलीत ८० माणसे दगावली, कैक जखमी झाली. दंगल नियंत्रणात आणताना पोलिसांनी लाठीमार केला. हजारावर लोकांना अटक केली. दंगलीचा परिणाम म्हणून कामगार भयभीत झाले. त्यांनी आपापल्या खेड्याकडे जाण्याचा निर्णय घेतला. याचा परिणाम म्हणून कापड गिरण्या बंद पडल्या. गिरणगाव ओस पडले. जे गावी न जाता मुंबईत राहिले होते त्यांची उपासमार होऊ लागली. एक भयावह स्थिती मुंबईत निर्माण झाली.

सन १८८४ मध्ये गिरणी कामगारांच्या चळवळीला सुरुवात झाली. त्यांचे संघटन नारायण मेघाजी लोखंडे या सत्यशोधक नेत्याने

केले. गिरणी कामगारांना चांगले जीवन जगता यायचे तर त्यांना आर्थिक सुविधा मिळाल्या पाहिजेत, असा विचार करून त्यांनी बॉम्बे मिल हॅण्ड्स असोसिएशन या कामगार संघटनेची स्थापना केली. जातीय दंगलीमुळे कामगार वर्गात दुही निर्माण होत असल्याचे पाहून त्यांनी जातीय दंगल थांबविण्यात पुढाकार घेतला. या कामात त्यांना चांगले यश लाभले. गिरणी कामगार परत आले, गिरण्या सुरू झाल्या.

**हिंदू-मुसलमान यांच्यातील दरी रुंदावली**

मुंबईतील दंगलीचे पडसाद इतरत्र उमटले. टिळकांनी दि. १० सप्टेंबर १८९३ रोजी शनिवार वाड्यावर हिंदू समाजाची सभा बोलावली. टिळकांनी केवळ हिंदूंची सभा न बोलावता सर्वांचीच सभा बोलवावी, असा विचार न्या. रानडे, गोखले यांनी मांडला. त्यांनी टिळकांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. टिळकांची सभा यशस्वी झाली. सभेला मोठी उपस्थिती लाभली. या सभेनंतर टिळकांनी इतर गावांतूनही सभा घेतल्या. पुण्यातील सभेनंतर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची कल्पना पुढे आणली. १८९३ साली त्यांना फारसा प्रतिसाद मिळाला नाही. मात्र १८९४ साली पुण्यात सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात झाली. टिळकांनी घेतलेल्या या निर्णयामुळे हिंदू-मुसलमान यांच्यातील दरी रुंदावली, अशी टीका त्यांच्यावर झाली आहे.

**सत्यशोधकांचे आक्षेप**

टिळकांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिल्याच्या घटनेची नोंद घेत सत्यशोधकांनी टिळकांवर खूप टीका केली. टिळकांनी बहुजन समाजातील तरुणांना गणेशोत्सवात गुंतवून त्यांना शैक्षणिक कामापासून परावृत्त केले, असे म्हटले आहे. उत्सवाच्या माथी वर्गणी गोळा करणे, मंडप घालून आराम करणे आणि त्यानंतर उत्सवाच्या काळात पूजा अर्चा आणि करमणुकीचे कार्यक्रम करणे यांमध्ये तरुणांची शक्ती वाया जाते, असा दावा त्यावेळी सत्यशोधकांनी केला होता. सत्यशोधकांनी जसे गणेशोत्सवाबाबत आपले म्हणणे मांडले, तसेच तत्कालीन विद्वान राजारामशास्त्री भागवत यांनीही गणेशोत्सवावर टीका केली आहे. राजारामशास्त्री केवळ टीका करून थांबले नाहीत, तर त्यांनी मुंबईच्या पोलिस कमिशनरकडे सार्वजनिक गणेशोत्सवावर बंदी घालण्यात यावी, अशी मागणी करणारे पत्र दिले. पोलिस विभागाने मात्र सावध भूमिका घेत या प्रकरणात लक्ष घालणे टाळले. गणेशोत्सव सार्वजनिक स्वरुपात होऊ लागला व त्याचे स्वरुपही वाढू लागले.

गणेशोत्सव आता केवळ पुणे आणि मुंबईपुरता मर्यादित राहता कामा नये, तर तो इतरही शहरांतून सुरू व्हावा यासाठी टिळक आणि त्यांचे पाठीराखे प्रयत्नशील होते. पुढे ज्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली, ते डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे टिळकांसोबत असायचे. बेळगाव शहरात १९०५ साली सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करण्यासाठी टिळक आणि डॉ. हेडगेवार बेळगावात आले होते. अशा प्रकारे इतर शहरांत जाऊन त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सवास चालना दिली. गणेशोत्सवामुळे एक गोष्ट झाली, जे तरुण पूर्वी उत्साहाने मोहर्रमच्या मिरवणुकीत सहभागी होत असत, त्यांना आता गणेशोत्सवाच्या माध्यमातून पर्याय मिळाला व त्यांनी कालांतराने मोहर्रमच्या मिरवणुकीकडे पाठ फिरवली. याचा परिणाम म्हणून हिंदू आणि मुसलमान यांच्यात निर्माण झालेली दरी वाढली.



गणेशोत्सवाच्या काळात जनतेचे प्रबोधन व्हावे असे कार्यक्रम व्हावेत, अशी अपेक्षा होती. पण तसे फारसे होऊ शकले नाही. त्यावेळी मुख्य प्रश्न होता तो ब्रिटिशांना भारतातून बाहेर घालविण्याचा. त्यासाठी लढा उभारण्याचा. गणेशोत्सवानिमित्त जी नाटके बसविली जात, त्यामध्ये हा आशय असायचा. त्यासाठी ऐतिहासिक नाटकांचे प्रयोग केले जात. पोवाड्यांचे कार्यक्रम होत. प्रबोधनाचे जे इतर विषय होते, त्यामध्ये शैक्षणिक सुधारणा, स्त्रियांचे शिक्षण, अंधश्रद्धा निर्मुलन, सावकारीला विरोध असे विषय असायचे. सत्यशोधक चळवळीचे समर्थक या विषयांना अनुसरून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करीत असत.

स्वातंत्र्यपूर्व काळात सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रापुरता मर्यादित होता. स्वातंत्र्योत्तर काळात अगदी पद्धतशीरपणे त्याची व्याप्ती वाढविण्यात आल्याचे दिसते. आता हा उत्सव देशभर कसा होईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या उत्सवात जी आर्थिक उलाढाल होते तो आणखी वेगळा विषय आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने धार्मिक तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करणे ही मोठी चिंताजनक बाब म्हणता येईल. उत्सवाच्या काळात व त्यानंतर विसर्जनाच्या मिरवणुकीदरम्यान निर्माण करण्यात येणारा तणाव, तणावातून निर्माण झालेले दंगे, या तर खूप चिंताजनक गोष्टी आहेत. गणेशोत्सवाच्या काळात होणारे प्रदूषण आणि ते रोखण्यात शासनास येत असलेले अपयश या गोष्टी चिंतेत भर घालणाऱ्या आहेत. ●●●

**(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**


# शाहरुख खानचा 'जवान'



प्रा. अविनाश कोल्हे

**आजच्या सर्वसामान्य भारतीय माणसाच्या मनात व्यवस्थेबद्दल, सामान्य माणसाच्या हतबलतेबद्दल, राजकारणात सदैव दिसत असलेल्या अमानुष भ्रष्टाचाराबद्दल चीड आहे. ही चीड या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. आज आपण असं अनेक ठिकाणी बघत असतो, अशा घटनांबद्दल वाचत असतो, की गुन्हे, भ्रष्टाचार धनदांडगे करतात. पण जर ते पकडले गेले तर बळीसाठी एखादी गरीब व्यक्ती समोर केली जाते. 'जवान' मध्ये याविरूद्ध आवाज उठवणारा नायक आणि त्याचा तरुण मुलगा दाखवला. त्याच्या जोडीने पाच-सहा तरुणी आहेत. हेसुद्धा काळजीपूर्वक केलेले आहे.**

भारतातील हिंदी चित्रपटसृष्टी जगात सर्वात जास्त चित्रपट बनवते. मात्र प्रदर्शित झालेले बहुसंख्य चित्रपट बॉक्स ऑफिसवर आपटतात. एका अभ्यासकाने दाखवून दिल्याप्रमाणे हिंदी चित्रपट 'यशस्वी' होण्याचे प्रमाण पाच टक्क्यांपेक्षा जास्त नसते. अशा स्थितीत शाहरूख खानच्या 'जवान'ला जे जबरदस्त यश मिळाले आहे, तसे अलीकडे प्रदर्शित झालेल्या एकाही हिंदी चित्रपटाला मिळालेले नाही. यामुळेही असेल कदाचित, या चित्रपटाची अनेक पातळ्यांवर चर्चा सुरू आहे. यात दुसरी दखल घेण्याजोगी बाब म्हणजे, आज जमाना रणवीर सिंग, रणवीर कपूर वगैरे तरूण नटांचा असूनही शाहरूख खानसारखा साठीच्या जवळ आलेला नट केवढा जबरदस्त हिट सिनेमा देतो, याचीसुद्धा खास दखल घ्यावी लागते. तिसरा मुद्दा म्हणजे, 'जवान'ची निर्मिती शाहरूखच्या 'रेड चिली' या कंपनीने केलेली आहे. थोडक्यात, 'जवान'मध्ये शाहरूख फक्त 'हिरो' नाही तर 'निर्माता'सुद्धा आहे. यात शाहरूखचा डबलरोल आहे. वडील आणि मुलगा अशा दोन्हीही भूमिका शाहरूखने विलक्षण ताकदीने सादर केल्या आहेत. 'जवान'च्या संदर्भात आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे, या चित्रपटासाठी शाहरूखने दक्षिण भारतातील दिग्दर्शक आणि इतर तंत्रज्ञांना पाचारण केले होते. या चित्रपटाचा दिग्दर्शक ॲटली आहे. ॲटलीचा जरी हा पहिलाच हिंदी चित्रपट असला तरी त्याने 'थेरी', 'मेर्सेल', 'बिगील' वगैरे चित्रपटांचे दिग्दर्शन केलेले आहे. वयाचा विचार केला तर असे दिसेल, की ॲटली (जन्म : १९८६) अगदीच तरूण आहे. असे असूनही शाहरूखने त्याच्यावर दिग्दर्शनाची जबाबदारी टाकली आणि त्याने ती यशस्वी करून दाखवली.




**समाजात बदल होत असल्याचा पुरावा**

'जवान' पूर्णपणे व्यावसायिक चित्रपट आहे. त्याची कथा तशी वेगळी नाही. आजच्या सर्वसामान्य भारतीय माणसाच्या मनात व्यवस्थेबद्दल, सामान्य माणसाच्या हतबलतेबद्दल, राजकारणात सदैव दिसत असलेल्या अमानुष भ्रष्टाचाराबद्दल चीड आहे. ही चीड या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. आज आपण असं अनेक ठिकाणी बघत असतो, अशा घटनांबद्दल वाचत असतो, की गुन्हे, भ्रष्टाचार धनदांडगे करतात. पण जर ते पकडले गेले तर बळीसाठी एखादी गरीब व्यक्ती समोर केली जाते. 'जवान' मध्ये याविरूद्ध आवाज उठवणारा नायक आणि त्याचा तरुण मुलगा दाखवला. त्याच्या जोडीने पाच-सहा तरुणी आहेत. हेसुद्धा काळजीपूर्वक केलेले आहे. आजची तरुण स्त्री अशा प्रकारे भ्रष्टाचाराच्या लढ्यात उतरू शकते, हे याद्वारे अधोरेखित केले आहे. चित्रपटाची नायिका नर्मदा 'कुमारी माता' दाखवली आहे. एका प्रसंगात नर्मदा शाहरूखला स्पष्टपणे सांगते, की ती एका पुरुषाच्या प्रेमात होती. त्याच्याशी शरीरसंबंध आले, त्यातून ती गरोदर झाली. त्याने तिला गर्भपात कर, तरच तुझ्याशी लग्न करेन अशी अट घातल्यावर मी त्याला सोडले.. आता तुला जर माझ्याशी

लग्न करायचं असेल तर माझ्या पाच वर्षांच्या मुलीची परवानगी घ्यावी लागेल.' चित्रपटातला प्रसंग तसा फार महत्त्वाचा आहे. १९७० च्या दशकात आलेल्या 'आराधना'त शर्मिला टागोरवर असाच कुमारी माता होण्याचा प्रसंग येतो, तर तिला मूल वाढवण्यासाठी केवढा त्याग करावा लागतो. आपल्या समाजात बदल होत आहेत, याचा हा पुरावा.

**या संस्थांबद्दल भारतीय जनमानसात आदराची भावना**

याच्या जोडीने या चित्रपटात गुप्तहेर खात्याची प्रमुखसुद्धा एक तरुण स्त्री (नर्मदा) दाखवली आहे. जेम्स बॉन्डच्या 'गोल्डन आय', 'स्काय फॉल' वगैरे चित्रपटात 'एम.आय ६' या 'ब्रिटिश हेरखात्याची प्रमुख' ही भूमिका श्रीमती जुडी डेंच या महिलेने सादर केलेली आहे. शिवाय कथानकात 'भारतीय सैन्य' हा घटकसुद्धा सफाईने विणला आहे. आज आपल्या देशात 'सर्वोच्च न्यायालय' आणि 'भारतीय सैन्य' या दोनच संस्था उरल्या आहेत, ज्यांच्याबद्दल भारतीय जनमानसात आदराची भावना आहे. 'जवान'मधला संघर्ष नेहमीचे राजकीय नेते, त्यांनी पाळलेले गुंड, सरकारी कामाची कंत्राटं घेणारे कंत्राटदार वगैरे खलनायक विरुद्ध मूठभर देशप्रेमी तरुण असा आहे. म्हणूनच म्हटलं आहे, की कथा तशी जुनी असली तरी दाक्षिणात्य कलाकारांनी कथेला दिलेली ट्रिटमेंट वेगळी असल्यामुळे अडीच तासांचा चित्रपट कंटाळवाणा होत नाही. पण काही तरी वेगळं बघायला मिळेल, अशी अपेक्षा 'जवान' पूर्ण करत नाही.

विक्रम राठोड (शाहरूख) हा भारतीय सैन्यदलातला एक तरूण कर्तृत्ववान अधिकारी. एका मोहिमेवर असताना जवानांच्या बंदुका काम करत नाहीत. शस्त्रपुरवठा करणारा कंत्राटदार कालीच्या (विजय सेतुपती) विरोधात सैन्याधिकारी विजय राठोड उभा राहतो. त्यामुळे चिडलेला काली विक्रम राठोडला मारतो, त्याच्या पत्नीला ऐश्वर्याला (दीपिका पदुकोण) तुरुंगात पाठवतो, खोटे पुरावे उभे करून तिला फाशीची शिक्षा मिळवून देतो. ऐश्वर्या गर्भवती असल्यामुळे फाशीची शिक्षा पुढे ढकलली जाते. मात्र मुलाला आझादला (शाहरूख) जन्म दिल्यावर तिला फाशी दिली जाते. तुरुंगातील एक महिला अधिकारी आझादला मोठा करते. नंतर आझाद त्याच जेलचा जेलर म्हणून नियुक्त होतो. आता आझाद तुरूंगातल्या मूठभर तरुण कैद्यांच्या मदतीने रूप बदलून आझाद अनेकांना न्याय मिळवून देतो. या निमित्ताने या चित्रपटात कष्ट करणाऱ्या तरीही आत्महत्या कराव्या लागणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या येतात. या प्रकारे सरकारची अब्रू वेशीवर टांगणाऱ्या आझादला पकडण्यासाठी नर्मदाची (नयनतारा) टीम त्याच्या मागे लागते.

**...'जवान' याला अपवाद ठरत आहे**

दुसरीकडे, आझादसुद्धा कालीशी दोन हात करतो. आझाद अडचणीत असतानाच विक्रम राठोड पुन्हा येतो. नंतर आझाद आणि राठोड कालीच्या विरोधात आघाडी उघडतात. हिंदी सिनेमात शोभेल असा प्रसंग म्हणजे स्मृतीभ्रंश झालेल्या राठोडला योग्य वेळी सर्व काही आठवते. शाहरूख चित्रपटाच्या शेवटी राजकीय भाष्य करतो आणि देशातील नागरिकांना आवाहन करून मतदानाचा अधिकार योग्य प्रकारे वापरा, असे सांगतो. येथे आपल्याला भारतात असलेल्या दोन भिन्न राजकीय संस्कृतींची दखल घ्यावी लागते. उत्तर भारताची आणि दक्षिण भारताची संस्कृती. दक्षिण भारतातील चित्रपट ठसठशीत राजकीय भूमिका घेतात. उत्तर भारताच्या संस्कृतीचा पगडा असलेल्या हिंदी चित्रपटांमध्ये राजकीय विधानं अभावानेच आढळतात. शाहरूखचा 'जवान' याला अपवाद ठरत आहे. या सिनेमात भावनिक आशय ठासून भरला आहे. एक संवाद बघा 'उसूलों पर जहाँ आँच आए तो टकराना जरूरी है, कोई जिंदा हो तो फिर जिंदा नजर आना जरूरी है.' या संवादांमागे सुमित अरोराची लेखनी आहे. त्याचे अनेक संवाद हमखास टाळ्या मिळवून देणारे आहेत. 'बेटे को हाथ लगाने से पहले बाप से बात कर' 'चाहिए तो आलिया भट्ट. लेकिन उम्र में वो थोडी छोटी है' वगैरे संवाद खटकेबाज आहेत.

**विजय सेतुपती चतुरस्त्र नट**

आता शेवटचा मुद्दा. गेलेल्या काही महिन्यांपासून हिंदी चित्रपटसृष्टीने दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीचा एक प्रकारे धसका घेतला आहे. याची सुरुवात 'पुष्पा'पासून झाली. या दरम्यान बॉलिवूडचे काही चित्रपट जरी गाजले, तरी 'जबरदस्त कमाई' ही बाब दाक्षिणात्य सिनेमांच्या नावावर होती. यामागे अनेक कारणं आहेत. एक म्हणजे, या चित्रपटात तगडी स्टारकास्ट आहे. सान्या मल्होत्रा, प्रियामणी, गिरिजा ओक, संजीता भट्टाचार्य, लहर खान या अभिनेत्रींना तसं फारसं काम नसलं तरी त्यांच्या भूमिका लक्षात राहतात. दीपिका छोट्या भूमिकेतही प्रभाव पाडते. चित्रपटाची सर्व धुरा शाहरूख खानवर आहे. त्याच्या जोडीला नयनतारा आणि विजय सेतुपती आहेत. या दोघांनी शाहरूखला योग्य साथ दिली आहे. नयनताराला मध्यंतरानंतर फारसं काम नाही. हे जरी खरं असलं तरी तिची अदाकारी लक्षात राहते. विजय सेतुपती चतुरस्त्र नट आहे. तो नायकाच्या भूमिकेत असो की खलनायकाच्या, तो छाप पाडतोच. हिंदी चित्रपटसृष्टीत 'थोडासा वेडसर पण उलट्या काळजाचा' खलनायक प्रथम दिसला तो 'शोले'तील गब्बरसिंगच्या रूपाने. त्या प्रकारचा खलनायक सेतुपतीने 'जवान'मध्ये साकार केला आहे.

काही समीक्षक 'जवान'वर उचलेगिरीचा आरोप करतात. 'जवान'मध्ये थोडासा 'गजनी' आहे, थोडासा 'चक दे' आहे, थोडासा 'गब्बर इज बॅक' आहे वगैरे आरोप झाले. या आरोपांत तथ्य आहेच. तसं पाहिलं तर अनेक हिंदी चित्रपट उचलेगिरी करून काढले असतात. 'रोमन हॉलिडे'च्या 'चोरी चोरी', 'दिल है के मानता नही' वगैरे कॉप्या नव्हत्या का? खुद्द 'शोले'तील कितीतरी प्रसंग अनेक परदेशी सिनेमांतून उचलले होते. मुळात अशा प्रकारे भाडोत्री गुंड आणून डाकुंचा नायनाट करायचा, ही आयडियाच मुळी 'सेव्हन सामुराई' या जपानी चित्रपटातून घेतली. धर्मेंद्र गावातल्या पाण्याच्या टाकीवर चढतो ही आयडिया 'सिक्रेट ऑफ सांता व्हिक्टोरिया' या चित्रपटातून घेतली आहे. मुद्दा तो नाही. मुद्दा आहे अशी उचलेगिरी करून त्यातून काही तरी चांगलं जर ('शोले','जवान','चोरी चोरी') होत असेल, तर तक्रार करण्यात अर्थ नाही. इतिहासात नोंद होते यशाची. आजचा प्रचंड यशस्वी चित्रपट म्हणजे 'जवान'.

**(लेखक राज्यशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)**

# अंधश्रद्धा निर्मूलन, धर्मचिकित्सा आणि धर्मनिरपेक्षता : आव्हान आणि अपेक्षा



अविनाश पाटील

**मतलबी हिंदुत्ववादी मंडळी भाबड्या हिंदूंचा गैरफायदा घेत बिगरहिंदू समाजांना त्यांच्या धार्मिक ओळखीच्या आधारे संघटित करण्यात हातभार लावतात. त्यातून कडव्या धार्मिक अल्पसंख्यवादाचे आव्हान धर्मनिरपेक्षतेपुढे उभे राहते. कडव्या धार्मिक अल्पसंख्यवादाचा धाक घालून व त्याचा प्रतिकार करण्यासाठी हिंदुत्ववादी मंडळी मग कडव्या धार्मिक बहुसंख्यांकवादाचे समर्थन करतात. या प्रक्रियेतून धर्मनिरपेक्षतेपुढे कडवा धार्मिक अल्पसंख्यांकवाद व कडवा धार्मिक बहुसंख्यांकवाद असे दुहेरी आव्हान उभे राहते. या आव्हानांशी एकाच वेळेला झुंज घेत धर्मनिरपेक्षतावाद्यांना आपला संघर्ष उभा करावा लागणार आहे.**

**(मागील अंकातून)**

या संकल्पनेला सॅम्युएल हॅटिंग्टन यांनी पुढे सैद्धान्तिक रूप दिले. फॉरेन अफेअर्स नामक नियतकालिकात १९९३ मध्ये हॅटिंग्टन यांनी या सिद्धांताचा ऊहापोह केला होता. त्यांचे असे म्हणणे आहे, की १९९० सालापर्यंतच्या जगात एकूण ४८ वांशिक युद्धे आणि १६८ देशांत त्यांच्या राष्ट्रांच्या सीमांवरून युद्ध चालू होती. यावरून जगात वांशिक किंवा प्रादेशिक राष्ट्रवादी विचारसरणी किती प्रभावी बनली होती, या वास्तवाची आपल्याला कल्पना येते. या सर्व परिस्थितीचा अर्थव्यवस्थेवर एकूण परिणाम असा झाला, की भांडवल आणि श्रम राष्ट्र-राज्यांच्या सीमेत कैद झाले. युरोपातील सर्वच देशांत वंशवाद आणि धर्मवादाचे राजकारण सुरू झालेले आहे. भांडवली शक्तींची वाढ होऊन सत्ता त्यांच्या हातात गेल्यावर त्या-त्या राष्ट्राचे संस्कृती श्रेष्ठत्वाचे राजकारण सुरू होते. संबंधित देशाच्या सत्ता धर्माकडून दुसऱ्या धर्माचे व वंशाचे 'शत्रूकरण' सुरू होते. कारण भांडवली शक्ती आणि संस्कृती श्रेष्ठत्वाचे राजकारण करणाऱ्या उजव्या शक्तींना समान शत्रूचे मिथक निर्माण करण्याची आवश्यकता असते. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जर्मनी, इटलीच्या फॅसिस्ट राजवटींनी ज्यूधर्मियांना बळीचा बकरा केले होते. त्या काळात जर्मनी, इटली, जपान किंवा पोर्तुगाल यांची 'राष्ट्रांतर्गत भांडवलशाही' होती. आता या नवसाम्राज्यवादी जागतिकीकरणात भांडवलाचे आणि उजव्या शक्तींचे जागतिकीकरण झाले आहे. त्यामुळे रशियाच्या विघटनानंतर या उजव्या शक्तींनी इस्लाम आणि मुसलमान यांचे 'शत्रूकरण' केले आहे. मुस्लिम राष्ट्रातील धर्मवाद, अमेरिकेनेच पोसल्यामुळे तो आता जास्त आक्रमक झाला आहे. भांडवली अर्थव्यवस्थेमध्ये बेकारी वाढते. तळागाळातील जनतेमध्ये असंतोष निर्माण होतो. तो दाबण्यासाठी आपल्या राष्ट्राची प्रगती 'शत्रूकरण' केल्या गेलेल्या लोकसमूहांमुळे मंदावली आहे, असे म्हणून त्यांचा विनाश केला गेला पाहिजे, असा प्रचार होतो. पोथीनिष्ठ धर्मवाद आणि सांस्कृतिक उन्माद यांच्या चळवळी सुरू होतात. पाश्चात्य राष्ट्रांनी ज्यूधर्मियांबरोबर समझोता करून घेतला आहे आणि इस्लाम व मुस्लिमांना लक्ष्य केले आहे. त्याशिवाय त्यांना मुस्लिम राष्ट्रांतील नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताबा मिळविता येणार नाही.

जागतिक पातळीवर शीतयुद्धोत्तर काळामध्ये आंतरराष्ट्रीय संघर्ष हे मुख्यत्वे देशादेशातील राष्ट्रीय युद्धाच्या स्वरूपाचे नसतील, तर ते आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांमध्ये व त्यांच्याद्वारा खेळले जातील. ते धर्मनिरपेक्ष, आधुनिक, लोकशाही संस्कृतीविरुद्ध धार्मिक मूलतत्त्ववादी, प्रतिगामी व लोकशाहीविरोधी संस्कृती यांच्यातील सांस्कृतिक संघर्ष असतील, असे हॅटिंग्टन प्रभृती जागतिक ख्यातीचे राज्यशास्त्रज्ञ आपल्याला सांगत आहेत. पश्चिमी आधुनिक धर्मनिरपेक्षतावादी व लोकशाही राष्ट्रांना धार्मिक मूलतत्त्ववादाचा विळखा पडत आहे, हे अधोरेखित करीत असतानाच सर्वत्र धार्मिकतेला मूलतत्त्ववादी म्हणत आज ही मंडळी धर्मनिरपेक्ष, लोकशाही राष्ट्रांनी केलेल्या सामाजिक न्याय व सुरक्षिततेबाबतच्या वचनभंगावर पांघरूण घालत आहेत. धार्मिकतेच्या आविष्कारातील देशनिहाय भेद व त्यातून उपस्थित झालेल्या सामान्यजनांच्या राजकीय, सामाजिक ओळखीबाबतचे, त्यांच्या आर्थिक व राजकीय सीमितीकरणाबाबतचे व सामाजिक न्यायाचे प्रश्न इत्यादी बाबी उपेक्षून अमेरिकेचे नेतृत्व आणि त्यांचे सैद्धांतिक समर्थन करणारे विचारवंत संस्कृती-संघर्षाच्या सिद्धांताद्वारे आंतरराष्ट्रीय राजकारणातील एकमेव महत्त्वाचा प्रश्न म्हणून धर्मनिरपेक्ष लोकशाही राज्यांना पडलेल्या इस्लामी मूलतत्त्ववादाच्या व दहशतवादाच्या विळख्याचे वर्णन करीत आहेत व त्याचा सामना करण्यासाठी लोकशाही देशांना दहशतवादाच्या विरोधात साहाय्य करण्याचे आवाहन करीत आहेत. एतद्देशीय मतलबी आणि भाबडी लोकशाहीवादी मंडळी मग दहशतवादाच्या विरोधात अमेरिकेचे समर्थन करीत आपल्या लोकशाहीनिष्ठांचे प्रदर्शन करतात. पण हे करणाऱ्या या मंडळींना आपण आपल्याच देशातील धर्मनिरपेक्षतावादी शक्तींचा उपहास करतो; धार्मिक अल्पसंख्याकांना दहशवितो आणि दंगलीच्या निमित्ताने कापुनी काढतो, याचे भान राहत नाही. परिणामत: जागतिक पातळीवर, अमेरिकेची री ओढत धर्मनिरपेक्ष, लोकशाही राष्ट्रांच्या बाजूने मूलतत्त्ववादाच्या, धर्मांधतेच्या विरोधात उभे राहायचे व देशांतर्गत व्यवहारात त्याच धर्मांधतेचा आधार घेत दलित, धार्मिक अल्पसंख्याक, स्त्रिया व उपेक्षित गरिबांवर हिंदुत्वनिष्ठतेचा निकष वापरत वर्चस्व व नियंत्रण ठेवायचे असा दुटप्पी व्यवहार आपले

राज्यकर्ते करीत आहेत. या दुटप्पी वागण्याचे समर्थन करण्यासाठी मग विद्यमान राज्यकर्त्यांना दोन गोष्टी कराव्या लागतात. एक, इथले धर्मनिरपेक्षतावादी कसे दांभिक आणि धर्मद्रोही आणि म्हणून हिंदूविरोधी आहेत हे सांगून त्यांना 'कृतक धर्मनिरपेक्षतावादी' म्हणणे किंवा दोन, हिंदुत्व हेच कसे धर्मनिरपेक्ष आहे हे सांगत बिगरहिंदू समाजाची धार्मिक ओळख अधिक अधोरेखित करीत राहणे. याचे भान भाबड्या हिंदूंना राहत नाही. मतलबी हिंदुत्ववादी मंडळी याच भाबड्या हिंदूंचा गैरफायदा घेत बिगरहिंदू समाजांना त्यांच्या धार्मिक ओळखीच्या आधारे संघटित करण्यात हातभार लावतात. त्यातून कडव्या धार्मिक अल्पसंख्यवादाचे आव्हान धर्मनिरपेक्षतेपुढे उभे राहते. कडव्या धार्मिक अल्पसंख्यवादाचा धाक घालून व त्याचा प्रतिकार करण्यासाठी हिंदुत्ववादी मंडळी मग कडव्या धार्मिक बहुसंख्यांकवादाचे समर्थन करतात. या प्रक्रियेतून धर्मनिरपेक्षतेपुढे कडवा धार्मिक अल्पसंख्यांकवाद व कडवा धार्मिक बहुसंख्यांकवाद असे दुहेरी आव्हान उभे राहते. या आव्हानांशी एकाच वेळेला झुंज घेत धर्मनिरपेक्षतावाद्यांना आपला संघर्ष उभा करावा लागणार आहे.

नवसनातनवादाचा म्हणजे प्रतिगामी धार्मिक शक्तींचा सर्व प्रदेशांत झालेला उदय ही जागतिकीकरणाने सुरू केलेली एक प्रक्रिया आहे.

विवेकी इच्छा (रॅशनल डिझायर) आणि विवेकी मान्यता (रॅशनल रेकग्नीशन) या दोन मानवी इच्छांच्या खांबांवर सारी इतिहास प्रक्रिया उभी असते. या दोन्ही इच्छा विशिष्ट प्रकारचे संतुलन निर्माण करून त्याचे पूर्ण समाधान फक्त उदारमतवादी लोकशाहीच करू शकते. त्यामुळे इतिहासाचा अंत म्हणजे युद्ध आणि रक्तपात क्रांतींचा अंत होय. इतिहासाला जन्माला घालणारी कारणे नष्ट करणे म्हणजेच 'इतिहासाचा अंत' होणे होय. फ्रान्सिस फुकुयामांचा 'एंड ऑफ हिस्ट्री' हा ग्रंथ गेल्या काही दशकांतील जागतिक घडामोडींची माहिती देत एका जुन्याच प्रश्नाला भिडतो. तो प्रश्न आहे, जो सुसंगतीपूर्ण आणि दिशादर्शी असा मानवी इतिहास जगातील मोठ्या लोकसंख्येला अंतिमतः उदारमतवादी लोकशाहीपर्यंत नेऊन सोडणारा आहे. फुकुयामा ज्या उदारमतवादी लोकशाहीचा निर्णायक विजय झाला आहे असे म्हणतात, त्या लोकशाहीत समतेचे स्वरूप काय राहील हे महत्त्वाचे आहे. फुकुयामा यांच्या मांडणीतून समता विरुद्ध स्वातंत्र्य या संघर्षाच्या तपशिलाची माहिती मिळते. स्वातंत्र्य, समतेचा बळी घेण्याची शक्यता असते असे दर्शवणारी या ग्रंथातील काही प्रकरणांची शीर्षके समतेच्या दृष्टीने आणि तिच्या पुढील आव्हानांच्या दृष्टीने फार सूचक आहेत. फ्रान्सिस फुकुयामा यांच्या ग्रंथानंतर त्यांच्याविरोधात मांडणी करणारा एक महत्त्वाचा ग्रंथ सॅम्युअल यांनी दिलेला तो त्यांनी 'द क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन अँड मेकिंग ऑफ वर्ल्ड ऑर्डर' या नावाने प्रसिद्ध केला.

आज कडव्या धार्मिक अल्पसंख्याकवादाच्या विरोधात कडवे धार्मिक बहुसंख्यांकवादी उभे रहात आहेत. कडव्या धार्मिक अल्पसंख्याकवादापेक्षा कडव्या धार्मिक बहुसंख्यांकवादाचा धोका हा केव्हाही अधिक व्यापक, जोखमीचा व तीव्र असल्याने धर्मनिरपेक्षतावादींना प्रथम या कडव्या बहुसंख्यांकवादाशी सामना करावा लागत आहे. या संघर्षात चित्र असे उभे राहते, की धर्मनिरपेक्षतावादी लोक हे बहुसंख्य हिंदूंच्या विरोधात आहेत आणि म्हणून त्यांच्यावर हिंदूद्रोही, हिंदूविरोधक अशा मुद्रा ठोकण्यात येत आहेत. परिणामतः धर्मनिरपेक्षतावादी मुख्य क्षेत्रातून हिंदूविरोधी म्हणून हद्दपार केले जात आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, की 'द मायनॉरिटीज आर लोकली एक्सेप्टेड विच इज बेसिकली कम्युनल मेजॉरिटी अँड नॉट पॉलिटिकल मेजॉरिटी' हे विधान अतिशय महत्त्वाचे आहे. कारण बाबासाहेब ज्या पद्धतीने भारतीय समाजाचा वेध घेत आहेत आणि आज जो मुद्दा पुन्हापुन्हा येतो, की इथला बहुसंख्य कोण? आणि त्याचे उत्तर असे दिसते, की इथला बहुसंख्य हा हिंदू आहे. बहुसंख्य हिंदू अशी जेंव्हा आपण व्याख्या करतो आणि तेव्हा ती बहुसंख्या ही जमातवादी असते आणि बाबासाहेब म्हणतात तशी राजकीय बहुसंख्या नसते. म्हणून बाबासाहेबांनी पुढे असे म्हटले आहे, 'इट इज फॉर मेजॉरिटी टू रिलीज इट्स ड्युटीज नॉट टू डिस्क्रीमिनेट अगेन्स्ट मायनॉरिटीज वेदर द मायनॉरिटी कॅन कंटिन्यू टु मॅनेज मस्ट डिपेंड अपॉन धिस हॅबिट ऑफ मायनॉरिटी. द मुवमेंट मायनॉरिटी कॅन हॅव ग्राउंड' हे विधान भारतीय समाजवास्तवावर प्रकाश टाकणारे आहे. या विधानाच्या अनुषंगाने गांधीजी जे पुन्हापुन्हा आपल्याला सांगत होते, ते लक्षात ठेवले पाहिजे. विशेषतः वसाहतिक समाजाच्या संदर्भात गांधीजी असे म्हणत होते, की येथे दोन प्रमुख अंतर्विरोध आहेत. या दोन अंतर्विरोधांचा निरास झाल्याशिवाय भारत नावाचे धर्मनिरपेक्ष राष्ट्र-राज्य येथे प्रस्थापित होऊ शकत नाही. त्यातला एक अंतर्विरोध हा वसाहतकालीन समाजाच्या संदर्भात हिंदू-मुस्लिम आहे आणि दुसरा दलित व सवर्ण हा आहे. म्हणून गांधीजी म्हणतात, की जर स्वराज्य आणायचे असेल तर दलित आणि सवर्ण व हिंदू आणि मुस्लिम हा अंतर्विरोध संपला पाहिजे. यामध्येच धर्मनिरपेक्ष भारताच्या निर्मितीची बीजे आहेत.

आज आपल्यापुढे असे चित्र दिसते, की सबंध धर्मवादाचे राजकारण चालले आहे ते नेमके या दोन संकल्पांना धक्का देणारे, सुरुंग लावणारे आहे. हा केवळ मुस्लिमविरोधी अजेंडा नाही, तर तो दलितविरोधी असादेखील आहे. जेव्हा या देशात या दोन सामाजिक ऊर्जा एकत्र येतील, तेव्हा हिंदुत्वाचा प्रकल्प हा संपूर्णतः नष्ट होणार आहे. तो नष्ट होऊ द्यायचा नसेल, तर या पद्धतीच्या दोन्ही अंतर्विरोधांना सतत खतपाणी घालणे आणि मग हिंदुत्वाची तथाकथित एक व्यापक व्याख्या सांगत सगळ्यांना त्यात घेणे आणि ते जर येत नसतील तर त्यांना देशद्रोही ठरवणे अशा पद्धतीची रणनिती आखलेली आपल्याला दिसते आहे. म्हणून साधारण चित्र असे आहे, की १९५० ते ९० च्या दशकापासून एक सुनियोजित प्रयत्न व्यवस्थितपणे चालू आहेत. यातून देशाचे धर्मनिरपेक्षतामूल्य, भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून आपण राबविण्याच्या प्रयत्नात आहोत. त्याची अधिमान्यता कशी काढून घेतली जाईल? विशेषतः नवीन पिढीतल्या युवांची मने संभ्रमित करणारा धर्मनिरपेक्षतेबद्दलचा एक मुद्देसूद युक्तिवाद हिंदुत्ववाद्यांकडून केला जातो आहे.

संस्कृतीचे क्षेत्र हे आता राजकारणाचे क्षेत्र झालेले आहे. म्हणून आता धर्माचा, जातीचा, भाषेचा राजकारणासाठी उपयोग होतो आहे. ही सगळी आपल्या जगण्याची संस्कृतीची क्षेत्रे आहेत. आज ज्या पद्धतीने धर्मस्थळांची वाढ होत आहे, धार्मिक कार्यक्रमांना

पैसा ओतला जात आहे, ज्या पद्धतीने सांस्कृतिक क्षेत्रातील खेळ, गाणी, संगीत, चित्रपट यांसारखी जवळपास सर्वच सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पैसा पोहोचविला जात आहे, हा सगळा पैसा कुठून येतो? त्यालाही ही आमची सांस्कृतिक गुंतवणूक आहे असे म्हटले जात आहे. याच पद्धतीने पर्यटन विकसित होत आहे. त्यात धार्मिक पर्यटनाच्या नावाने वेगवेगळी धार्मिक स्थाने, तीर्थक्षेत्रे, संतांची गावे या ठिकाणांना सहलींचे आयोजन स्थानिक लोकप्रतिनिधींकडून केले जात आहे. त्यामागेदेखील संघटितपणे यंत्रणा कार्यान्वित ठेऊन पैसा उभा केला जात आहे. यातून नेमके काय साध्य होत आहे, याचा अंदाज सर्वसामान्य जनतेला येतच नाही. हा तुमच्या-आमच्या धर्मवादी जाणिवा जपण्याचा आणि वृद्धिंगत करण्याचा कार्यक्रम सुरू आहे. अशा पद्धतीने आपल्याला अधिकाधिक जमातवादी करण्याचा प्रयत्न चालविला जातो आहे. इथे मात्र सर्वधर्मसमभाव आहे. जसा हिंदूंच्या मागे पैसा उभारणारी यंत्रणा आहे, तशीच ख्रिश्चनांच्या मागे, मुस्लिमांच्या मागेही पैसा उभारला जातो आहे. त्यांची धार्मिक स्थळे अस्मिता केंद्र आणि उद्योगाची क्षेत्र बनतील असा प्रयत्न चालविला जातो आहे.

आपल्याला वाटते, की भांडवलशाही-उदारमतवाद-धर्मनिरपेक्षता-विवेकवाद यांचे काही एक नाते आहे. हे नाते इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये समजून घ्यावे लागते आणि ते काही शाश्वत सत्य नाही. हीच भांडवलशाही एका टप्प्यावर मुक्तीदायी असते, जेंव्हा ती सरंजामशाही अवस्थेतून मानवी समाजाला पुढे घेऊन जाते. पण तीच भांडवलशाही दुसऱ्या टप्प्यावर दमनकारी (रिप्रेसिव्ह) होत असते आणि तिथे हे दमनकारी रूप दिसू नये म्हणून त्यावर संस्कृतीची आवरणे घातली जातात. सर्वसंबंधित लोकांना त्यामध्ये गुंतवून ठेवले जाते, लोक त्यात गोठतात, बधीर होतात. ते असंवेदनशील झाले पाहिजेत, असा प्रयत्न केला जातो. त्यासोबत इथल्या स्त्रिया, अल्पसंख्याक, गरिबांवर होणाऱ्या अत्याचारांची सवय लोकांना होऊ दिली जाते. किंबहुना, नवधर्मवाद आपल्याला सांगतो, की इथल्या धार्मिक आणि भौतिक भानगडींमध्ये न गुंतता जगण्याच्या प्रश्नांमुळे निर्माण झालेल्या ताणतणावांचे व्यवस्थापन करा, तणावमुक्तीचे प्रशिक्षण घ्या आणि व्यवस्था परिवर्तनापासून अलिप्त राहा. आज देशातील २५ कोटींपेक्षा जास्त लोकसंख्येने मौजूद असणारा मध्यमवर्ग याच नवधर्मवादाच्या आहारी गेलेला आहे. पक्षीय व निवडणुकीच्या राजकारणात प्रभाव टाकणारा मध्यमवर्ग बोलका आहे, त्याच्या बोलण्याचा काही प्रभाव पडतो. जो सर्वसामान्यांच्या पुढे प्रतीक म्हणून उभा असतो, तो मध्यमवर्ग जर आत्ममग्न झाला, जमातवादी झाला, तर या देशातील धर्मनिरपेक्षता अधिक धोक्यात येऊ शकते. आपण या गप्पा मारतो आणि ज्या विचारवारसांचा दावा करतो त्या संत, समाजसुधारक, महामानवांच्या प्रतीकांचा उदो-उदो करतो. त्यांचा विचार, प्रेरणा आपल्या जगण्यात आणण्यामध्ये आपले प्रयत्न अपुरे असतात आणि त्यामुळे आपण जमातवादी होत चाललो आहोत.

आर्थिक व भौतिक प्रश्नांचे महत्त्व अधोरेखित करून त्यांच्या आधारे लोकसंग्रह, लोकसंघटन व जनशक्तीचे संचलन केले तर धर्माबाबतची व धर्मनिरपेक्षतेबाबतची वायफळ चर्चा आपोआप बंद होईल व आपापल्या प्रश्नांच्या आधारे लोक संघटित होतील. पण जागतिकीकरणाच्या काळातील अर्थकारण हे आता धर्मवादापासून मुक्त राहिलेले नाही. अशा परिस्थितीत नुसते आर्थिक बळ जरी स्वतंत्रपणे उभे केले, तरी त्यातून संबंधित समाजघटकांचे धर्मनिरपेक्षतेविषयीचे प्रबोधन होईल असे नाही. माणसे आर्थिक लाभासाठी संघटित होतात व आर्थिक लाभ मिळवतात. पण तीच मंडळी धर्मवादी शक्तींबरोबर आनंदाने जातात हे आपण अनुभवलेले आहे. म्हणूनच विविध समाजघटकांचे धर्मनिरपेक्षतेविषयक प्रबोधन हे सातत्याने विविध आकृतीबंधातून झाले पाहिजे. त्यासाठी धर्मनिरपेक्षतेबाबतच्या आपल्या धारणा व चौकटी बदलायला हव्यात.

माणसे धर्माचा त्याग करतात, की धर्माला चिकटून राहतात हा प्रश्न नसून ते आपला धर्म पाळतांना माणसाला प्रतिष्ठा देणाऱ्या त्याच्या मुक्तिदायी प्रयत्नांना व क्षमतांना वाव देणाऱ्या मानवी मूल्यांशी सुसंवाद कसा करतात, हा मुद्दा आहे. म्हणूनच स्वातंत्र्य, समता, सहिष्णुता, विवेकवाद, बंधुता, विज्ञान युगातील माणसाची विविध प्रकारची होणारी, होऊ शकणारी दास्यमुक्ती यांच्याशी जो धर्मव्यवहार विसंगत असेल तो धर्मनिरपेक्षतेला नकार देणारा ठरवून या मूल्यांशी सुसंवादी राहणारी धार्मिकता ही धर्मनिरपेक्षतेचा भाग म्हणून स्वीकारली पाहिजे.

**'सेक्युलॅरिझम' की धर्मनिरपेक्षता, भारतीय कसावर आधारित हवी!**

'सेक्युलॅरिझम' म्हणजे 'इहवाद' संकल्पना युरोपात साकारलेली आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेने त्याबाबत तरतुदी केल्या होत्या. त्याप्रमाणे शासन हे धर्माशी निगडित नसते. एवढेच नाही तर शासन आणि धर्म यामध्ये एक भिंत उभी केली गेली; परंतु शासन धर्माला प्रतिबंध करीत नाही. शासन व्यक्तीच्या स्वातंत्र्याची हमी देते आणि स्वातंत्र्यात त्याच्या धर्मविषयक स्वातंत्र्याचाही समावेश असतो.

मानवी हक्कांच्या तत्त्वज्ञानाचा हा अविभाज्य भाग आहे, की व्यक्तींचे स्वातंत्र्य, समता आणि न्याय या मूल्यांचे संवर्धन आणि रक्षण शासनाने केले पाहिजे. म्हणजेच इहवादी शासन हे धर्मविरोधी शासन नसते. पण जसे ते धर्म मानणाऱ्यांचे स्वातंत्र्य मानते, तसेच ते धर्म न मानणाऱ्यांचेही स्वातंत्र्य मानते. कारण ते धर्माचे रक्षण करीत नसून, स्वातंत्र्याचे रक्षण करीत असते.

कम्युनिस्ट देशांमध्ये सेक्युलॅरिझम त्याच्या कक्षेपलीकडे गेलेला दिसतो. रशियामध्ये व्यक्तीला धर्माबाबतचे स्वातंत्र्य नाकारले गेले. म्हणजे घटनेच्या तरतुदी काहीही असोत, प्रत्यक्षात ते स्वातंत्र्य उपलब्ध नव्हते. म्हणजेच कम्युनिस्ट शासन हे धर्माबाबत केवळ त्रयस्थाची भूमिका घेत नसे, तर विरोधकाची भूमिका घेत होते. कम्युनिस्ट देशांचा इतिहास पाहिला असता, अशी धोरणे यशस्वी होत नाहीत असेच म्हणावे लागेल.

**भारताच्या संविधानकारांना काय अपेक्षित होते?**

स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास पाहिला असता, 'इहवादी' शासनाची संकल्पना भारतीय नेत्यांच्या मनात असावी असे वाटत नाही. विविध धर्म आणि संस्कृतीचे असे 'संमिश्र राष्ट्रीयत्व' ही संकल्पना परकीय सत्तेच्या विरोधातल्या आंदोलनाने साकारली गेली.

आपण कुठल्याही धर्माचे असलो तरी आधी आपण भारतीय

आहोत ही प्रेरणा त्यामागे होती. हिंदू महासभा आणि मुस्लिम लीगने द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत मांडला होता. त्याला विरोध करीत 'धर्म आणि राष्ट्रीयत्व ह्या वेगवेगळ्या संकल्पना असू शकतात', असे काँग्रेस नेतृत्वाने त्यावेळी आग्रहाने मांडले. इंग्रजी सत्तेने 'फोडा आणि झोडा' ही नीती अमलात आणली होती. तिला निष्फळ करण्यासाठी काही वेळा काँग्रेसी नेत्यांनी मुसलमानांना झुकते माप देण्याची तयारी दाखवली. यातून भारतीय शासनाबाबतचे दोन प्रमुख मुद्दे मांडले गेले.

१) भारतात धर्माच्या कारणास्तव पक्षपात केला जाणार नाही. कायद्यापुढे सर्व समान असतील. कुठल्याही पदाकरता धर्माची अट असणार नाही आणि

२) प्रत्येक व्यक्तीला आपल्या धर्मावर श्रद्धा ठेवण्याचे व त्यानुसार आचरण करण्याचे किंवा त्याचा प्रचार, प्रसार करण्याचे स्वातंत्र्य असेल.

शासनाने धर्माशी कुठलाही संबंध ठेऊ नये, या तत्त्वाबाबत मात्र तडजोड केली गेली. याचे कारण इंग्रजपूर्व काळापासूनच धर्माला शासनाने मदत करावी, अनुदान द्यावे ही पद्धत रुढ होती. इंग्रजी राज्यकर्त्यांनीही तीच पद्धत पुढे सुरू ठेवली. त्यामुळे धर्मविषयक देवस्थानांचे नियमनदेखील शासन करीत होते, तसेच त्यांना आर्थिक मदतही ते करीत होते. भारतीय संविधानातील कलम २९० मध्ये तरतूद आहे, की केरळ शासनाने त्याच्या एकत्रित निधीतून त्रावणकोर-कोचीनमधील देवस्थानांना दरसाल ४६ लाख ७० हजार आणि तामिळनाडू राज्याने त्याच्या एकत्रित निधीतून तेथील देवस्थानांना १३ लाख ५० हजार एवढी रक्कम दरवर्षी द्यावी. इहवादी शासनाच्या रूढ असलेल्या संकल्पनेशी विसंगत अशी ही तरतूद असली, तरी त्रावणकोर व कोचीन संस्थानांच्या विलीनीकरणाच्या करारातील ती एक आवश्यक अट होती आणि म्हणूनच तिला भारतीय संविधानात स्थान मिळाले. भारतीय संविधानात कलम २७ आहे, की शासनाने कुठल्याही एका धर्माच्या संवर्धनाकरिता किंवा विकासाकरता लोकांवर कर लादता उपयोगाचा नाही; परंतु शासनाला सर्व धर्मांना पक्षपात न करता अनुदान देता येते किंवा धर्मांशी निगडित अशा व्यवहारांना करमाफी किंवा इतर सवलती यांसारख्या अप्रत्यक्ष मार्गाने मदतही करता येते. ही तरतूद संविधानविरोधी मात्र नाही. अशा सवलती कल्याणकारी राज्य अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांना देत असते. मग एखादी कृती धर्माशी निगडित आहे म्हणून त्याला सवलती नाकारल्या जात नाहीत. अमेरिकेतील शासन मात्र धर्माशी निगडित संस्थांना कुठलेच साहाय्य करीत नाही.

आपले शासन इहवादी शासनाच्या रूढ ढाच्यापेक्षा निराळे आहे. ते धर्मनिरपेक्ष नक्कीच आहे. धर्मनिरपेक्ष हा शब्द 'सेक्युलॅरिझम' पर्याय म्हणून भारतीय संविधानाच्या मराठी अनुवादातदेखील वापरलेला दिसतो. 'धर्मनिरपेक्ष' या शब्दात 'सेक्युलॅरिझम' शब्दाची सर्व आवश्यक अंगे समाविष्ट होत नाहीत. भारतीय संविधानाबाबतची तीन तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत. एक) पक्षपात न करणारे शासन, दोन) धर्माचे स्वातंत्र्य व्यक्तीला देणारे शासन आणि तीन) सर्व धर्मांना समानतेने वागवणारे शासन. 'धर्मनिरपेक्षता' या शब्दात पक्षपात न करणारे शासन अभिप्रेत असले तरी क्रमांक २ व ३ ची तत्त्वे त्यात समाविष्ट होतात का, याबद्दल काही शंका उपस्थित होत असल्यामुळे 'सेक्युलॅरिझम' हा इंग्रजी शब्द धर्मनिरपेक्षता शब्दाऐवजी वापरण्याचे स्वातंत्र्य घेतले जाते.

**अंधश्रद्धा निर्मूलन, धर्मचिकित्सा व धर्मनिरपेक्षता : आव्हान आणि अपेक्षा**

धर्मविषयक जे स्वातंत्र्य देण्यात आले आहे, त्यावर भारतीय संविधानाने खूप बंधने लादली आहेत. या कलमांची चर्चा ज्यावेळी घटना समितीत झाली, त्यावेळी मूळच्या मसुद्यावर अल्लादी कृष्णस्वामी अय्यर यांनी टीका केली होती. अय्यर यांनी स्पष्ट केले, की या समाजात नरबळी व अस्पृश्यता यांसारख्या पद्धती धर्माचे कवच घेऊन वावरतात. तिथे धर्माबाबत स्वतंत्र निर्बंध असे दिले गेले तर समाजाची प्रगती थांबेल. युरोपात इहवादी शासन अस्तित्वात येण्यापूर्वी शासन आणि धर्म यांना एकमेकांपासून विभक्त करणारी सीमारेषा स्पष्टपणे काढली गेली होती. भारतातल्या या दोन प्रमुख धर्मांच्या बाबतीत म्हणजे हिंदू आणि इस्लाम धर्मांबाबतीत तसे झालेले नाही. धर्मात व्यक्तींच्या जीवनाच्या सर्वच व्यवहारांचे नियम धर्मांनी केलेले आहेत. हे नियम अनेकदा आधुनिक समाजाच्या मूल्यांशी विसंगत आहेत. म्हणजे केवळ ते विवेकहीन आहेत असे नव्हे, तर ते काही बाबतीत व्यक्तिस्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय यांच्याही विरोधात जातात. मग या सर्व बाबतीत जर धर्माचे स्वातंत्र्य अबाधित ठेवले गेले असते, तर भारतात आधुनिक शासनव्यवस्था उभी राहणे अशक्य झाले असते. याकरता धर्म स्वातंत्र्यावर अनेक बंधने लादण्याची क्षमता शासनाला देण्याच्या तरतुदी संविधानाच्या कलमात करण्यात आल्या आहेत. धर्माबाबतची श्रद्धा, त्यानुसार आचरण करणे किंवा त्याचा प्रसार करणे ही स्वातंत्र्ये सीमित प्रमाणात घेण्यात आली आहेत. या सीमा खालील मुद्यांवर आधारित आहेत. एक) कायदा व सुव्यवस्था, दोन) नीतिमत्ता आणि तीन) सार्वजनिक स्वास्थ्य. या उद्दिष्टांशी सुसंगत असेल तेवढेच स्वातंत्र्य व्यक्तीला असेल. याशिवाय व्यक्तीच्या धर्माबाबतच्या स्वातंत्र्याची व्याप्ती घटनेने दिलेल्या इतर मूलभूत अधिकारांनीदेखील सीमित केली आहे. म्हणजेच धर्मपालनाच्या स्वातंत्र्यात समता नाकारणे, अस्पृश्यता पाळणे, व्यक्तीचे स्वातंत्र्य संकुचित करणे याचा समावेश होत नाही. या मर्यादेतच जे स्वातंत्र्य देण्यात आले आहे, त्यावरही मर्यादा घालण्याची क्षमता, अधिकार शासनाला बहाल करण्यात आले आहेत. या मर्यादांमध्ये एक) धर्माशी निगडित असणाऱ्या ऐहिक, आर्थिक, सामाजिक व्यवहारांचे नियमन करणे; दोन) हिंदूंची सर्व देवालये त्या सर्व त्या धर्मातील सर्व जाती, जमातींसाठी खुली करणारे कायदे करणे आणि तीन) सामाजिक कल्याण व सुधारणा यांकरता कायदे करणे. कलम २५ मधील मूलभूत हक्क हा व्यक्तीला देण्यात आला आहे. तो हक्क केवळ भारतीय नागरिकाला देण्यात आलेला नसून नागरिक नसलेल्या व्यक्तींनाही तो उपलब्ध आहे. कलम २६ मुळे प्रत्येक धर्म, संप्रदायास अथवा त्यापैकी कोणत्याही गटास क) धार्मिक व धर्मादाय प्रयोजनाकरता संस्थांची स्थापना करून त्या स्वखर्चाने चालवण्याचा; ख) धार्मिक बाबतीत आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा; ग) जंगम व स्थावर संपत्ती मालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा आणि घ) कायद्यानुसार अशा संपत्तीचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल असे घोषित केले आहे. (उत्तरार्ध पुढील अंकात...)

# वैश्विक शोषणाशी नाळ जोडलेली राजकीय भानाची कविता

**आदिम शोषणव्यवस्थेचं आधुनिक रूप आपल्याला अनुराधा पाटील यांच्या 'आता वह्या सगळ्या बुडीत खाती' या अलीकडेच प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहात सविस्तर पहायला मिळतं. एक प्रकारे रूपकाचं आवरण घेतलेला हा कवितासंग्रह वर्तमानाचा सर्व्हे आहे, नोंद आहे आणि भविष्यातील 'राजकीय इतिहास' आहे. त्यामुळे या संग्रहावर लिहिणं मला उचित आणि महत्त्वाचं वाटतं.**

**अंशुमन पाटील**

१) महान दिग्दर्शक कोस्ता गाव्हास यांच्या 'झी' या १९६९ साली प्रदर्शित झालेल्या राजकीय रहस्यपटात डिस्क्लेमरमध्ये (opening credit/अस्वीकार/तळटीप) पडद्यावर एक वाक्य उमटतं–

''सदर चित्रपटातील पात्र आणि घटनांचे जीवित वा मृत व्यक्तींशी साधर्म्य आढळल्यास त्यास योगायोग समजू नये. तसे (साधर्म्य) मुद्दाम केलेले आहे.''

२) जॉर्ज ऑरवेल, त्यांच्या १९४५ सालच्या 'ॲनिमल फार्म'च्या ब्लर्बमधून सांगतात – ''सगळे प्राणी समान असतात पण काही इतरांच्या तुलनेत अधिक समान असतात.''




३) सन २०२३ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त अनुराधा पाटील त्यांच्या ''आता वह्या सगळ्या बुडीत खाती'' या कवितासंग्रहाच्या पहिल्या पानावर लिहितात –

**''आम्ही भटकतोय आजही**
**मोहेंजोदडोच्या सुनसान गल्लीबोळात**
**रहिवासी असल्याचा पुरावा शोधत**
**नकाशाचे कानेकोपरे**
**पुन्हा एकदा पुसून जाताना''**

सन १९४५, १९६९ आणि २०२३. भिन्न काळ, भिन्न भूगोल, भिन्न समाज, साहित्याचे भिन्न प्रकार, साधर्म्य एकच. राजकीय व्यवस्थेनं सामान्य माणसाची केलेली दैना दाखवणं. तिन्ही साहित्य रूपे प्रात्यक्षिक, (एम्पेरिकल), रूपकात्मक, प्रखर राजकीय. ही तिन्ही साहित्यरूपे विभिन्न कालखंडात, भिन्न परिस्थितीत लिहिली गेली. तरी जगाच्या कोणत्याही कालखंडात, कोणत्याही परिस्थितीत ती लागू होतात. कारण शोषणाच्या व्यवस्था पूर्वापार आहे तशाच आहेत. निराळी रूपे त्या घेत राहतात. पण शोषण आणि वर्चस्व कायम राहतं. या आदिम शोषणव्यवस्थेचं आधुनिक रूप आपल्याला अनुराधा पाटील यांच्या ''आता वह्या सगळ्या बुडीत खाती'' या अलीकडेच प्रकाशित झालेल्या कवितासंग्रहात सविस्तर पहायला मिळतं. एक प्रकारे रूपकाचं आवरण घेतलेला हा कवितासंग्रह वर्तमानाचा सर्व्हे आहे, नोंद आहे आणि भविष्यातील 'राजकीय इतिहास' आहे. त्यामुळे या संग्रहावर लिहिणं मला उचित आणि महत्त्वाचं वाटतं.

दुसऱ्या महायुद्धानंतर साम्यवादी रशियात स्टॅलिनची असलेली एकाधिकारशाही 'ॲनिमल फार्म'चा विषय बनली, तर ६० च्या दशकातील ग्रीकमध्ये सुरू झालेली मिलिटरी एकाधिकारशाही कोस्ता गव्हासच्या सिनेमाचा. ''आता वह्या सगळ्या बुडीत खाती'' या काव्यसंग्रहातूनही सद्यस्थितीतील कमी अधिक फरकाने याच प्रकारच्या एकाधिकारशाहीवर नेमकं बोट ठेवलं गेलं आहे. त्यामुळे या कवितासंग्रहाकडे राजकीय कवितासंग्रह म्हणून पाहणं महत्त्वाचं ठरतं. या संग्रहातील एकूण ५२ कवितांपैकी २५ कविता या राजकीय व्यवस्थेवर भाष्य करणाऱ्या आहेत. काही कविता सामाजिक प्रश्नांच्या, तर ६ कविता कोरोनासंदर्भातील आहेत आणि अनुराधाबाई ज्या आत्मनिष्ठ कवितांसाठी ओळखल्या जातात त्या कवितांची संख्या फार थोडी आहे. पाच दशकं आत्मनिष्ठ कविता लिहिणारी बाई आपली साठी ओलांडल्यानंतर राजकीय व्यवस्थेचं विषण्ण करणारं चित्र का रेखाटत असेल? समाजाशी एकरूप होऊन आत्मनिष्ठ कविता लिहिणारी बाई समाजाला आपल्यातून बाहेर काढून, त्याच्या डोळ्याला डोळा देत, राजकीय व्यवस्थेच्या समाजावर वाढणाऱ्या प्रभावाचे काटेकोर परीक्षण का करत असावी? हे सारं समजून घेण्याआधी राजकीय कवितेचा इतिहास चाचपडून पाहणं आवश्यक आहे.

राजकीय कविता ही विश्वातील, समाजातील, महत्त्वाच्या मुद्द्यांवर जागृती करण्याचे आणि वाद-संवाद घडवून आणण्याचे एक शक्तिशाली माध्यम आहे. याद्वारे कवी व्यवस्थेच्या शोषणावर, राजकारण्यांच्या चलनावर बोट ठेवत असतो. त्यामुळेच राजकीय कविता ही 'पोएट्री ऑफ डिसेंट- विरोधाची कविता' म्हणून

ओळखली जाते. होमर आणि आपल्याकडे व्यासापासून सुरू झालेली ही कविता 'रेनेसन्स'च्या काळात खऱ्या अर्थाने डिसेंटची कविता बनली. या कवितेतून राजकीय व्यवस्था सामाजिक व्यवस्थेला कशी प्रभावित करते वा नासवते याकडे कवींनी लक्ष वेधलं आहे. ही कविता घटिताला प्रतिसाद देणारी असते, म्हणून तिला प्रतिक्रियावादी कविता म्हणता येईल. त्यातही प्रात्यक्षिक, रूपकात्मक, मिथकी, व्यंगात्मक, अमूर्त अशी रूपे ही कविता धारण करू शकते. अनुराधाबाईंच्या या संग्रहातील जवळपास २५ कविता या कवितेच्या अशा विभिन्न अंगांचे बोट धरून ठेवतात. त्यामुळे त्यांची स्वतःची ओळख असलेला 'फॉर्म' यातही अगदी रुतून बसतो. अगदी प्रत्येक पानातल्या ओळीओळींमधून.

अलीकडे एखादी राजकीय भूमिका घेऊन लिहिलेली कविता ही राजकीय कविता संबोधण्याचा प्रकार फार संकुचित आहे. कारण रेनेसन्सच्या काळात जॉन मिल्टन, एडमंड स्पेन्सर, अलेक्झांडर पोप, जोनाथन स्विफ्ट यांनी जुलमी सत्तेच्या विरोधात कविता लिहिल्या. त्यांना डाव्या, उजव्या, पुरोगामी, समाजवादी, कम्युनिस्ट, मार्क्सवादी अशा आधुनिक राजकीय प्रकारांत गणता येत नाही. लोकांचं राज्य, विचारांचं अभिव्यक्ती स्वातंत्र्य, धार्मिक सहिष्णुता, लोकशिक्षण, जुलमी कायद्यांना विरोध या मूलभूत मूल्यांचा पुरस्कार करणारी कविता या काळात वर उल्लेखिलेल्या कवींनी लिहिली. जिला आज राजकीय कविता म्हणून संबोधलं जातं. आपल्याकडे याच मूल्यांचा स्वीकार, पुरस्कार आणि प्रचार करणारी कविता कबिराने लिहिली. व्यास, होमर, व्हर्जिल इत्यादी प्राचीन कवींनी कधी तटस्थ, तर कधी सत्तेचा गौरव करणाऱ्या कविता लिहिल्या. पण मध्ययुगापासून राजकीय कवितांचं स्वरूप हे प्रामुख्याने सत्तेच्या विरोधात आणि 'माणसाच्या' बाजूने राहिलं आहे. त्यामुळेच या दोन निकषांवर लिहिलेल्या कविता या स्थळकाळाची मर्यादा ओलांडून वैश्विक ठरतात. कित्येक कवींना अशी 'माणसा'ची राजकीय कविता लिहिताना अतोनात छळ सहन करावा लागला. अनुराधाबाईंना अशा छळाची पार्श्वभूमी नसली, तरी 'माणसाला नागवणारी व्यवस्था, त्यामुळे पुसट होत चाललेलं सामान्य माणसाचं अस्तित्व आणि शोषणाचे धागे' त्यांच्या या कवितांच्या केंद्रस्थानी असल्यानं अनुराधाबाईंची कविताही मिल्टन, पाब्लो, फैज, कबीर आणि ढसाळ यांच्या कवितांसारखीच वैश्विक ठरते.

'आता वह्या...' हा संग्रह तसा सर्वांनाच धक्का देणारा आहे. अगदी त्यांच्या टीकाकारांनासुद्धा. अनुराधा पाटील तशा आत्मनिष्ठ भाव-कवयित्री म्हणून ओळखल्या जातात. याकडे अनेकदा त्यांच्या कवितेची मर्यादा म्हणूनदेखील पाहिलं जातं. पण त्यांची कविता ही आत्ममग्नतेकडे झुकणारी कधीच नव्हती. '...तरीही' या कवितासंग्रहातून जेव्हा त्या लिहितात –

**'जेव्हा जाणवतं कुणाच्याही**
**दुःखाचा आतला चेहरा एकच असतो**
**आणि मातीची तहान त्यांनाही लागते'**

तर 'वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ' यात एके ठिकाणी त्या लिहितात –

**'पण चेहरा असो कवितेला**
**विनाशानंतर उगवणाऱ्या पहिल्या किरणांचा....'**

तेव्हा त्या समस्त मानवजातीची जाणीव-नेणीव कवेत घेऊ पाहतात. स्वतःच्या कक्षेत राहून सभोवताल फिरणाऱ्या मानवी शृंखलेची नाळ पकडू पाहतात. त्यांच्यातली ही मानवीय संवेदनशीलता अधिक खोल उतरते ती 'कदाचित अजूनही या कवितासंग्रहात'. बदलत्या राजकीय वातावरणाने सामान्य माणूस नागवला जात असल्याची स्पष्ट जाणीव घेऊन हा कवितासंग्रह येतो. विषमता, दुःख, सामान्य माणसाचं मातीमोल जगणं, हालअपेष्टा, स्त्रीजीवन, ग्रामीण जीवन, शिक्षण, इत्यादी सामाजिक विषयांवर जेव्हा अनुराधाबाई या संग्रहातून लिहितात, तेव्हा खरं तर ती राजकीय कवितांची एक प्रकारे नांदीच असते. सद्यस्थितीतील राजकारण आणि पर्यायाने समाजकारण 'माणूसपण' कायमचं घालवून बसण्याची बौद्धिक वर्गाला पडलेली धास्ती २०१७ साली आलेल्या या कवितासंग्रहात अनेक पानांवर दडून बसलेली दिसते. या एका कवितेतून ते अधिक स्पष्ट होतं–

**'जिथं ऐकू येत नाही**
**कुणालाच कुणाचा टाहो**
**जिथं रचल्या जातात श्रमाच्या गाथा**
**आणि लादलं जातं**
**आपल्या पाठीवर पुन्हापुन्हा**
**सक्तीचं रेखीव कुबड**
**दंतकथेच्या रूपानं'**

किंवा

**'आणि त्यांच्या नोंदवहीत तर**
**पुसट होत चाललंय**
**इतरांसारखं माझंही,**
**टिकलीएव्हढं बिनचेहऱ्याचं नाव'**

गेली ४० वर्षे आत्मनिष्ठ कवितांतून चेहरा नसलेल्या माणसांच्या कथा सांगणारी ही कवयित्री अत्यंत संवेदनशील आहे आणि सभोवतालचा इतिहास, राजकारण आणि बदलत्या मूल्यव्यवस्थेचा तिला नीट अभ्यास आहे; जाणीव आहे. पण मागील ४० वर्षांत कधीच वाटली नव्हती इतकी 'माणूसपण' संपण्याची भीती तिला वाटते आहे आणि त्यामुळेच जेव्हा ती 'कदाचित'...मध्ये लिहिते–

**'कदाचित अजूनही जगण्याला अर्थ असेल**
**पण नावानिशी जगण्याचं स्वातंत्र्य**
**संपूर्ण गहाळ होताना**
**करता येत नाही मला वाळूत तोंड खुपसून**
**सुटकेचा देखावा..'**

तेव्हा ती सरळपणे माणसाला गहाळ करणाऱ्या सत्तेविरूद्ध भूमिका घेते, जी भूमिका 'आता वह्या....' मधून स्पष्टपणे अवतरते. त्यामुळे 'कदाचित अजूनही' हा कवितासंग्रह म्हणजे अनुराधाबाईंच्या 'आता वह्या....' ची नांदी वाटते. ●●●

**(लेखक आंतरराष्ट्रीय साहित्याचे अभ्यासक आहेत.)**

---

**आता वह्या सगळ्या बुडीत खाती :**
**कवयित्री** : अनुराधा पाटील । **प्रकाशन** : शब्द पब्लिकेशन, मुंबई
**पृष्ठे** : १२० । **मूल्य** : २९५ रु.

# गायांच्या प्रदेशात महिलांचं काय होतंय...?

गायांचा आणि पवित्र स्थळांचा प्रदेश म्हणून जशी मध्य प्रदेशची ओळख आहे, तशीच ती सलग १५ वर्षे मुख्यमंत्रिपदावर राहिलेल्या शिवराजसिंग चौहान यांच्या एकहाती सत्तेची राजवट म्हणूनही मध्य प्रदेशची ओळख आहे. भाजपची सत्ता असलेल्या या राज्याला भगवे राज्य म्हटले जाते. कारण सारे मध्य प्रदेश भगवे आहे. इथेच जमिनीची छाती फोडून बाहेर पडलेल्या स्वयंभू हनुमानाचे तीर्थही आहे. सगळ्या रोगावर आणि पिडांवर तो इलाज सांगतो अशी त्याची ख्याती मध्य प्रदेश आणि आजूबाजूच्या राज्यांत पसरवण्यात आली आहे. मुख्यमंत्री 'मामा' या नाजूक नात्याच्या नावाने प्रसिद्ध आहेत. गेल्या पंधरा वर्षांत त्यांनी सर्वात अधिक कल्याणकारी योजना मुली आणि महिलांच्या नावाने जाहीर केल्या आहेत. मध्य प्रदेशात कुठंही जा, मामाचे आपल्या भाच्या आणि आपल्या गरीब बहिणींसोबतचे होर्डिंग्ज दिसतात. कंटाळा वाटावेत इतकी त्यांची गर्दी आहे. मुली जन्माला येण्यापासून योजना सुरू होतात आणि ती म्हातारी होईपर्यंत त्या चालूच राहतात. या योजनांचा नेमका लाभ काय आणि त्यांची अंमलबजावणी कशी होते, कुणालाच ठाऊक नाही. कुणी त्यांचं संशोधन करत नाही. गायांच्या प्रदेशात गाईला सुरक्षा देण्यासाठी लाखो पगारी गो सेवक आहेत. जणू काही त्यांच्या बेकारीचा प्रश्न गायांनी आणि गायांचा प्रश्न हिंदुत्ववादी राजकारण्यांनी सोडवला आहे. बहुतेक बायांना उपजीविकेसाठी गाया आहेत. त्या बांधायला त्यांच्याकडे जागा नाही आणि त्यांना जगवण्यासाठी त्यांच्याकडे वैरण नाही. गावोगावचे मुख्य रस्ते आणि त्यातला मुख्य भाग म्हणजे गायांचे निवासस्थान. रस्त्यांवर पडणारा कचरा हे त्यांचे खाद्य आणि आजूबाजूला काठ्या घेऊन, भगवे धारण करून फिरणारी पोरे म्हणजे त्यांचे रक्षक. हे सारं ठीक मानलं तर गायांच्या मागे उभ्या असलेल्या आणि संसदेत एका भगव्या विचारांच्या माणसाने केलेल्या भाषणानुसार ज्यांच्यात दुर्गा, सरस्वती आणि लक्ष्मी यांचा वास असणाऱ्या बायांचे काय, हा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर मामाकडे नाही. कारण दोनच वर्षांपूर्वी जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीनुसार, मध्य प्रदेशात रोज १८ महिलांवर बलात्कार होतात. म्हणजे दोन तासाला एक. गांभीर्याची गोष्ट म्हणजे, या अठरा महिलांमध्ये पन्नास टक्के अल्पवयीन मुली आहेत. चार तासाला एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार होतो. सर्वच गुन्ह्यांची नोंद काही होत नाही. चारित्र्याला घाबरून पोलिसांत न जाणाऱ्या पीडित महिलांचे प्रमाणही खूप आहे. नोंदवलेल्या आणि न नोंदवलेल्या गुन्ह्याची अंदाजे बेरीज केली, तर रोज छत्तीस बलात्कार म्हणजे तासाला दीड असे हे प्रमाण आढळेल. गाई आणि बाईसाठी चालणाऱ्या राज्यातील हे चित्र आहे.



बलात्काराच्या घटना रोज घडत असल्या तरी साऱ्याच काही बातम्यांचा विषय होत नाहीत. जो बलात्कार एक भळभळती वेदना होऊन आक्रोश करत फिरतो, तो बातमीत येतो. बाकीच्या वेदना मुक्यानेच मरत असतात. उज्जैन या देशातील एका पवित्र ठिकाणी एका बारा वर्षांच्या मुलीवर एका नराधमाने माणुसकीचेच वस्त्रहरण व्हावे अशा पद्धतीने बलात्कार केला. शरीर काय असतं आणि शरीरसुख काय असतं याची ओळख नसलेल्या मुलीवर एकाने उघड्यावरच बलात्कार केला. तिला सोडून दिले. ही मुलगी मदतीसाठी शहरात ठिकठिकाणी फिरली. शरीरातून रक्तस्त्राव होत होता. रस्त्यावर रक्त सांडत होते. हे सारं दृश्य सीसीटीव्ही कॅमेरे टिपत होते. पण या पवित्र शहरातील माणूस नावाची जमात मात्र टिपत नव्हती. अनेक गेटवर मुलगी थांबली. पण घराचे आणि मनाचे दरवाजे बंद होत होते. शेवटी ती पोलिसांच्या हाती लागली. उपचारही सुरू झाले. पण आरोपी चार दिवस झाले तरी सापडत नव्हता. शेवटी तो सापडला. आता कायदा आपली जागा घेईल. त्यातून काय बाहेर पडायचे ते पडेल. पण प्रश्न एकच आहे आणि तो म्हणजे रोज अठरा बलात्कारांचे साक्षीदार असणाऱ्या मध्य प्रदेशात महिलांना सामाजिक सुरक्षा आणि प्रतिष्ठा मिळणार आहे की नाही? आरक्षण कायद्यांना नमन, वंदन असे नाव देऊन सुरक्षा मिळणार नाही. आरक्षण देऊनही

सुरक्षा मिळणार नाही. लव जिहाद छेडून मिळणार नाही. गंमत म्हणजे, अशा वेळी लव जिहाद छेडणारे आणि धर्माच्या नावाने आवाज काढणारे कुठे गायब झालेले असतात कळत नाही. हिंदू महिलेवर परधर्मियाने अन्याय केल्यावरच जिहाद होत असतो काय, याचे उत्तर मॉबलिंचिंगचे चित्रीकरण करून ते व्हायरल करणाऱ्यांनी द्यायला हवे. पण तसे कोणी देत नाही. मध्य प्रदेशातच अलीकडे एका सवर्णाने आदिवासीच्या तोंडात लघवी केली आणि आदिवासी किती नीच आणि सवर्ण किती श्रेष्ठ हेच जणू सिद्ध केले. या घटनेनंतर मध्य प्रदेशाची नाचक्की होऊ लागली तेव्हा मुख्यमंत्री पीडिताच्या घरी गेले आणि क्षमायाचना म्हणून त्याचे पाय धुतले. असे कार्य नरेंद्र मोदींनी कुंभमेळ्याच्या काळात केले होते. त्यानंतर तोंडात लघवी झेलणाऱ्या आदिवासीचे आणि रात्रंदिवस घाण उपसणाऱ्या सफाई कामगारांचे काय झाले, हे गुलदस्त्यातच आहे. अशा गोष्टी कधी लाल किल्ल्यावरील भाषणात येत नाहीत किंवा आरक्षण कायद्याच्या वेळी चर्चेचा विषयही ठरत नाहीत. मागील पानावरून पुढे चालू या न्यायाने चक्र चालू राहते, जसे मणिपूरच्या बाबतीत सुरू आहे. पंतप्रधानांनी फक्त एकदाच एकाच वाक्यात तेथील बलात्कारित पीडित महिलांविषयी सहानुभूती दाखवली. पण त्यानंतरही मणिपूर जळतेच आहे आणि या आगीत अनेक महिलांचे चारित्र्यही भस्म झाले आहे. मणिपूरमध्येच महिला असुरक्षित आहेत असे नाही, तर त्या मध्य प्रदेशात, उत्तर प्रदेशात आणि अजून बऱ्याच ठिकाणी असुरक्षितच आहेत, हे त्या त्या वेळच्या घटनांवरून सिद्ध होत असते. त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न संसदेत भाषण करून, दिशाभूल करून सुटणार नाही, तर या प्रश्नाचे उत्तर समाजातील पुरुषप्रधान मानसिकतेत आहे, मनुवादी विचारसरणीत आहे. हा कुटील विचारांचा मेंदू फोडल्याशिवाय कोणा महिलेला सुरक्षा, प्रतिष्ठा आणि आत्मसन्मान लाभणार नाही. गॅस दिले आणि संडास दिले, असा डांगोरा पिटून काय उपयोग?

## सर्वांनीच बघितला व्हिडिओ, कुणीच बघितला नाही व्हिडिओ...

काही व्हिडिओ समाज माध्यमांवर झळकणारे असे काही असतात, की ते सर्वजण बघतात. जमलंच तर अंगण खाल-वर करतात आणि मोकळे होतात. काही झालं तरी आपण असा व्हिडिओ पाहिला होता असं ते सांगत नाहीत. तसं सांगणं आणि त्यावर बोलणं त्यांना जोखीम वाटते. ती घ्यायला नको म्हणून ते मौन पाळतात आणि सशाचं काळीज घेऊन जगतात. कितीही धावण्याचा प्रयत्न केला तरी काळीज सशाचंच राहतं. काही जण असे काही व्हिडिओ बघतात, मित्रमंडळीत चर्चा करतात. व्हिडिओत हिंसाचार कसा होता, बीभत्सपणा कसा होता, दादागिरी कशी होती आदींचे ते वर्णन करतात. इथपर्यंतच त्यांचे थांबते. अंगठा खालवरही करत नाहीत. व्हिडिओ फॉरवर्डही करत नाहीत. जणू काही त्यांनी पाहिलेलंच नसतं. समाजमाध्यमं आपल्या मालकीची आहेत, आपल्याला व्यक्त करण्यासाठी आहेत, हेही ते मान्य करत



नाहीत. नवीन कपडे आणले, वाढदिवस आला, कुत्रा आणला, कुंडीतल्या बोन्साय केलेल्या रोपाला फुलं लागलं, कुणी हनीमुनला गेलं की स्टेटस ठेवण्यासाठी ते समाजमाध्यम वापरतात. अशांची संख्या अर्थातच अधिक असल्यानं या माध्यमांचा प्रभाव घेता येत नाही. रंजनाच्या पातळीवर ती त्रिशंकूसारखी तरंगायला लागतात.

तर मी सांगत होतो, ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये पुणे जिल्ह्यातून व्हायरल झालेल्या व्हिडिओविषयी. तो देशभर, जगभर व्हायरल झाला. कोणी तो ओठ आंबट करून, कोणी कोरडे करून तर कोणी चिंताग्रस्त होऊन बघितला, कोणी संताप व्यक्त करत बघितला. पण 'शो'च्या पलिकडे काही घडलेच नाही. व्हिडिओ आंधळा, मुका, बहिरा ठरवण्यात आला. ना वर्दीनं त्याची नोंद घेतली, ना आम्ही समाजसेवक आहोत असा आव आणणाऱ्या मंडळींनी घेतली. त्याची एक अशी कथा झाली, की 'आम्ही सर्वांनीच तो बघितला आणि आम्ही कोणीच तो बघितला नाही.' अजूनही तो फिरतोय. थोड्या जास्त वजनाचा आहे म्हणून लोड व्हायला अडथळा येतोय. पण लोक केवळ उत्सुकतेपोटी तो बघत राहतात.

आता या व्हिडिओत काय आहे? मला सासवडच्या एका कार्यकर्त्यानं तो दाखवला. एक लव जिहादजी स्टोरी त्यात आहे. एका अल्पसंख्याक तरुणाचं हिंदू धर्मातील मुलीवर प्रेम आहे. दोघेही खोलवर प्रेम करतात. लग्नाच्या आणाभाका घेतात. कधीमधी गावात एकत्र फिरतात. कधी कोणा झाडाखाली शेंगदाणे खातानाही कुणाला तरी दिसतात. हिंदूरक्षकाच्या कानावर ही गोष्ट जाते. आपला धर्म बुडतो आहे, शेवटच्या आचक्याउचक्या घेतो आहे असं त्यांना वाटायला लागतं. अलीकडं धर्मबुडी होण्याचं कारण खूप सोपं आहे. कोणी परधर्मातल्या पोरानं आपल्या धर्मातील पोरीवर प्रेम केलं किंवा कोणी गाईवर खडा मारला, की धर्म गाईचं अंग थरथरतं तसं थरथरायला लागलाच म्हणून समजा. अशी भावना तयार करणारे काही ठेकेदार आहेत. कुणी कसल्या तरी रंगाचे कपडे घालतं, कुणी दाढ्या वाढवतं, कुणी तीर्थयात्रा घडवतं, कुणी बेकार पोरांना राष्ट्रभक्तीचे, धर्मभक्तीचे धडे देत राहतं. अशाच कुणाच्या तरी नादाला लागून धर्मरक्षणाचे धडे गिरवणारे काही जण या 'लव जिहाद'च्या स्टोरीतील पोराला पकडतात. गावाबाहेर टेकडीजवळ नेतात. त्याला लाथा-

बुक्क्यांनी मारहाण करतात, लोळवतात, आपटतात. मारुन मारुन हात-पाय थकले की काठ्या घेतात. काठीचा मार त्याने नीट खावा म्हणून त्याला व्यवस्थित झोपायला लावतात. हात-पाय नीट बांधून घ्यायला सांगतात... म्हणजे हेच बांधतात आणि पुन्हा हाणमार सुरू... पोरगा मरणार नाही; पण नीट हालचाल करणार नाही अशा प्रकारचा हा मार. जखमा होणार नाहीत; पण जखमांपेक्षा अधिक वेदना देणारा मार... पोराचा आत्मसन्मान, प्रतिष्ठा संपून जावी अशा प्रकारचा मार. पोरगा एकटा आणि मारहारण करणारे पाच-सहा तगडे जवान... जूण याच कारणासाठी जिम करून छातीवरचे ॲप फुगवलेले. वेगवेगळ्या पद्धतीचा अमानुष मार. दोघे थकले, की बाकीचे दोघे मारणार आणि तिघे आदेश देणार. एवढा मार खाऊन हा पोरगा जगला कसा, असा प्रश्न व्हिडिओ पाहणाऱ्यांना पडेल. त्याचं उत्तर पोराची जगण्याची तीव्र इच्छा आणि त्याचं पोरीवरचं प्रेम एवढंच असू शकतं. मग या पोराला मार देतच त्याच्याशी प्रश्नोत्तरे सुरू होतात. तुझा धर्म कोणता? पोरीचा धर्म आणि जात कोणती? प्रेमात कसे पडला? तिच्याशी सेक्स कसा केला हे खुलवून आणि स्पष्ट करून सांगशील काय? तिचं तू काय करणार होतास? अश्लील, बीभत्स आणि ठार करणार अशी धमकी देणाऱ्या प्रश्नांचा मारा. या सर्व घटनेचं चित्रीकरण जाणीवपूर्वक करण्यात आलं. ते व्हायरल करण्यात आलं. हेतू हाच, की चित्रफीत बघून असं कोणी आपल्या धर्मातील मुलीच्या नादाला लागणार नाही, आपला धर्म बुडवण्याची हिंमत करणार नाही. पुढं या पोराच्या विरोधात त्याचा स्वतःचा धर्म गेला, त्याचं कुटुंबही गेलं. याच्या भानगडीमुळे समाजाला आणि कुटुंबाला त्रास होईल अशी यामागे भीती. पोरगा परागंदा झालाय, त्याला गावात यायला बंदी, त्याचं कुटुंब स्वतःच्या सावलीलाही घाबरत गावात फिरतं. कोणी तरी हा व्हिडिओ पोलिसांकडेही पाठवला म्हणतात. प्रत्यक्षात फिर्याद द्यायला कुणीच पुढं आलं नाही म्हणून प्रकरण फायलीत नोंद होण्यापूर्वीच कचकलं. आता हे गाव काहीच न घडल्यासारखं जगतंय. कुठंही या प्रकरणाची वाच्यता नाही आणि करणार तरी कोण? व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर पोलिस स्वतःहून काही करतील असा एक भ्रामक समज होता. तोही खोटा ठरला किंवा धर्मरक्षक बनलेल्या बिनचेहऱ्याच्या शक्तीनं तो खोटा ठरवला. मॉबलिंचिंग काय असतं, याचा आँखो देखा हाल म्हणजे हा व्हिडिओ. आम्ही तो बघितला आहे असं जेव्हा समाज सांगेल तेव्हा जनावर बनलेल्या गर्दीच्या तावडीतून कोणी तरी सुटेल, यात शंका नाही.

●●●

**– तात्या विंचू**

## कविता

# दंगा झाला पाहिजे

धर्मांधतेचा चिखल उधळायला
धर्माधर्मात पंगा झाला पाहिजे
नासवायला निती माजवायला मती
जाती जातीत दंगा झाला पाहिजे...

पुराणातील अंधत्वाची
सर्जरी करणारे सर्जन
दाभोळकर, पानसरे, कलबुर्गी
यांच्या हत्येचा जुलूस झाला पाहिजे
बलात्काऱ्यांच्या सत्काराचा
भव्य उरूस झाला पाहिजे
माणसं नव्हे दगडासाठी
शाळा नव्हे मंदीरासाठी
नाच बेढंगा झाला पाहिजे...
म्हणूनच जाती जातीत पंगा झाला पाहिजे

ना मिळो भाकर खायला
ना पाणी पिण्याला
ही फिकिर करायची कशाला
करू द्या शेतकऱ्याला आत्महत्या
होऊ द्या बलात्कारासाठी
माय बहीणीची हत्या

पाजावी फक्त जातीची नशा म्हणजे
माणसाचा भेजा भंगार झाला पाहिजे
विवेकही नंगा झाला पाहिजे
म्हणूनच जाती जातीत दंगा झाला पाहिजे

मन मलिन धुवायचं नाही
पण देवाला आंघोळ दुधाची
मायबाप खंगून टेकले मरायला
फिकिर मंदीराच्या पुजाऱ्याची
विषमतेच्या विषारी विषाने
मेंदूचा भूगा झाला पाहिजे
कोणाचा देव मोठा कोणाचा छोटा
रंग देवावर उधळायला
माणूस बेरंगा झाला पाहिजे
म्हणूनच जाती जातीत दंगा झाला पाहिजे

माझा देश महान आहे
हे जगाला पटवून द्यायला
मूठभर लोकांच्या चतुराईने
बहुजनांचा बळी गेला पाहिजे
जाती विषाची पेरणी करणाऱ्या
राजकारणी सोंगाड्याच्या सापळ्याने

माणसाला इंगा दावला पाहिजे
कुसंगाशी संग करण्यासाठी
सेनापतीच्या खुर्चिच्या औक्षणासाठी
माणूस लफंगा झाला पाहिजे
म्हणूनच जाती जातीत पंगा झाला पाहिजे

पण आता माणुसकीच्या सलामतीसाठी
अशा दंग्यांचा खिमा झाला पाहिजे
मतलबी लांडग्यांनी माणसात पेरलेला
जातीचा दारूगोळा निकम्मा झाला पाहिजे
दगडी मंदीरात नव्हे रे
दान ज्ञानमंदीरात द्यायला
मनाचा गाभारा चंगा झाला पाहिजे
वेगवेगळे झेंडे कशाला रे
सगळ्यांचा तिरंगा झाला पाहिजे
बिकाऊ मीडियाचा नरडा
कायमचा गुंगा झाला पाहिजे...
दंग्यादंग्याच्या गर्भात आता
वैचारिक क्रांतीचा दंगा झाला पाहिजे...

**– निशांत गुरू**

# माझ्या मोडलेल्या माणसांनो!

ते प्रतिगामी आहेत
पुरोगामीही आहेत

सोयीनुसार ते
भूमिका ठरवतात
आणि बदलतातही

ते सगळ्याच गटांत
सगळ्याच पक्षांत
ठाण मांडून बसतात
आणि वावरतातही

कुठेही असले तरी
ते सुरक्षित असतात
आतून एकत्रच राहतात

एकटे भेटतात तेव्हा ते
किती गोड बोलतात

दोन
दोनाचे चार
चाराचे आठ झाले की,
ते रंगच बदलतात

ते कळूच देत नाहीत मनातले
आणि तुमच्या तळघरात शिरून
रस्तेच पोखरून टाकतात

ते सत्तेत असले काय
आणि नसले तरी काय

त्यांच्या पायावर डोके
गहाण ठेऊन धन्य समजणारे
किती तरी आहेत सभोवताली

तोपर्यंत कुणीही त्यांचे
काहीही वाकडे करूच
शकत नाहीय
कितीही इच्छा असली तरी

ते प्रतिगामी बनून
परंपरेचे रक्षक होतात
पुरोगामी बनून
मांडीला मांडी लावून बसतात

हजारो वर्षांनंतर
मूलनिवासी माणसे
प्रजासत्ताक झालीत
स्वातंत्र्य, समता, बंधुता
आणि न्याय मूल्यांनी भारावून
अस्तित्वासह जगू लागलीत

आणि इथेच तर घात झाला

पुन्हा नव्या
मानसिक गुलामीच्या
पारतंत्र्याचे आकाश
त्यांनी मिठीत घेतलेय

क्रांतीचे संविधानिक चक्र
जागच्या जागीच रूतवलेय

भगव्या पालखीत बसून
ते कालचेच दिवस
पुन्हा उगवताहेत

ते प्रतिगामी आहेत
पुरोगामीही आहेत

आता तरी ओळखा ना त्यांना
माझ्या मोडलेल्या माणसांनो!

**– शशिकांत हिंगोणेकर**

# सत्ता शेवटी, सत्ता असते

सत्ता शेवटी, सत्ता असते
कोणत्याही काळातली,
कुठलीही, जगभरात ती
सारखीच असते

स्वयंभू असते ती
स्वयंघोषित
अवतार
असते ती

तीच असते तज्ज्ञ
सर्वज्ञ
बुद्धिमत्ताही
असते तीच

तिला अक्कल
शिकवू नका
तिला नको ते
काहीच पिकवू नका

परवानगीशिवाय
तिच्या
काहीच कोणी
बोलू नका

गुंडाळून
ठेवते ती
तिच्याशिवाय
सारेच

ती असते
स्वतः
स्वयंप्रकाशित
तारेच

विद्वानांनो, लक्षात घ्या
तुमचे काम तिच्या
पदरी असणे, तिने हसा
म्हटले
तरच हसणे

बाकीच्यांनी
रडणे केवळ
तेही मनातल्या
मनात

पुरस्कृत करते ना ती
उपकृत करते ना ती
अजून काय करेल
तुमच्यासाठी ती

काहीही पेरते
कुठेही काढते
कशाचेही
पीक

ज्याला त्याला
सांगते
तेच तेवढे
विक

अभेद्य असतात
तिचे किल्ले अदृश्य
जड झाले पोसलेले की
अपघात त्यांचे दृश्य

सत्ता शेवटी
सत्ता असते
फक्त जनता जोवर
असते भेदरलेली

सत्तेचीही कोसळते
मत्ता, जनता
असते जेव्हा
पेटून उठलेली

**– श्रीपाद भालचंद्र जोशी**



# आज वेगळा आहे

अंदाज वेगळा होता आणिक, आमुचाबाज वेगळा आहे।
काल पांगळा होता तरीही, आमचा आज वेगळा आहे।।
मोजले न कधी कष्ट, जे उपसलेत निळ्या पाखरांसाठी
घामाच्या धारात चिंब भिजलेला, हा ताज वेगळा आहे।
झोपडीही आमुची स्वाभिमानी, न झुकली कुणाच्याही पुढे
वाळवंटात तगलेल्या, ह्या निवडुंगाचा अंदाज वेगळा आहे।
तो बोधीवृक्ष लावूनिया केला, सारा जीव चंदनाचा ज्यांनी
माझ्या बाबासाहेबांचा अंदाज निराळा, आगाज वेगळा आहे।
कुणाच्या पाऊलखुणाच्या आधारे, वाट शोधावी उजेडाची
स्वतःचा रस्ता शोधणारा, माझा हा समाज वेगळा आहे।
नव्हती पर्वा काट्याची, नव्हती भ्रांत गुलाब पाकळ्याची
तुतारी फुंकली परिवर्तनाची, ऐका हा आवाज वेगळा आहे।
निवडुंग ते, बोधीवृक्ष नसतो, हा प्रवास इतका साधा यार हो
ह्याची कथा त्याची गाथा, डोई व्यथेचा ताज वेगळा आहे।
बाबा तुमच्या बोटाच्या दिशेनेच, उजेड लाभला जन्मभराचा,
अंधार पिळून नव्या उजेडाचा, लाभला कोलाज वेगळा आहे।

**– किरण शिवहर डोंगरदिवे**

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

२०%

## सवलत!

**देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक**

हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक-वर्गणीदारचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ९६० | ८०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ४८० | ४०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | २४० | २०० | |

(वार्षिक विशेषांक – ४) / (६ महिने – २)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. ---------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : -------------------------------- जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ---------------------------------------------------पत्ता : ---------------------------

---------------------------------------------------शहर : ---------------------------------------

राज्य : ------------------------ पिन कोड : -------------------- फोन नं. (घर) : ------------------------

मो. नं. : ------------------------इ-मेल : ------------------------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता

WhatsApp व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६९ क्र. वर फोन करा:

इ-मेल करा thepeoplespost2014@gmail.com

www लॉग ऑन करा peoplespost.in

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2022-2024
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

# With Best Compliments





# Sos. Agrotech Pvt.Ltd

